# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९६८

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. बाळगीर गंगागीर गिरी, अपिलार्थी
मु. सावरगांव पो. उंबरखेड, तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितलेली माहिती न प्राप्त होता चुकीची व दिशाभूल करणारी माहिती प्राप्त झाली. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, त्यांना सर्व

शिक्षा अभियाना अंतर्गत शाळा बांधकामाबाबत, दारिद्र्यरेषेची नांव नोंदणी, राजीव गांधी निवारा या मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> "उपरोक्त विनंती की, मी १/३/२००७ रोजी आपल्या कार्यालयात विनंती अर्ज केला होता परत माहीतीचा अधिकाराखाली अर्ज ७/४/२००७ रोजी दीला होता. शाळा खोली बांधकाम इस्टीमेटमध्ये कोड बेरीग चौकटीच्यावर आहे का नाही व इतर शाळा खोलीवर कोड बेरिंग टाकली आहे का मौजे उंबरखेडा ग्रामस्तांनी आपनाकडे व जि.प.कडे २८/२/२००७ रोजी शाळा खोली बांधकामाबाबद तक्रार होती त्यावर काय कार्यवाही झाली याचा लेखी खुलासा व्हावा."

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी २००६ ते २००७ असा असून अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने माहितीसाठीचा सदर अर्ज गट विकास अधिकारी, यांना उद्देशून केला होता तथापि या प्रकरणी ते माहिती अधिकारी म्हणून नियुक्त केले गेले नसल्याने त्यांनी अपिलार्थीचा सदर अर्ज त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे संबंधीत गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कन्नड ज्यांची या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून नेमणूक झाली होती त्यांच्याकडे पाठविला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २९-०८-२००७ रोजी पारित केले. या आदेशामध्ये त्यांनी, गट शिक्षण अधिका-यास दिनांक १८-०८-२००७ पर्यंत माहिती पुरविण्याचे सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कन्नड यांनी त्यांना आता दोन दिवसाच्या आत माहिती देण्याचे कबूल केले आहे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती माहिती प्राप्त होणार आहे त्यावर ते समाधानी आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना गट विकास अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या सुनावणीकरिता त्यांना आमंत्रित केले गेले नव्हते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीचा दिनांक १८-०७-२००७ रोजीचा मूळ अर्ज सबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी बोलाविले नव्हते हा त्यांचा मुद्दा जरी वादाच्या प्रयोजनार्थ ग्राह्य धरला तरी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या संदर्भात, अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००७ पर्यंत माहिती पुरविण्याची सूचना जन माहिती अधिकारी यांना दिली होती व सदर सूचना जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील संबंधीत कागदपत्रांवर सही केलेली आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सर्व शिक्षा अभियानासंदर्भात दिनांक १८-०८-२००७ पूर्वी माहिती देणे आवश्यक असल्याची माहिती होती हे सिध्द होत आहे. एकदा माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही अर्जदारास माहिती देण्याचे माहीत झाले असता ती अर्जदारास ठराविक मुदतीत कशी देता येईल याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक होते, तथापि त्यांनी अशा प्रकारचा कोणताही प्रयत्न केल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. अपिलार्थीस ते माहिती देऊ शकले नाहीत हा मुद्दा त्यांनी आज रोजी सुनावणीमध्ये कबूल केला आहे. आपल्या अशा कृतीव्दारे त्यांनी आपल्या कार्यशैलीमध्ये कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चित पात्र ठरत आहेत. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्यासंदर्भात असे दिसून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००७ रोजी शाळा खोल्यांच्या बांधकामाबाबत केलेल्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते, त्यामुळे अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी सर्व संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस देणे त्यांना भाग आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती ही

प्रश्नार्थक स्वरुपात आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती ज्या स्वरुपात आहे त्या स्वरुपात त्यांनी ती अर्जदारास देणे अपेक्षित आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे हे पाहता, असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळगीर गंगागीर गिरी, मु. सावरगांव पो. उंबरखेड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९७५

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. शेख हबीब पाशा पिता गुलाम रसूल, अपिलार्थी
घर नं. १/१६/३२, जुना बाजार,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
माजलीपुरा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन
महामंडळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : विमा कर्मचारीवर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औरंगाबाद |
| | त्रयस्थ पक्ष | : श्रीमती कल्पना कामतीकर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पोस्टाव्दारे प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे विचारात न घेता त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे म्हणून त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या

तरतुदीनुसार संपूर्ण माहिती विनामूल्य प्राप्त व्हावी व जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४ ते २००७ या कालावधीशी संबंधीत श्रीमती कल्पना कामतीकर लिपीक, एस. टी. कार्यालय पैठण यांच्यासंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक २७-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत आहे व ही माहिती देण्यासाठी त्रयस्थ पक्षाने नकार दिल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांनी या पत्राव्दारे नाकारले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि सदर अपील चुकीच्या प्राधिकरणाकडे केले असल्याने अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०७-२००७ रोजी प्रत्यक्षतः प्राप्त झाला. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०८-२००७ रोजी माहिती पुरविली आहे, तथापि या माहितीमध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहितीचा समावेश नव्हता. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ४ व्दारे मागणी केलेली, "अनुकंपा तत्वावर नेमणुकाकरिता अर्ज केलेल्या अर्जदारांची नावे व पत्ते" ही माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नसल्याचे दिसून येते. ही माहिती अपिलार्थीस न देण्याचे कोणतेही कारण आयोगास दिसून येत नाही, कारण ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे. अपिलार्थीने मूळ अर्ज करतेवेळी जन माहिती अधिकारी म्हणून श्री. गुरव नावाचे आस्थापना पर्यवेक्षक हे जन माहिती अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात काम पाहत होते. त्यांच्या हातून ही चूक झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ची माहिती अपिलार्थीस

अधिनियमातील तरतुदीनुसार देय असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती द्यावी लागेल. सशुल्क माहिती देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने ही माहिती आता त्यांना अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपूर्ण माहिती पुरवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत असल्याने विभाग नियंत्रक, राज्य परिवहन, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०१-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख हबीब पाशा पिता गुलाम रसूल, घर नं. १/१६/३२, जुना बाजार, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विमा कर्मचारीवर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०००

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. नंदकिशोर भाऊसाहेब जाधव, अपिलार्थी
मु. पो. पालखेड, तालुका वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्री पारेश्वर विद्यालय, पालखेड,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, श्री पारेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, पालखेड,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील केल्याचे नमूद केले असून आपल्या मूळ अर्जाव्दारे केलेल्या माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००१ ते २००५ व २००६ मधील खरेदी बिलासंदर्भात व T.L.E. अनुदानामध्ये खरेदी केलेल्या वस्तुंच्या बिलांच्या नकला, शासनाकडून मिळालेल्या विविध योजनांचे अनुदान व खर्चाची बीले याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे यासंदर्भात कोणताही खुलासा केलेला नव्हता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १२५० इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले व सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रावर अपिलार्थी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये उत्तर देऊन या पत्रामध्ये (जन माहिती अधिकारी यांना) त्यांनी ते पिवळ्या रंगाची शिधापत्रिकाधारक आहेत व पुराव्यासाठी मूळ शिधापत्रिका त्यांना दाखविण्यात येईल, असे म्हटले आहे. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिनांक ०६-०१-२००७ रोजी पिवळ्या रंगाची शिधापत्रिका जन माहिती अधिकारी यांना दाखविली तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने त्यांना पिवळ्या रंगाची शिधापत्रिका कधीही दाखविली नाही व पिवळ्या रंगाची शिधापत्रिकाधारक हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत हे त्यांना माहीत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार संस्थेच्या सचिवांकडे यासंदर्भात दिनांक २०-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. संबंधीत संस्थेच्या सचिवांनी यासंदर्भात अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे त्यांच्याकडील दिनांक ३०-०३-२००७ रोजीच्या आदेशान्वये कळविले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी हे अर्ज करतेवेळी खरोखरच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होते किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. कारण अपिलार्थीने आज सुनावणीच्या वेळी देखील कथित पिवळ्या रंगाची शिधापत्रिका

त्यांच्याबरोबर आणली नाही. अपिलार्थीच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक १६-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ('अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे काय ?') च्या समोर कोणतेही अभिप्राय व्यक्त न करता फक्त '-- ' अशी खूण केलेली होती. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करतांना ग्रामसेवक ग्रामपंचायत पालखेड यांचे दिनांक १२-०१-२००७ रोजीचे प्रमाणपत्र सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थी हे १९९२-९३ च्या यादीनुसार क्रमांक -- आहे असे नमूद केले आहे. या सर्व प्रकारावरुन अपिलार्थी हे खरोखरच दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी तयार आहे व ते आज रोजी ती अपिलार्थीस देण्यास तयार आहेत हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी हे दिनांक १६-१२-२००६ रोजी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होते किंवा कसे याची त्यांनी प्रथमतः सक्षम प्राधिकरणाकडून खात्री करुन घ्यावी व प्रथम अर्ज करतेवेळी जर अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असतील तर, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. जर मूळ अर्ज करतेवेळी अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होते असे सिध्द झाले नाही तर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी असे अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आज रोजी केलेल्या त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर रुपये २५००० इतकी शास्ती लावण्याचे आयोगाने आदेशित करावे अशी आग्रहपूर्वक विनंती केली आहे. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांचे दारिद्र्यरेषेखालील जे प्रमाणपत्र जोडले आहे त्यामध्ये देखील अपिलार्थीचा दारिद्र्यरेषेखालील कुटूंबाच्या यादीचा निश्चितपणे कोणता क्रमांक आहे हे कळून येत नाही, त्यामुळे या प्रकरणी मूळात अपिलार्थीने हे, अर्ज करतेवेळी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होते किंवा कसे हे आजही निश्चित सांगता येत नाही. अशा प्रकारे अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांनी अपूर्ण स्वरुपात जन माहिती अधिकारी यांना सादर केल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे याचबरोबर या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर निःसंशयपणे नाकारले असल्याचे सिध्द होत नसल्याने अपिलार्थीचा जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची अपिलार्थीची विनंती आयोग मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी हे दिनांक १६-१२-२००६ रोजी दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होते किंवा कसे याची सक्षम प्राधिकरणाकडून खात्री करुन घ्यावी व प्रथम अर्ज करतेवेळी जर अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असतील तर, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अन्यथा मूळ अर्ज करतेवेळी अपिलार्थी हे दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती होते असे सिध्द न झाल्यास अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदकिशोर भाऊसाहेब जाधव, मु. पो. पालखेड, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री पारेश्वर विद्यालय, पालखेड, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री पारेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, पालखेड, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२३

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. गाडेकर गुलाबराव किशनराव, अपिलार्थी
"पार्वती निवास" देवीची गल्ली नं. ४, विष्णुनगर,
आकाशवाणी मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक संचालक,
नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : शहर अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिका-याकडून जी माहिती हवी होती ती माहिती अद्यापपर्यंत प्राप्त झाली नसल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे

महानगरपालिका क्षेत्रातील अपार्टमेंट -'B' दिशासंकुल CTS No. १५३०४/४५, १५३६/१, गारखेडा परिसर, औरंगाबाद यांच्याशी संबंधीत एकूण १६ मुद्दयांवर माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०८-२००७ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस बांधकाम नकाशा व बांधकाम परवाना आदेशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी असे आदेशित केले. या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यानी निश्चितपणे किती कालावधीत व माहिती कशा प्रकारे द्यावी याचा उल्लेख केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे एकूण २८४ रुपये इतके शुल्क महानगरपालिकेकडे भरण्याचे सूचित केले, तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व त्याचबरोबर अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा पुरावा, जन माहिती अधिकारी आयोगाने सूचना देऊनही, सादर करु शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता आयोगास असे आढळून आले आहे की, मूळात अपिलार्थीच्या दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद त्यांच्याकडील दिनांक ०३-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिला असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे, तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे व हे पत्र पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी हे आयोगास सादर करु शकत नाहीत. अपिलार्थीच्या दिनांक ०२-०६-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीनुसार दिनांक ०१-०७-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे अपेक्षित होते, तथापि त्यांनी मूळात अपिलार्थीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्या-नंतर दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीपोटीचे रुपये २८४ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित

केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिल्याने अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील माहिती जन माहिती अधिकारी यांना विनामूल्य देणे भाग आहे. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या एकूण १५ मुद्दयावर त्यांना कशा प्रकारे माहिती द्यावयाची याचे मार्गदर्शन जन माहिती अधिकारी यांना करण्यात आले असून जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्यामुळे आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गाडेकर गुलाबराव किशनराव, "पार्वती निवास" देवीची गल्ली नं. ४, विष्णुनगर,

आकाशवाणी मागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नगर रचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१२८

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त, अपिलार्थी
एन-१२ जी-१५, स्वामी विवेकानंद नगर,
हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी , जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. मेहर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०८-२००७ रोजीचा माहितीसाठीचा अर्ज केला असता ३० दिवस पूर्ण होऊन देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही, अगर कोठलाही पत्रव्यवहार केला नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी दिनांक १८-०९-

२००७ रोजीच्या पत्रानुसार अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (छ) नुसार माहिती नाकारली, जी माहिती अधिनियमातील कलम ८ (त्र) नुसार संसदेला किंवा राज्य विधानमंडळाला देण्यास नकार देता येत नाही, ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासाठी नकार देता येत नाही, या अधिनियमाचा संबंधितांनी भंग केला असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी व अपिलार्थीचे विचाराधीन अपील मंजूर करुन त्यांनी मागितलेली माहिती तात्काळ पुरविण्याचे आदेश द्यावेत अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये अखेरीस विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्रयस्थ पक्ष श्री. मेहर उप अभियंता यांनी शासनास मत्ता व दायित्व भरुन दिलेल्या विवरणपत्राच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाच्या संपूर्ण शासकीय सेवेच्या कालावधीशी संबंधीत होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला, असे आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने आयोगास अवगत केले. तथापि जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १९-१०-२००७ रोजीचे कथित पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आयोगासमोर सांगितले. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे हे पत्र कधी पाठविले यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना, आयोगाने पूर्वसूचना देऊनही, त्यांनी कोणताही पुरावा आयोगास सादर केला नाही, त्यामुळे पुराव्याअभावी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १९-१०-२००७ रोजी पत्र पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आयोग फेटाळून लावत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-०९-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (छ) नुसार माहिती देण्याचे नाकारले त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने श्री. मेहर या त्रयस्थ पक्षाविषयी त्यांच्या मत्ता व दायित्व विवरणपत्राची मागणी केली आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष आयोसमोर उपस्थित आहेत. त्यांनी ही माहिती त्यांच्या

वैयक्तीक बाबींशी संबंधीत असल्याने ती अपिलार्थीस देऊ नये, असे आयोगास सांगितले. अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जी माहिती विधी मंडळाला देणे अनिवार्य आहे ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे गरजेचे आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने ज्या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली आहे तो मुद्दा म्हणजे ८ (\ा) परंतूक हा होय. अधिनियमातील कलम ८ (\ा) चे अवलोकन करता असे दिसून येते की, जी माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास देय होते. अपिलार्थीने आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षाची माहिती घेऊन ते नेमके कोणते जनहित साध्य करु इच्छितात, या मुद्दयावर कोणतेही भाष्य केले नाही. अधिनियमातील कलम ८ (१) (\ा) अन्वये व्यक्तीच्या खाजगी बाबीत जी माहिती अगंतूक हस्तक्षेप करील अशा वैयक्तीक तपशिलासंबंधीची माहिती, माहिती अधिकार अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस देय होत नाही. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास त्रयस्थ पक्षाने प्रतिकुलता दर्शविली आहे व अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिल्यास कोणतेही व्यापक जनहीत साध्य न होता त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत मात्र अंगतूक हस्तक्षेप होईल व परिणामी अधिनियमातील कलम ८ (१) (\ा) चा भंग होईल असे आयोगास वाटत असल्याने, ही माहिती अपिलार्थीस देता येणार नाही असे आयोगाचे मत आहे. या उपरही असे नमूद करण्यात येते की, शासकीय सेवेतील वर्ग-१ व वर्ग-२ च्या कर्मचा-यांची मत्ता व दायित्व विवरणपत्रे ही शासनाकडे ठेवली जातात. ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसते, तथापि अपिलार्थीस माहिती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची भूमिका घेतलेली नाही. अशा प्रकारच्या इतर अपिलांसंदर्भात राज्य माहिती आयोगाने मत्ता व दायित्व विवरणपत्रे उघड करण्याची अनेक अपिले मान्य करण्याचे नाकारले आहे हे पाहता, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक ०१-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र काशीनाथ पितृभक्त, एन-१२ जी-१५, स्वामी विवेकानंद नगर, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३२

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, अपिलार्थी
४३ "दिपज्योती" उल्हासनगर, श्री. गंगाधर झिंझाडे यांचा
वाडा, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तहसीलदार, किनवट,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार किनवट तालुक्यातील चार अर्धघाऊक रॉकेल विक्रेत्यांबाबत माहिती मिळण्यासाठी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) यांच्याकडे दिनांक ३१-०५-२००७ रोजी रितसर अर्ज भरुन पोस्टाने पाठवून दिला, तथापि यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणताही प्रतिसाद दिला

नाही, म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापपावेतो कोणताही निर्णय दिल्याचे त्यांना माहीत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे किनवट तालुक्यातील अर्धधाऊक रॉकेल विक्रेते, मेसर्स सचिन ट्रेडिंग कंपनी, लायसन्स नंबर ४३/९८, अशोक राघोलु नेमानिवार लायसन्स नंबर ४५/९८, मेसर्स साईबाबा ट्रेडिंग कंपनी लायसन्स नंबर ५१/९८ व मेसर्स गजानन ट्रेडिंग कंपनी लायसन्स नंबर ५२/९८ यांना संलग्नीत असलेले रॉकेल हॉकर्स/ किरकोळ / रिटेल रॉकेल विक्रेते यांना वाटप केलेल्या रॉकेल बिलपुस्तिकेच्या सत्यप्रती, वितरण रजिस्टरच्या सत्यप्रती व तसेच त्यांच्या स्टॉक रजिस्टरच्या सत्यप्रती व त्यांना त्यावेळी दिले गेलेल्या रॉकेल नियतनाच्या दरमहा मिळणा-या प्रती याची दिनांक ०१-०१-२००२ ते ३१-१२-२००४ या कालावधीशी संबंधीत माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०५-०७-२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक १०-०९-२००७ रोजी निर्णय पारित केला होता व सदर निर्णयाची प्रत अपिलार्थीस दिनांक ०३-०७-२००८ रोजी प्राप्त झाली आहे. त्यांच्या या म्हणण्यापृष्ट्यर्थ त्यांनी आयोगास अपिलार्थीची पोचसही असलेले त्यांच्या कार्यालयातील दिनांक १०-०९-२००७ रोजीचे सुनावणीचे आदेश दाखविले. या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या आदेशाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांनी केवळ अपिलार्थी हे त्यांच्याकडे सुनावणीसाठी गैरहजर राहिले या एकाच मुद्दयावर प्रकरण बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अपिलार्थीने यावेळी असे नमूद केले की, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०८-२००७ रोजी ठेवलेल्या कथित सुनावणीचे पत्र त्यांना दिनांक ३०-०८-२००७ रोजी दुपारी ०३-०० वाजता मिळाले, त्यामुळे ते या सुनावणीसाठी हजर राहू शकले

नाहीत व जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या कथित सुनावणीचे पत्र त्यांना प्राप्त झ ाले नाही.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे व त्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीस त्यांना लेखी व दूरध्वनीव्दारे सूचना देऊनही विनापरवानगी गैरहजर आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती माहिती अपिलार्थीस देय ठरत आहे. मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती का दिली नाही याची कारणे आयोगास कोणत्याही कागदपत्राच्या उपलब्धतेअभावी नीटपणे कळून येत नाहीत. मूळात अपिलार्थीच्या दिनांक ३१-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील केवळ अपिलार्थी गैरहजर आहेत म्हणून दिलेला निर्णय हा माहिती अधिकाराच्या पार्श्वभूमीवर योग्य निर्णय असल्याचे आयोगास वाटत नाही. विशेषतः या कायद्याची अंमलबजावणी सार्वजनिक प्राधिकरणात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने झाली असल्याने या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस कशा प्रकारे माहिती देता येईल या मुद्दयावर प्रामुख्याने भर देणे गरजेचे होते तथापि अशा प्रकारची भूमिका त्यांनी अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय देतांना घेतली नाही, परिणामी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थी हे कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. आज रोजी सुनावणीस जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांना विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या प्रथम अर्जाची ऊपेक्षा केल्याचे आयोगास जाणवते. त्यांनी अशा प्रकारे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील बेजबाबदार वृत्तीबाबत व कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरविली जाईल, असे आयोगास आश्वासित केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तहसीलदार, किनवट

यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस या मुदतीत निश्चितपणे विनामूल्य उपलब्ध होईल असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, ४३ "दिपज्योती" उल्हासनगर, श्री. गंगाधर झिंझाडे यांचा वाडा, मालेगाव रोड, तरोडा (खु.), नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१३६

निर्णय दिनांक  ०१-०१-२००९

१ श्री. देशमुख मोहंम्मद हारुण पिता अमीनमियाँ, अपिलार्थी
व्दारा - न्यू देशमुख मेडीकल, सराफा, मार्केट, सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी,
सिल्लोड उपविभाग, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत उत्तर दिले नाही, विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे अपील केले असता दिनांक २९-०९-२००७ रोजी नायब तहसीलदार, सिल्लोड यांनी त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ च्या मूळ अर्जासंदर्भात दिलेल्या उत्तराच्या प्रतीची झेरॉक्स प्रत सुनावणीच्या वेळेस दिली. सदर प्रत मूळ स्वरुपात व

साक्षांकीत केलेली नाही. तहसीलदार यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी पुरविलेली माहिती अपूर्ण आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले असताना देखील त्यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही, त्यामुळे तहसीलदार तथा जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०८-२००४ रोजीच्या मतदार यादीतील नावे वगळल्याबाबत काही माहिती विचारली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - देशमुख सफिया खातुन रफीक, देशमुख नुरुन्निसा सादीक व देशमुख फहमिदा हारुण यांची नांवे मतदार यादीतून वगळण्याची कारणे विचारली होती. सदर माहिती अपिलार्थीने ४८ तासांच्या आत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात खुलासा केला.

अपिलार्थी यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे पत्र दिनांक ३०-०७-२००७ रोजी पाठविले नसून या पत्राची झेरॉक्स प्रत त्यांना याच विषयावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत प्राप्त झ ाली, असे त्यांचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे अपिलार्थीस त्यांनी दिनांक ३०-०७-२००७ रोजी माहिती दिल्यासंदर्भात कोणताही पुरावा उपलब्ध नाही. आयोगाने लेखी नोटीशीव्दारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जावक नोंदवहीची प्रत मागितली असतांना देखील जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने ही प्रत उपलब्ध करुन दिली नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०९-२००७ रोजी माहिती दिल्याचा मुद्दा आयोग ग्राह्य धरत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मतदार यादीतील नांवे वगळल्याबद्दल कारणे विचारली आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या म्हणण्यासंदर्भात कारणे, स्पष्टीकरण अथवा खुलासा विचारणे अभिप्रेत नाही व हे अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येवरुन स्पष्ट होईल. यामध्ये अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देय होत नाही. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-०७-

२००७ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन अर्जदाराची माहितीची मागणी दुर्लक्षित केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे यावेळी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिल्याचे जरी दर्शविले असले तरी त्याचा ठोस पुरावा ते आयोगाकडे त्यांना पूर्वसूचना प्राप्त होऊनही सादर करु शकत नाहीत. अपिलार्थीच्या अर्जाची संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे केलेल्या उपेक्षेबद्दल आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे व इत:पर माहिती अधिकार अधिनियमानुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये योग्य तो निर्णय घ्यावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती अपूर्ण असल्याचे म्हटले आहे. तथापि ही माहिती अपूर्ण कशी आहे हे आयोगास सांगण्याकरिता अपिलार्थी आज सुनावणीस आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे अपिलार्थीस त्यांना अपूर्ण माहिती मिळाली हा आक्षेप आयोग फेटाळून लावत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना वर उल्लेखिल्याप्रमाणे देय होत नाही. मात्र त्यांच्या व्दितीय अर्जातील जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची विनंती मान्य करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०१-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देशमुख मोहंम्मद हारुण पिता अमीनमियाँ, व्दारा - न्यू देशमुख मेडीकल, सराफा, मार्केट, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड उपविभाग, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४४

निर्णय दिनांक ०१-०१-२००९

१ श्री. सैय्यद करीम (उर्फ बब्बूभाई), अपिलार्थी
न्यू बायजीपूरा, इंदिरानगर, गल्ली नं. ८,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, "सदरहू माहिती आम्ही आपणांकडे दिनांक १३/११/२००७ रोजी रितसर मागणी केली होती, मात्र सहा महिने उलटून देखील आपण ही
माहिती मला पुरविलेली नाही, हे बेकायदेशीर व नियमबाह्य आहे, म्हणून हे दुसरे (सेकंड) अपील. "

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन

२००६ - २००७ या कालावधीशी संबंधीत औरंगाबाद शहरामध्ये प्रत्येक वॉर्डामध्ये रॉकेलचे किती नियतन मिळते ही माहिती मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने वॉर्डनिहाय, स्वस्त धान्य दुकान, किरकोळ परवानाधारक, हॉकर्स, अपंग इत्यादी तपशिलासह मागितली होती. सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोठ्या प्रमाणावर असल्याने ती संकलीत करण्याचे काम त्यांच्या कार्यालयात चालू असल्याचे कळविले व त्याचबरोबर माहिती संकलीत झाल्यावर ती अपिलार्थीस पुरविण्याचे त्यांना या पत्रामध्ये आश्वासित केले. तथापि माहिती अधिका-याकडून माहिती येण्याची मुदत संपण्यापूर्वी अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील करणे पसंत केले. अपिलार्थीचे प्रथम अपील हे मुदतपूर्व असल्याने ते अपरिपक्व होते. एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर दिनांक ३१-१०-२००७ रोजी अंतिमतः सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०८-११-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणतीही कालमर्यादा घालून दिलेली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस संपूर्ण माहिती त्यांच्याकडील दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये विनामूल्य पुरविली आहे व त्यांच्या या विधानाप्रीत्यर्थ त्यांनी पोस्टाची पावती आयोगाकडे सादर केली आहे, त्यावरुन त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पुरविल्याचे सिध्द होत आहे.

उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाली नाही, असे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या युक्तिवादामध्ये म्हटले आहे. आज रोजी आयोगासमोर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती पुरविल्याचे

सिध्द झाले आहे. या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस जरी माहिती प्राप्त झाली असली तरी ती विलंबाने प्राप्त झाल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-१०-२००७ रोजी दिलेल्या प्रथम प्रतिसादाचे पत्र, हे माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ च्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे ते अवैध ठरत आहे. अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती विलंबाने पुरवून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सैय्यद करीम (उर्फ बब्बूभाई), न्यू बायजीपूरा, इंदिरानगर, गल्ली नं. ८, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय आयुक्त (महसूल), औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५०
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

१ श्री. अजित एम. देशमुख, : अपिलार्थी
रा.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
निबंधक,
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,
(यशदा) पुणे-७
२ जन अपिलीय अधिकारी
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,
पुणे
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: अतिरिक्त महासंचालक,
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन
प्रबोधिनी, (यशदा) पुणे-७

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त,मुंबई यांच्या कार्यालयाकडे दि. १७.०५.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या प्रथम अपिलावर दिलेला निर्णय त्यांना मान्य नसल्याचे नमूद करुन त्यांच्या प्रथम अपिलात नमूद

केल्याप्रमाणे, ते अपील पाहून राज्य माहिती आयोगाने कार्यवाही करावी अशी विनंती केली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीने त्यांच्या दि. ६.१.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि. १.१०.२००६ ते ६.१.२००७ या कालावधीमधील एकूण ५ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.१.२००७ रोजी प्राप्त झाला, या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १४.२.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क एकूण रु.२७/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व या पत्राबरोबरच त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. ०८.०३.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देताना अतिरिक्त शुल्क वसूल केले, जन माहिती अधिकारी यांचे दि. १४.२.२००७ रोजीचे पत्र दिशाभूल करणारे असून माहिती दिल्यानंतर त्याचे शुल्क कळविले आहे त्यामुळे हे पत्र कायदेबाहय असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, माहिती अधिकारी यांनी वरील कृती जाणीवपूर्वक केल्याने तसेच ती कायदेबाहय असल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई कलम २०(२) प्रमाणे प्रस्तावित करावी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दोन पृष्ठांची माहिती देऊनही फक्त एकच पृष्ठाची फी आकारणी करुन शासनाचे रु.२/- इतके नुकसान केले असल्याने ही रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्यात यावी, टपालाद्वारे रु.५/- खर्च केला असताना अपिलार्थीकडून टपालासाठी रु.२५/- इतक्या शुल्काची आकारणी केल्यामुळे अतिरिक्त शुल्क रु.२०/- त्यांना व्याजासह परत करावे,त्यांच्या अपिलाचा खर्च माहिती अधिकारी यांच्याकडून वसूल करुन घ्यावा व माहिती

अधिकाऱ्यांनी कायद्याप्रमाणे वर्तन करण्याची सक्त ताकीद द्यावी, असे नमूद केले आहे. या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय दि. ९.४.२००७ रोजी पारित करुन अपिलार्थीच्या प्रथम अपिलातील सर्व मुद्यांवर योग्य प्रकारे उत्तरे दिली आहेत. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जातील मुद्यांचे समर्थन करण्यासाठी आयोगासमोर उपस्थित नाहीत.जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. ९.४.२००७ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता अपिलार्थीच्या प्रत्येक मुद्यावर त्यांनी दिलेला निर्णय आयोगास सर्वथा सुसंगत व योग्य वाटतो, त्यामुळे अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जावर, वेगळयाने विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. सबब अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ९.४.२००७ रोजीच्या पत्रातील परिच्छेद क्र.७ चे अवलोकन केले असता, अपिलीय अधिकारी तथा प्रभारी अतिरिक्त महासंचालक, यशदा यांना राज्यामध्ये औरंगाबाद, नागपूर,पुणे येथे राज्य माहिती आयोगाची खंडपीठे कार्यरत आहेत, याची कल्पना नसावी, असे दिसून येते. यशदा या संस्थेमध्ये माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणी संदर्भात सर्व शासकीय कर्मचाऱ्यांकरिता वेळोवेळी प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात त्यामुळे सर्वसाधारण परिस्थितीत या संस्थेस महाराष्ट्र राज्यातील राज्य माहिती आयोगाचे काम कोठे-कोठे चालू आहे, याची माहिती असणे अभिप्रेत आहे. परंतु दुर्दैवाने यशदा येथील अतिरिक्त महासंचालक, यांना प्रथम अपिलावर निर्णय देतांना अपिलार्थी हे बीड जिल्हयातील म्हणजेच पर्यायाने औरंगाबाद क्षेत्रातील रहिवासी असल्यामुळे त्यांचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद येथे करण्याचे सूचित करण्याचे भान राहिलेले नाही, याचे आयोगास सखेद आश्चर्य वाटत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अशाप्रकारे त्यांच्या अपील निर्णयामध्ये

अपिलार्थीस द्वितीय अपील करण्यासंदर्भात चुकीचे मार्गदर्शन केल्याचे आढळून येत असून इतःपर त्यांनी अशा चुका करु नयेत, अशा आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहेत. आयोगाच्या आक्षेपाची, संबंधित अतिरिक्त महासंचालक, यशदा,पुणे हे योग्य प्रकारे दखल घेतील, अशी अपेक्षा आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अजित मुरलीधर देशमुख, द्वारा गजानन किराणा स्टोअर्स, कारंजा रोड, बीड ता.जि.बीड-४३१ १२२

२. जन माहिती अधिकारी तथा निबंधक,यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, (यशदा), राजभवन कॉम्प्लेक्स,बाणेर रस्ता,पुणे-४११ ००७, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त महासंचालक ,यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,(यशदा), राजभवन कॉम्प्लेक्स,बाणेर रस्ता,पुणे-४११ ००७ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५१
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. जगन्नाथ बसवंतराव कांबळे<br>रा.उदगीर जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,<br>उदगीर, जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव,महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी मार्फत<br>महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर,<br>जि.लातूर | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.११.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. १४.८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून, २००१ ते एप्रिल, २००३ या कालावधीशी संबंधित एकूण ३ मुद्याद्वारे त्यांच्या शाळेतील दोन विद्यार्थी,या त्रयस्थ पक्षाविषयी माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. दत्तात्रय जगन्नाथ कांबळे रोल क्र.२१२ इयत्ता ११ वी (शास्त्र) यांच्या वार्षिक परीक्षा २००२ मध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षेतील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती, सुषमा जगन्नाथ कांबळे रोल क्र.२८३ इयत्ता ११ वी (शास्त्र) यांच्या वार्षिक परीक्षा २००२ मध्ये उत्तीर्ण झालेल्या परीक्षेतील सर्व विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रती व जून, २००२ ते एप्रिल, २००३ या कालावधीतील उपस्थिती नोंदवहीच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थी यांनी त्यांच्या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले असून त्याबाबतचा पुरावा जोडला आहे.

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन,अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगिर,जि.लातूर यांच्याकडे दि. २७.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर संबंधित संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १३.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये, त्यांची अपिलीय अधिकारी म्हणून रीतसर नेमणूक झाली नसल्याने त्यांच्या

पत्राची दखल घेता येत नाही, याची नोंद घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर जुलै, २००८ मध्ये रुजू झाले असून अपिलार्थीने माहितीची मागणी ज्यावेळी केली होती, त्यावेळी श्री. मोहन उमाटाले नावाचे प्राचार्य या पदावर कार्यरत होते.सध्या ते नियतवयोमानानुसार शिक्षण संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यामध्ये जतन करुन ठेवली जाते, ते अभिलेखे जुने असल्याने, नष्ट केले गेले असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रातील अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुद्दा क्र. (a) व (b) द्वारे अनुक्रमे दत्तात्रय जगन्नाथ कांबळे व सुषमा जगन्नाथ कांबळे या विद्यार्थ्यांच्या इयत्ता ११ वी (शास्त्र) या वर्गाच्या सन २००२ च्या वार्षिक परीक्षेतील उत्तरपत्रिकांची मागणी केल्याचे दिसून येते. माध्यमिक शाळा संहिता,सुधारीत आवृत्ती १९८६ मधील नियम ३.२ (११) च्या ८३ चे व तसेच पृष्ठ क्र.१९३ वरील जोडपत्र (१५) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, माध्यमिक शाळा संहितेतील या तरतुदीनुसार उत्तरपत्रिका जतन करुन ठेवण्याचा कालावधी १८ महिने इतका आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सदर उत्तरपत्रिका नष्ट झाल्याची जी शक्यता वर्तविली आहे, ती सत्य असल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. तथापि हे आदेश निर्गमित झाल्यानंतर ३० दिवसांच्या कालावधीत त्यांनी या उत्तरपत्रिकांच्या त्यांच्या शाळेमध्ये अथवा संस्थेच्या कार्यालयामध्ये कसोशीने शोध घेऊन

ही माहिती अपिलार्थीस देण्याचा सकारात्मक प्रयत्न करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. (c) द्वारे सुषमा जगन्नाथ कांबळे यांच्या इ.११ वीतील जून २००२ ते एप्रिल २००३ या कालावधीतील उपस्थिती रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. माध्यमिक शाळा संहितेतील पृष्ठ क्र.१९३ वरील जोडपत्र (१५) मधील तरतुदींमध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंदवही जतन करुन ठेवण्याचा कालावधी १० वर्षे इतका दर्शविला आहे. अपिलार्थीने माहितीची मागणी केली,त्यादिवशी सदर कालावधी संपुष्टात येत नसल्याने कु.सुषमा जगन्नाथ कांबळे यांच्या या उपस्थिती नोंदवहीची झेराक्स प्रत जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असणे अनिवार्य आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी प्राचार्य पदाचा जुलै,२००८ पासून म्हणजे, द्वितीय सुनावणीच्या पाच महिने अगोदर पदभार स्वीकारला असल्यामुळे त्यांना त्यापूर्वीच्या, या प्रकरणाची माहिती नसल्याचे आयोगासमोर कबूल केले व अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती ३० दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले. हे पाहता जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर,जि.लातूर यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र.(c)शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना ३० दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात्, अपिलार्थीच्या प्रथम अपील प्रकरणी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर,जि.लातूर या संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस दि.१३.१०.२००७ रोजी दिलेला निर्णय अयोग्य आहे, असे आयोगास वाटते. सदर संस्थेस शासनाकडून अनुदान प्राप्त होत असल्याने शासनाच्या नियमांचे पालन करणे या संस्थेस अनिवार्य आहे. प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना माहिती अधिकारी व संस्थेच्या सचिव/अध्यक्ष यांना जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमावे, अशा सूचना निर्गमित करणाऱ्या शिक्षण संचालनालयाचे दि.१८.१.२००६ रोजीचे आदेश पाहता, या

संस्थेच्या सचिवांनी त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली नसल्याचे अपिलार्थीस कळविणे याचा अर्थ, त्यांनी आपली अपिलीय अधिकारी म्हणून जबाबदारी टाळली आहे,असा काढल्यास ते फारसे वावगे ठरु नये. आजमितीस या आदेशामध्ये शिक्षण संचालनालयाने त्यांच्या आदेश क्र.संकीर्ण/केमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८) ६०३७ दि.२६.११.२००७ द्वारे संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिकारी यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे, असे दिसून येते. त्यामुळे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,लातूर यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनुदानित/विनाअनुदानित शिक्षण संस्थांमध्ये माहिती अधिकारी यांच्या नेमणूका केल्या आहेत किंवा कसे, याचा त्यांच्या स्तरावर परत एकदा आढावा घेऊन, अद्यापही माहिती अधिकारी म्हणून ज्या शाळेमध्ये नेमणूका केल्या गेल्या नसतील तर त्या शाळेमध्ये माहिती अधिकाऱ्यांच्या नेमणूकीचे आदेश हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत निर्गमित होतील,असे पहावे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीच्या अर्जाची उपेक्षा केल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरत आहेत. तथापि ते नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई आदेशित करण्यात येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगन्नाथ बसवंतराव कांबळे, द्वारा प्रतिक मेन्स वेअर, गंज पोस्ट ऑफीसजवळ, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी मार्फत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/ २१५२
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

१. श्री. जगन्नाथ बसवंतराव कांबळे : अपिलार्थी
रा.उदगीर जि.लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर,
जि.लातूर.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव,महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीमार्फत
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी हे उपस्थित आहेत,तर जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दि.१५.९.२००७ रोजीच्या अपील अर्जावर अद्यापही कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या

अपिलासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार न केल्याने त्यांनी सदर अपील राज्य माहिती आयोगाकडे केले असल्याचे नमूद करुन,आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि. ०६.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जून, २००१ ते एप्रिल, २००३ या कालावधीशी संबंधित खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"a) Have your College running on a girl's Hostel for girls student?

b) If yes, is it granted by the state or Central Govt.?

c) If yes, refer about its considration date? or duration?"

अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाद्वारे अपेक्षिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीमार्फत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर या संस्थेच्या सचिवांकडे दि.१५.९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर संबंधित संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थीस कोणताही निर्णय दिला नाही अथवा त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप स्पष्ट होत नसल्याने ते अपिलार्थीच्या या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आता पुरवू शकत

नाहीत तसेच ते या पदावर जुलै, २००८ मध्ये रुजू झाले असून अपिलार्थीने माहितीची मागणी ज्यावेळी केली होती, त्यावेळी श्री. मोहन उमाटाले नावाचे प्राचार्य या पदावर कार्यरत होते.सध्या ते नियतवयोमानानुसार शिक्षण संस्थेतून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी का कार्यवाही केली नाही, याचे कारण त्यांना आता सांगता येत नाही.

या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास विशद करताना जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या महाविद्यालयातर्फे शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीद्वारे मुलींकरिता एक वसतीगृह बांधले गेले आहे. अपिलार्थीने ज्यावेळी माहितीसाठीचा मूळ अर्ज महाविद्यालयाकडे सादर केला होता त्यावेळी या वसतीगृहाचे बांधकाम चालू होते. वरील बांधकामाच्या खर्चाशिवाय सदर वसतीगृहाच्या नियमित देखभाल व दुरुस्ती यासाठी त्यांना शासनाकडून कोणताही निधी प्राप्त होत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रातील अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे, याचा बोध होत नाही. आज सुनावणीच्या वेळी अपिलार्थी आयोगासमोर विनापरवानगी अनुपस्थित आहेत.त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे कोणती माहिती अपेक्षित आहे हे, आयोगास देखील ठरविता येत नाही. अशा परिस्थितीत अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस खचितच पात्र ठरविले आहे. तथापि संबंधित जन माहिती अधिकारी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याचे आदेशित करण्यात येत नाही. संबंधित संस्थेच्या सचिवांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही न करुन अधिनियमातील कलम १९(६) भंग केला आहे. सबब शिक्षणाधिकारी

(माध्यमिक),जि.प.लातूर यांना, संबंधित संस्थेच्या सचिवांच्या अशाप्रकारच्या बेपर्वा कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगन्नाथ बसवंतराव कांबळे, द्वारा प्रतिक मेन्स वेअर, गंज पोस्ट ऑफीसजवळ, उदगीर, जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीमार्फत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५३
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

१ श्री. दिलीप रंगनाथराव नलवाड : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता तथा
परिमंडळीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम
परिमंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता तथा
परिमंडळीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम
परिमंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १.३.२००६ रोजीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद अंतर्गत विविध पदावर स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर सामावून घेतलेल्या कर्मचाऱ्यांचा सविस्तर तपशील एका विशिष्ट प्रपत्रामध्ये मागितला होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी दि. १.१.२००० ते २८.२.२००६ असा होता. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये एकूण ९ मुद्यांद्वारे मागितलेल्या माहितीमध्ये - कर्मचाऱ्यांचे नाव, जन्मदिनांक, समावेशनापूर्वी धारण केलेले पद, शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक/आस्थापना,सेवेत रुजू होतानाची अर्हता, स्था.अ.स.पदावर समावेशन करतेवेळीची अर्हता, वयाची ४५ वर्षे पूर्ण केली असल्यास सूट दिली/नाही, स्था.अ.स.पदावर समावेशनापूर्वीचे मंडळ कार्यालय, स्था.अ.स.पदावर समावेशन केल्यानंतरचे मंडळ कार्यालय - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.४.२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही, मात्र यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे विनाक्रमांकाचे व विनादिनांकाचे एक पत्र पाठविले. या पत्रावर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि.२९.४.२००६ रोजीच्या पत्राचा (प्रथम अपील अर्जाचा) संदर्भ दिला आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांनी हे पत्र दि. २९.४.२००६ रोजी अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर पाठविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २९८०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या स्तरावर संकलीत केली जात नाही, याकरिता त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभाग असा वेगळा विभाग अस्तित्त्वात आहे. त्या विभागाकरिता प्राधिकरणाने वेगळा जन माहिती अधिकारी नेमला नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित लिपीक व संबंधित विभागाचे सहायक यांच्यावर अवलंबून राहावे लागत होते, त्यामुळे या विभागाकडून सदरची माहिती संकलीत केल्यानंतर अपिलार्थीस शुल्क भरण्याचे पत्र त्यांच्या कार्यालयाकडून उशिरा पाठविले गेले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजरोजी तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगासमोर केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही कारण अपिलार्थीच्या दि. १.३.२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७(१)च्या तरतुदीनुसार त्यांनी उशिरात उशिरा दि. ३१.३.२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे भाग होते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १.३.२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विनादिनांकाच्या व विनाक्रमांकाच्या पत्रामध्ये अपिलार्थीने दि. २९.४.२००६ रोजी दिलेल्या प्रथम अपिलाचा संदर्भ आहे. यावरुन जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस हे पत्र दिनांक २९.४.२००६ च्या नंतर मिळाले असल्याचे सहज सिध्द होत आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्ज केलेल्या दिनांकापासून माहिती अधिकार अधिनियमाद्वारे माहिती देण्यासाठी विहित केलेला अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिले असल्याने, अधिनियमातील कलम ७(६) नुसार

अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षात संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नव्हती व सदर माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभाग जो वेगळयाने कार्यरत आहे, त्या विभागाकडून संकलीत करुन घ्यावयाची होती. संबंधित विभागाकडून त्यांना माहिती पुरविण्यास विलंब लागल्यामुळे त्यांना सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देता आली नाही, असे त्यांनी आयोगास आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे, यावरुन असे सिध्द होते की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यास आस्थापना विभागाचे जे कर्मचारी/अधिकारी त्यांच्या कार्यालयात कार्यरत आहेत, त्यांनी मूळात जन माहिती अधिकारी  यांच्याकडे विहित मुदतीत माहिती न दिल्याने अंतिमतः अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळासाठी वंचित राहावे लागले. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील संबंधित आस्थापना विभागातील कर्मचारी या प्रकरणी जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे आस्थापना विभागातील त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी, ज्या सर्वांना जन माहिती अधिकारी म्हणून समजण्यात यावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मधील तरतुदीनुसार तरतुद आहे, या सर्वांवर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग औरंगाबाद यांना, संबंधितांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत  आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास जबाबदार असणारे आस्थापना शाखेतील त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप रंगनाथराव नलवाड,'शिवरंग' अमर हॉटेलच्या पाठीमागे,बार्शी रोड,मु.पो.ता.जि.लातूर-४१३५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र. २१५४/२००७ व २१५५/२००७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५४ व २१५५
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

१ श्री. दिलीप रंगनाथराव नलवाड : अपिलार्थी
रा.लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधीक्षक अभियंता तथा
परिमंडळीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम
परिमंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता तथा
परिमंडळीय अधिकारी,सार्वजनिक बांधकाम
परिमंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त दोन प्रकरणांत अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०९.२००७ रोजी नोंदविलेली द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोन अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नसल्याचे निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. मात्र या दोन अपिलाद्वारे त्यांनी एका विशिष्ट प्रपत्रात मागितलेली आस्थापनाविषयक माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपील क्र. २१५४/०७ मध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीमध्ये- मंडळाचे नाव, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदाची मंजूर पदे, स्था.अ.स ची भरलेली/कार्यरत पदे,मंडळात स्था.अ.स.ची रिक्त पदे,शासनाकडून परिमंडळास मंजूर पदे, आकृतीबंधापूर्वी मंजूर पदे,आकृतीबंधानंतर मंजूर पदे, आकृतीबंधाप्रमाणे दि.२८.०२.२००६ रोजी रिक्त असलेली पदे - या मुद्यांचा समावेश होता व अपील क्र. २१५५/०७ मध्ये त्यांनी मागितलेली माहितीमध्ये - उमेदवाराचे नाव, उमेदवाराचा जन्म दिनांक, उमेदवाराची अर्हता, उमेदवाराची निवड झाल्यानंतर पदस्थापना दिलेले मंडळ कार्यालय - या मुद्यांचा समावेश होता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १.३.२००६ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद अंतर्गत विविध पदावर स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या पदावर सामावून घेतलेल्या कर्मचाऱ्यांचा सविस्तर तपशील एका विशिष्ट प्रपत्रामध्ये मागितला होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी अपील क्र.२१५४/०७ संदर्भात दि. १.१.२००० ते २८.२.२००६ व अपील क्र. २१५५/०७ संदर्भात दि. १.१.१९९९ ते २८.२.२००६ असा असून अपिलार्थीने ही माहिती अपील क्र. २१५४/०७ संदर्भात एकूण ८ मुद्यांद्वारे व अपील क्र २१५५/०७ संदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दोनही प्रकरणी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.४.२००६ रोजी स्वतंत्र प्रथम अपील केले. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही, मात्र यासंदर्भात

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे विनाक्रमांकाचे व विनादिनांकाचे एक पत्र पाठविले. या पत्रावर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या दि.२९.४.२००६ रोजीच्या पत्राचा (प्रथम अपील अर्जाचा) संदर्भ त्यांनी दिला आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांनी हे पत्र दि. २९.४.२००६ नंतर पाठविल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २९८०/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या स्तरावर कोणत्याही प्रकारे सहज उपलब्ध असत नाही अथवा ती संकलीत केली जात नाही, याकरिता त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभाग वेगळा विभाग अस्तित्त्वात आहे. तथापि त्या विभागासाठी प्राधिकरणाने कोणत्याही वेगळया जन माहिती अधिकाऱ्याची नेमणूक केली गेली नसल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात संबंधित लिपीक व संबंधित विभागाचे सहायकावर पूर्णत: अवलंबून राहावे लागत होते, त्यामुळे या विभागाकडून सदरची माहिती संकलीत केल्यानंतर अपिलार्थीस शुल्क भरण्याचे पत्र त्यांच्या कार्यालयाकडून उशिरा पाठविले गेले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजरोजी तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती आठ दिवसांच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगासमोर केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही कारण अपिलार्थीच्या दि. १.३.२००६ रोजीच्या अर्जास अधिनियमातील कलम ७(१)च्या तरतुदीनुसार त्यांनी उशिरात उशिरा दि. ३१.३.२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे भाग होते. परंतु या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १.३.२००६ रोजीच्या दोनही मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या विनादिनांकाच्या व विनाक्रमांकाच्या पत्रामध्ये अपिलार्थीने दि. २९.४.२००६ रोजी दिलेल्या प्रथम अपिलाचा संदर्भ

दिला आहे. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मूळ अर्ज केलेल्या दिनांकापासून अधिनियमाद्वारे अनुज्ञेय कालावधी व्यपगत झाल्यानंतर दिले असल्याने, अधिनियमातील कलम ७(६) नुसार अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नव्हती व सदर माहिती त्यांना, त्यांच्या कार्यालयातील आस्थापना विभाग जो वेगळयाने कार्यरत आहे, त्या विभागाकडून संकलीत करुन घ्यावयाची होती. संबंधित विभागाकडून त्यांना माहिती पुरविण्यास विलंब लागल्यामुळे त्यांना सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देता आली नाही, असे त्यांनी आयोगास आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. यावरुन असे सिध्द होते की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती देण्यास आस्थापना विभागाचे जे कर्मचारी/अधिकारी त्यांच्या कार्यालयात कार्यरत आहेत, त्यांनी मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत माहिती न दिल्याने अंतिमतः अपिलार्थीस त्यांना देय असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ काळासाठी वंचित राहावे लागले. अशाप्रकारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचारी या प्रकरणी जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची व अपील अर्जाची अक्षम्य उपेक्षा करुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे आस्थापना विभागातील त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी ज्या सर्वांना जन माहिती अधिकारी म्हणून समजण्यात यावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, या सर्वांवर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,औरंगाबाद यांना, आस्थापना विभागातील या विषयाशी सर्व संबंधितांनी उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य

परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र. २१५४/०७ व २१५५/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यास जबाबदार असणारे आस्थापना शाखेतील त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी या सर्वांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिलीप रंगनाथराव नलवाड,'शिवरंग' अमर हॉटेलच्या पाठीमागे,बार्शी रोड,मु.पो.ता.जि.लातूर-४१३५१२.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,

औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५६
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मो.अन्वरउल्ला खान पिता मो.बरकतउल्ला खान,रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (पाणीपुरवठा), नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये मुख्य माहिती आयुक्त,मुंबई यांच्याकडे दि. २३.०८.२००६ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही माहिती न दिल्याने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. २४.४.२००६ रोजी प्रथम अपील केले या प्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र क्र.१२९८/०६ द्वारे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या

कार्यालयात दि. २९.४.२००६ रोजी दुपारी ४.०० वाजता सुनावणी ठेवल्याचे कळविले. या पत्रात दिलेल्या सूचनेप्रमाणे ते जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. सुनावणीनंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा निर्णय अपिलार्थीस लेखी स्वरुपात नंतर कळवतील, असे आश्वासन दिले, तथापि आजतागायत त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपिलावरील निर्णय प्राप्त झाला नाही. मात्र ५१ दिवसांनंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. ४.५.२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून त्यांनी त्यासोबत काही माहिती पुरविली. या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे त्यांना आढळून येत आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आदेश न देण्याचे कारण आज रोजी सुनावणीसाठी उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत, कारण अपिलार्थीने प्रथम अपील करतेवेळी जन अपिलीय अधिकारी या पदावर श्री. लोळापोळ या नावाचे कार्यकारी अभियंता कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय का दिला नाही, याचे कारण ते सांगू शकत नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या टप्प्यावर अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते, सबब सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. २४.४.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, झालेला व होणारा विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले निर्णय द्यावेत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोग,खंडपीठ,औरंगाबाद यांच्याकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.२४.४.२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मो.अन्वरउल्ला खान पिता बरकतउल्ला खान,९-४-४५५,कय्युम प्लॉटस्, नांदेड-४३१ ६०४.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, (पाणीपुरवठा विभाग) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (पाणीपुरवठा विभाग) नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५७
निर्णय दिनांक ०२-०१-२००९

१ श्री. वसंत पंडीतराव देशमुख, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सहायक आयुक्त-१,
महानगरपालिका, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (महसूल),
महानगरपालिका, औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्री. सदाशिव अंकुशराव बाबर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी , जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना खोटी व अपूर्ण माहिती पुरविल्याचे नमूद करुन त्यांना संपूर्ण माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आयोगाने आदेशित करण्याची विनंती त्यांनी या अर्जामध्ये अंतिमतः केली आहे. याच अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून - त्रयस्थ पक्ष श्री.सदाशिव बाबर, कनिष्ठ लिपीक यांनी

महापालिकेकडे केलेले अर्ज, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी मुलाखतीस हजर राहण्याबाबत दिलेल्या मुलाखतपत्राची छायाप्रत व स्वातंत्र्यसैनिक संवर्गातील निवड झाल्यानंतर काढलेल्या आदेशाची छायांकित सत्यप्रती- या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः दि. ११.७.२००७ रोजी केलेल्या मूळ अर्जाद्वारे सन १९९९ या वर्षामधील त्रयस्थ पक्ष श्री. सदाशिव अंकुशराव बाबर, कनिष्ठ लिपीक यांच्यासंदर्भात एकूण ४ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - श्री. बाबर यांनी नोकरीसाठी दिलेला अर्ज व त्यासोबत जोडलेली सर्व सहपत्रे, जागा भरण्याबाबत वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दिलेल्या जाहीरातीची झेरॉक्स प्रत, महानगरपालिकेने दिलेल्या मुलाखत पत्राची व श्री. बाबर यांना दिलेल्या नेमणूकीच्या आदेशाची सत्यप्रत- या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस या संदर्भातील माहिती पुरविली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली दिसून येते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.८.२००७ रोजी आपले आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ३ आठवडयाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ६.९.२००७ रोजी परत, त्यांना दि. २३.७.२००७ रोजी पुरविलेलीच माहिती पाठविली. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी एकच माहिती दोनवेळा दिली असून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व खोटी आहे. सदर माहिती अपूर्ण व खोटी आहे, हे कशावरुन, याची विचारणा आयोगाने केली असता त्यांनी असे सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२३.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.३ च्या संदर्भात, या पत्रासोबत मुलाखतीची छायाप्रत जोडली असल्याचे म्हटले आहे. तथापि सदर छायाप्रतीचे अवलोकन करता, हे, मुलाखतीसाठी महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेले नसून मुलाखतीसाठी, आवश्यक असलेल्या उमेदवारांची माहिती नोंदविण्याचे प्रपत्र (Bio-data) आहे. या पत्रावरुन मुलाखती नेमक्या कधी घेतल्या याचा कोणताही बोध होऊ शकत नाही, त्यामुळे हे मुलाखतीसाठी पाठविण्यात आलेले पत्र होऊ शकत नाही. बाकी उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविली आहे. याचवेळी अपिलार्थीने त्यांना स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांतून देण्यात येणाऱ्या नोकरीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नसल्याचे प्रतिपादन केले.

त्रयस्थ पक्ष श्री. सदाशिव बाबर यांनी अपिलार्थीस त्यांच्याविषयी माहिती देण्यासाठी आक्षेप नोंदविला असून त्यांची माहिती अपिलार्थीस पुरविल्यास अपिलार्थीकडून त्या माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.तथापि या मुद्यावर पुरेपूर संधी देऊनही त्रयस्थ पक्षाने अपिलार्थी हे कशाप्रकारे यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीचा गैरवापर करतील,यासंदर्भात कोणताही खुलासा आयोगास केला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस दि. २३.७.२००७ रोजी माहिती पुरविताना ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. त्यावेळी

श्री. बी.ए.वाहुळ नावाचे अधिकारी कार्यरत होते. ते नियतवयोमानानुसार दि. ३०.११.२००८ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण व खोटी माहिती पुरविली असल्याचा त्यांचा युक्तिवाद समर्थनीय आहे, कारण जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २३.७.२००७ रोजीच्या पत्रामध्ये "मनपा मुलाखतीच्या वेळी जे पत्र दिले होते त्या मुलाखतीच्या पत्राची छायाप्रत" पत्रासोबत जोडली आहे, असे म्हटले आहे.परंतु अपिलार्थीस प्रत्यक्षात पुरविण्यात आलेल्या व जन माहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविलेल्या संबंधित मूळ नस्तीची पाहणी करता अपिलार्थीस पुरविण्यात आलेले हे कागदपत्र म्हणजे मुलाखतपत्र होऊ शकत नाही. त्या कागदपत्रांच्या वर मुलाखतीसाठी आवश्यक असलेली 'उमेदवारांची माहिती प्रपत्र' असे शीर्षक आहे. तसेच या प्रपत्राची सखोल पाहणी करता, यामध्ये अपिलार्थीस मुलाखतीसाठी बोलाविल्याचा कोणताही उल्लेख नाही. यावरुन अपिलार्थीस मुलाखतपत्र या नावाखाली जन माहिती अधिकारी यांनी दिलेली ही माहिती दिशाभूल करणारी व चुकीची असल्याचे दिसून येते. जर श्री. बाबर यांना महानगरपालिकेने मुलाखतीसाठी पत्र पाठविले नसेल तर त्याप्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीमध्ये उल्लेख करणे गरजेचे होते, परंतु त्यांनी असा उल्लेख करण्याचे टाळून अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे उमेदवारांचे माहितीचे प्रपत्र देऊन चुकीची माहिती दिली. या सर्व प्रकारावरुन औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये १९९९ साली झालेल्या भरतीमध्ये गैरप्रकार केला गेला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या प्रकरणी सचिव (नगर विकास विभाग) मंत्रालय, यांच्यास्तरावरुन  या भरतीची चौकशी होणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब सचिव (नगरविकास) यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी श्री. सदाशिव अंकुशराव बाबर यांना औरंगाबाद महानगरपालिकेने कनिष्ठ लिपीक या पदावर दि. २२.१०.१९९९ रोजी दिलेल्या नेमणूकीची त्यांच्या स्तरावर चौकशी करुन संबंधितावर आवश्यक ती कारवाई करावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द झाले असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. ३ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांच्यासाठीच्या भरतीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीच्या दि. ११.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता या अर्जामध्ये, अपिलार्थीने स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांना नोकरी देण्यासंदर्भात कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांना मागितली नव्हती. स्वातंत्र्य सैनिकांना देण्यात येणाऱ्या नोकरी संदर्भातील माहितीचा त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलामध्ये समावेश करुन आपल्या मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती वाढविली आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये मूळ अर्जातील माहितीची व्याप्ती अर्ज केल्यानंतर कोणत्याही टप्प्यावर वाढविण्याची कोणतीही तरतुद नसल्याने व द्वितीय अपील अर्जातील वाढीव व्याप्तीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाच्या संदर्भात देणे अधिनियमामध्ये अभिप्रेत नसल्याने अपिलार्थीचा सदर मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांचा आक्षेप नोंदविला असून या माहितीचा गैरवापर होईल, अशी त्यांना भीती वाटत असल्याचा युक्तिवाद केला, तथापि या माहितीचा अपिलार्थी हे निश्चितपणे कशाप्रकारे गैरवापर करतील, याचे स्पष्टीकरण ते आज आयोगास सांगू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची आहे,असे दिसून येते. कारण कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणामध्ये नोकर भरतीची प्रक्रिया ही मूळात पारदर्शक असणे अभिप्रेत आहे. त्यामुळे त्रयस्थ पक्षाने केलेला अर्ज व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे, त्यांना मुलाखतीसाठी बोलाविलेले मुलाखतपत्र, त्यांचे नेमणूक पत्र इ. माहिती, मूळात महानगरपालिकेकडे कर्मचारी नियुक्तीसंदर्भात अस्तित्त्वात असलेल्या अनेक नस्त्यांवर उपलब्ध आहे, निवड झालेल्या उमेदवारांना सार्वजनिक व शासकीय निधीमधून त्यांचे

वेतन अदा केले जाणार आहे, हे पाहता, सार्वजनिक स्वरुपाची असल्याचे सिध्द होत आहे व ही माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत कोणताही आगंतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता दूरवरदेखील नसल्याने, त्रयस्थपक्षाची, अपिलार्थीस माहिती न देण्याची विनंती, आयोग अमान्य करीत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे सिध्द झाल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे.सबब संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. सचिव (नगरविकास) यांनी औरंगाबाद महानगरपालिकेने दि. २२.१०.१९९९ रोजी श्री.सदाशिव अंकुशराव बाबर यांना कनिष्ठ लिपीक या पदावर दिलेल्या नेमणूकीची सखोल चौकशी आपल्यास्तरावरुन करुन संबंधितावर योग्य ती कारवाई करावी.
४. आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. वसंतराव पंडीतराव देशमुख, घ.नं.के.१४,अरिहंतनगर,आकाशवाणीमागे, जैनमंदिराजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त-१,महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (महसूल), महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. सदाशिव अंकुशराव बाबर (त्रयस्थ पक्ष),कनिष्ठ लिपीक महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. आयुक्त महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव,नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११२

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, अपिलार्थी
राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टॅण्ड रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद,
परभणी

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना १९ दिवसाच्या विलंबाने माहिती दिली, तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी विलंब होऊनही जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई केली नाही व अपिलार्थी यांना ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेश दिले. जन अपिलीय अधिकारी यांचे हे आदेश त्यांना मान्य नाहीत व जन माहिती अधिकारी यांच्याकडून विलंबाने माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास झाला, म्हणून त्यांना योग्य न्याय मिळावा, अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०७-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्रीमती मेहरुन्निसा बेगम भ्र. जमील हुसेन घर नं. ३५७, वार्ड नं. ५ येथील घराच्या बांधकाम परवानगीबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २३-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला, तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१०-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीपासून १२ दिवसाच्या विलंबाने माहिती पुरविली, संपूर्ण माहिती दिली नाही व जी दिली ती विलंबाने दिली असा निष्कर्ष काढला आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीस मागणी केलेली माहिती त्यांना विलंबाने का पुरविली हे सांगण्यासाठी, आवश्यक ती पुरेशी संधी देऊनही ते या विलंबाचे कोणतेही समर्थन आयोगासमोर करु शकले नाहीत. अपिलार्थीने माहिती अधिका-याकडे माहितीसाठीचा प्रथम अर्ज केला त्यावेळी श्री. एन. कुमार नावाचे मुख्याधिकारी या पदावर कार्यरत होते. सध्या ते मुख्याधिकारी, नगरपरिषद, कराड, जिल्हा सातारा या पदावर कार्यरत आहेत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या दिनांक ११-०७-२००६ रोजीच्या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०८-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रतिसाद देणे आवश्यक असतांनाही जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०८-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या विलंबाचे समर्थन उपस्थित जन माहिती अधिकारी पुरेशी संधी देऊनही आयोगास करु शकले नाहीत. यावरुन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी विलंब लावल्याचे कोणतेही समर्थन असू शकत नाही, असा निष्कर्ष आयोग काढत आहे. सबब उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा १२ दिवस विलंबाने माहिती देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. साबेर हुसेन गुलाम हुसेन सिद्दीकी, राजधानी हॉटेलच्या पाठीमागे, न्यू बसस्टॅण्ड रोड, परभणी.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३० यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५८

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ श्री. दखने दिलीप बापुराव, अपिलार्थी
मु. अंतरवाली सराटी, पो. नालेवाडी,
तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सिंचन) उपविभाग, परतूर,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सिंचन), जालना

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सिंचन) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी परतूर व मंठा

तालुक्यातील गावतलाव व बंधारे यांची माहिती न दिल्यामुळे त्यांनी आयोगाकडे सदर अपील केल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज करुन त्यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००६ ते ०३-०८-२००७ पर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेच्यासंदर्भात परतूर व मंठा तालुक्यात झालेल्या गावतलावांच्या कामाबाबत काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये, गावतलावांची संख्या, किंमत, कामगारांचे हजेरीपत्रक, मजुरांचे ओळखपत्र, अंदाजपत्रकाच्या झेरॉक्स, मजुरांच्या बॅंक खात्याच्या पासबुकाची झेरॉक्स, ही माहिती समाविष्ट आहे. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असून या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये १८३६० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व सदर शुल्क भरल्याचा पुरावा सादर केल्यानंतर अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कारवाई करण्याचे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीसाठीचा प्रथम अर्ज केल्यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी अपिलार्थीस योग्य तो प्रतिसाद देऊन आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केला नाही तसेच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाबरोबर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा न दिल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेण्याचे कारण विचारले असता त्यांनी, अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क न भरल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे सांगितले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन

अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भूमिका ही सर्वथा गैर आहे, असे आयोगाचे मत आहे. अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीअन्वये अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर ३० ते ४५ दिवसात निर्णय घेणे हे त्यांना अनिवार्य आहे. येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे त्यांच्याकडे दाखल होणा-या प्रत्येक अपील अर्जावर त्यांनी सतर्कतेने कारवाई करावी, अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. व्यक्तिशः माहितीची एकदा मागणी केल्यानंतर, आपल्याला आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे पूर्ण उत्तरदायित्व अर्जदारावर येते. या प्रकरणी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधी व किती वेळा उपस्थित राहीले याचा त्यांनी व्दितिय अपील अर्जामध्ये कोणताही उल्लेख केला नाही किंवा या संदर्भात कोणताही पुरावा आयोगासमोर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सादर केला नाही. आजही सुनावणीस अपिलार्थी विना परवानगी गैरहजर आहेत. अपिलार्थीने आपल्या अपील अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा सादर न केल्याने, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय होऊ शकत नाही. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १७-१०-२००५ रोजी RTI २००५/CR-३१५/०५/५ या क्रमांकाव्दारे प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेमध्ये माहिती मागण्याच्या अर्जाचा विहित नमुना प्रपत्र "अ" या स्वरुपात प्रसिध्द केला आहे. यातील मुद्दा क्रमांक ४ चे अवलोकन करता, दारिद्र्यरेषेखालील अर्जदाराने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्यासंबंधीच्या पुराव्याची फोटो कॉपी आपल्या प्रथम अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, असे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा जोडला नसल्याने व या परिच्छेदाच्या वरील भागातील वस्तुस्थिती लक्षात घेता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दखने दिलीप बापुराव, मु. अंतरवाली सराटी, पो. नालेवाडी, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सिंचन) उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद (सिंचन), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१५९

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ श्री. दशरथ एकनाथ कांबळे, अपिलार्थी

शास्त्री मोहल्ला, जुना जालना,

तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांना सुनावणीमध्ये आदेशित करुनही अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ते टाळाटाळ करत असल्याचे नमूद करुन झालेल्या व चालू कामांची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असल्याचे त्यांनी या अपील अर्जात पुढे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०१-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००५ ते दिनांक २२-०१-२००७ पर्यंतच्या कालावधीतील टेस्टींग बोरच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. यामध्ये टेस्टींग बोरचे अंदाजपत्रक, वर्क ऑर्डर, झालेल्या बिलाची एम. बी., चेक नंबर, इत्यादी मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०६-२००७ रोजी सुनावणी घेतली व यासंदर्भातील आपले आदेश त्यांनी दिनांक २०-०६-२००७ रोजी पारित केले. या आदेशाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनाशुल्क माहिती पुरविण्याचे आदेशित केले. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी युक्तिवाद आयोगास सादर करुन त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपविभागीय अभियंता यांनी त्यांना दिनांक २२-१२-२००८ रोजी उपविभागीय कार्यालय, परतूर येथे दाखविली. या माहितीवरुन संबंधिताचे समाधान झाले असल्याचे त्यांनी त्याच दिवशी संबंधीत उप विभागीय अभियंता यांना लेखी कळविले होते. त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी उपविभागीय अभियंता, परतूर यांना अपिलार्थीने लिहिलेल्या दिनांक २२-१२-२००८ रोजीच्या पत्राची प्रत आयोगास सादर केली. जन माहिती अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली एकूण किती उपविभाग आहेत व त्या सर्व उपविभागामध्ये अशा प्रकारची कामे झाली आहेत किंवा कसे याबाबत आयोगाने जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी, त्यांच्या अधिपत्याखाली एकूण पाच उपविभाग कार्यरत असल्याचे सांगितले. परतूर वगळता इतर विभागांमध्ये बोअरींगची कामे झाली आहेत किंवा कसे याबाबत त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने

कार्यकारी अभियंता यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत माहिती मागितल्याचे दिसून येते, त्यामुळे अद्यापही अपिलार्थीस उर्वरित चार कार्यालयांकडून माहिती देय होत आहे व ही माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांअभावी कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप सोपे व व्याप्ती अत्यंत सीमीत होती. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात ज्यावेळी ते स्वतः हजर राहतील त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना देण्यासाठी तयार ठेवणे व आवश्यक ते शुल्क त्यांच्याकडून प्राप्त करुन ती त्यांना अधिनियमातील विहित मुदतीत देणे एवढीच मर्यादित प्रक्रिया या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अभिप्रेत आहे, तथापि आज रोजी उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांना परतूर वगळता इतर उपविभागामध्ये अशा प्रकारची कामे झाली आहेत किंवा कसे यासंबंधी देखिल आयोगास कोणतेही स्पष्टीकरण देता आले नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी आता उर्वरित उपविभागांकडील, अपिलार्थीने विचारणा केलेली माहिती, त्यांच्या कार्यालयांतर्फे गोळा करुन त्याचे संकलन करावे व अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित झाल्यास त्यांना ही माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत उपलब्ध करुन द्यावी. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस त्यांचा प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाठविणे अनुज्ञेय असणार नाही, तसेच या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाही.

जन अपिलीय अधिकारी यांचा प्रथम अपिलावरील निर्णय पाहता, या अपील निर्णयावर सहाय्यक अधीक्षक अभियंता यांची सही असल्याने जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय राज्य माहिती आयोग अवैध ठरवित आहे. अधीक्षक अभियंता यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्रथम अपिलावर निर्णय देतांना त्यांनी स्वतः त्यावर स्वाक्षरी करणे गरजेचे आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या अधिपत्याखालील परतूर उपविभाग वगळता उर्वरित उपविभागांकडील अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे एकत्रितपणे संकलीत करुन

ती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दशरथ एकनाथ कांबळे, शास्त्री मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६०

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ श्री. दिनकर भिमराव लहाणे, अपिलार्थी
रा. निधोना, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तहसीलदार,
तहसील कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, जालना

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तहसीलदार, जालना |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व उपविभागीय अधिकारी, जालना हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती न दिल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे निधोना तालुका जिल्हा जालना येथील श्री. हसनराव भिमराव लहाणे यांच्या नावावर असलेल्या जमिनीचा फेर नंबर ३०

ची नक्कल मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती पुरविली आहे, तथापि या पत्रावर जरी दिनांक ०९-०७-२००७ अशी तारीख दर्शविली असली तरी हे पत्र त्यांचे नायब तहसीलदार यांच्या कार्यालयातून दिनांक २५-०७-२००७ रोजी निर्गमीत झाले आहे, म्हणजेच हे पत्र १६ दिवस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात विना कारवाई पडून होते. यावरुन महसूल विभागाच्या खालच्या पातळीवरील अधिकारी माहिती अधिकार अधिनियमास किती किंमत देतात याची कल्पना येते. अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी त्यांच्या विभागाकडील सर्व जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील वेळेचे मुदतीतचे महत्व त्यांना वटवून देणारे परिपत्रक त्यांच्या स्तरावरुन काढल्यास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीची निश्चित कल्पना त्यांच्या विभागातील अधिका-यांना येऊ शकले असे आयोगास वाटते. अपेक्षित असलेली माहिती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील उपविभागीय अधिकारी, जालना यांच्याकडे केल्याचे दिसून येते. प्रत्यक्षतः या प्रकरणी तहसीलदार, जालना हे जन अपिलीय अधिकारी आहेत, त्यामुळे उपविभागीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज तहसीलदार जालना यांना दिनांक १७-०८-२००७ रोजी पाठविला. या अपील अर्जावर तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन अधिनियमातीलल कलम १९ (६) चा भंग केल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली फेर क्रमांक ३० ची नक्कल मान्य नाही. श्री. हसनराव भिमराव लहाणे यांच्या नावावर ३ एकर २५ गुंठे जमीन असतांना त्यांच्या नावावर ती २ हेक्टर ३८ आर कशी झ ाली याचा त्यांना बोध होत नाही व यासंदर्भात केलेल्या फेर क्रमांकाची नक्कल त्यांना अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात दिनांक २५-०७-२००७ रोजी फेर क्रमांक ३० ची नक्कल विनामूल्य पुरविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस माहिती मिळाली असल्याकारणाने त्यांनी या अपिलाची सुनावणी घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांचा हा युक्तिवाद सर्वथा गैर असून माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे प्रत्येक अपिलावर अधिनियमातील कलम १९ (६) च्या

तरतुदीन्वये निर्णय घेणे गरजेचे आहे. इतःपर यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या शंकेचे निरसन तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडे स्वतंत्र अपील करुन करता येईल. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून केल्या गेलेल्या एकत्रिकरण योजनेत अपिलार्थीच्या क्षेत्रामध्ये फरक पडला असावा अशीही शंका त्यांनी आयोगासमोर व्यक्त केली. वरील परिस्थिती पाहता, अपिलार्थीने त्यांच्या गा-हाण्याची तड लावण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडे जाणे संयुक्तीक राहिल, असे आयोगास वाटते. त्रयस्थ पक्षाने त्यांच्याविषयी अपिलार्थीने विचारलेली माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची हरकत नसल्याचे त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली फेर क्रमांक ३० ची नक्कल अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्यामुळे, अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जावर विचार करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर काही शंका असल्यास, त्या शंकाचे निरसन करण्यासाठी वेगळे प्राधिकरण अस्तित्वात असतांना, अपिलार्थीच्या शंकांची दखल घेणे आयोगाच्या अधिकारितेअभावी शक्य वाटत नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिनकर भिमराव लहाणे, रा. निधोना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६१

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ श्री. दिनकर भिमराव लहाणे, अपिलार्थी

रा. निधोना, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,

जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. भिमराव मारोती लहाणे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०९-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती पुरविली नसल्याने त्यांनी आयोगाकडे हे विचाराधीन अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

> "मौजे निधोना येथे माझे वडील नामे भिमराव मारोती लहाणे स. नं. ४ मध्ये त्यांच्या नांवे ५ एकर जमीन होती व गटामध्ये फक्त ७९ आर जमीन होती व गटामध्ये फक्त ७९ आर जमीन दाखविण्यात आलेली आसुन सदरील बाकी रहीलेली जमीन कुठे गेली व कोणाच्या नावे गेली या बाबत तपशिलवार माहीती मिळणेबाबत. "

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या प्रथम अपिलासंदर्भात कोणताही निर्णय दिला नाही. तथापि अपिलार्थीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने केलेला प्रथम अर्ज विहित नमुन्यात नसल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या-कडून आदेश प्राप्त न झाल्याचे नमूद करुन त्यामुळे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या वडिलाच्या नावाने सर्व्हे नं. ४ मध्ये पूर्वी ५ एकर जमीन होती, परंतु गटामध्ये ७९ आर इतकीच जमीन दाखविण्यात आली असून बाकी राहिलेली जमीन कोठे गेली व कोणाच्या नावाने गेली याबाबत त्यांना तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे. या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक ०३-०७-२००७ रोजी केलेल्या अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता आले किंवा कसे याची त्यांना निश्चितपणे माहिती

नाही. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सशुल्क हस्तगत करुन घेण्यासाठी कळविले होते, तथापि तदनंतरही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी हजर झाले नाहीत. अपिलार्थीस त्यांनी दिनांक २२-०८-२००७ रोजीचे पत्र पाठविल्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे पुरावा मागितला असता सदर पुरावा जन माहिती अधिकारी, आयोगास सादर करु शकले नाहीत, तसेच सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही, असे अपिलार्थीने सुनावणीमध्ये सांगितले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र अपिलार्थीस पाठविले किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज अधिनियमाव्दारे विहित केलेल्या प्रपत्रात नसल्याने त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे सांगितले. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर असून त्यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कारवाई करणे आवश्यक होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नसल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या वडिलाच्या मालकीच्या जमिनीचे क्षेत्र कशा प्रकारे कमी झाले आहे व उर्वरित जमीन कोणाच्या नावाने व कधी गेली ही माहिती अपेक्षित असल्याचे दिसून येते. यासंदर्भात प्रभारी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांनी असे स्पष्ट केले की, मुंबई जमीन एकत्रिकरण कायदा १९४७ च्या तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयातर्फे जालना जिल्ह्यातील जमिनीचे एकत्रिकरण करण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रिकरण करुन प्रत्येक तुकड्याला स्वतंत्र गट नंबर देण्यात आला, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या वडिलांच्या मालकीच्या जमिनीचे क्षेत्र कमी कसे झाले हे त्यांना संबंधीत जमिनीची मोजणी केल्याशिवाय सांगता येणार नाही आणि ही मोजणी करण्याकरिता, अपिलार्थीने जमाबंदी आयुक्त यांच्याकडे यासंदर्भात एकत्रिकरण कायदा १९४७ मधील कलम ३२ (१) प्रमाणे क्षेत्रामधील दुरुस्तीसंदर्भात अपील करणे गरजेचे आहे. या अपिलावर जमाबंदी आयुक्त ज्याप्रमाणे निर्णय देतील त्याप्रमाणे तद्नंतर ते पुढील कारवाई करु शकतील. सध्या ते अपिलार्थीच्या वडिलांच्या मालकीच्या नावाने जे गट अस्तित्वात आहेत त्याच गटांची अपिलार्थीच्या अर्जानुसार मोजणी करु शकतात. जन अपिलीय अधिकारी यांनी स्पष्ट केलेली पार्श्वभूमी पाहता, अपिलार्थीस त्यांच्या गा-हाण्याची तड लावण्याकरिता जमाबंदी आयुक्त यांच्याकडे जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपील करणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. हे अपील दाखल

करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य देण्याची आज रोजी सुनावणीमध्ये तयारी दर्शविली आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस जमाबंदी आयुक्त यांच्याकडे अपील करण्यासाठी आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात व अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्याकडे एकत्रिकरण कायद्यातील संबंधीत तरतुदीनुसार अपील करावे व आपल्या गा-हाण्याची तड लावावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत कागदपत्रांच्या प्रती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

औरंगाबाद

दिनांक ०३-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दिनकर भिमराव लहाणे, रा. निधोना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमि अभिलेख, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, नवीन प्रशासकीय इमारत, विधान

भवनासमोर, साधुवासवाणी, चौक, रेल्वेस्टेशन जवळ, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६२

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ सौ. शारदा दासराव खरसडे, अपिलार्थी
मु. पो. तांदुळवाडी, तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, श्री संत ज्ञानेश्वर बहु. प्रशाला,
तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव श्री. संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ
तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दिनांक १३-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास व पत्रव्यवहार घेण्यास जाणुन बुजून टाळाटाळ केल्याचे व त्यांना आरेरावी शब्दात वागणूक देत असल्याचे नमूद केले आहे व त्याचबरोबर आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०१-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. संत ज्ञानेश्वर बहु. प्रशाला तांदुळवाडी ता. परंडा यांच्याकडे एकूण सहा मुद्दयांव्दारे शाळेसंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये असे उत्तर दिले की, ते श्री. संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ तांदुळवाडी या संस्थेचे नोकर असल्याने संस्थेच्या आदेशशिवाय ते कोणतीही माहिती देऊ शकत नाहीत, त्यामुळे अपिलार्थीने संबंधीत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांच्याकडे योग्य ती फीस भरुन मागणी करावी. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त अशा प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या प्रथम अपिलाच्या प्रतीवरुन या अपिलावर अपिलार्थीने सही व दिनांक नमूद केला नसल्याचे दिसून येते. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने व्यक्तिशः मागणी केलेली माहिती घेण्यासाठी त्या स्वतः त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाल्या नाहीत. अथवा संस्थेच्या कार्यालयाकडे उपस्थित झाल्या नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये आयोगाकडे दाखल केलेला कथित प्रथम अर्ज त्यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नाही, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना कोणताही निर्णय घेता आला नाही. अपिलार्थी हे अशा प्रकारचे अर्ज त्यांच्या संस्थेच्या संबंधीत शाळेकडे अथवा संस्थेकडे वारंवार करत असतात व त्यांना वेळोवेळी माहिती पुरविण्यात येते. केवळ त्यांच्या संस्थेस त्रास देण्यासाठी अपिलार्थी अशा प्रकारचे अर्ज वारंवार करुन त्यांच्या कार्यालयास वेठीस धरत असतात. माहितीच्या अधिकाराचा गैरवापर करुन घेण्याचा अपिलार्थी व त्यांच्या पतीचा उद्देश असतो. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०१-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्या पतीने दिनांक १३-०६-२००७ रोजी मागविली होती व ही माहिती त्यांच्या पतीला दिनांक ०४-१२-२००७ रोजी पूर्णतः मिळाली असल्याचे त्यांनी दहा रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिले आहे. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या या अभिप्रायाचे खंडन करण्याकरिता आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी या विनापरवानगी गैरहजर आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १६-०१-२००७ रोजीच्या अर्जास संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०१-२००७ रोजी दिलेला प्रतिसाद चुकीचा आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) अन्वये संबंधीत संस्थेकडे पाठवून देणे गरजेचे होते, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई स्वतः न करता, अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जी कारवाई त्यांनी करणे अपेक्षित आहे ती कारवाई त्यांनी अपिलार्थीस करावयास सांगितली ही त्यांची चूक आहे. जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाला नाही असे त्यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले आहे. अपिलार्थीच्या पतीस जन माहिती अधिकारी यांनी निश्चितपणे दिनांक ०४-१२-२००७ रोजी कोणती माहिती पुरविली हे आज ते आयोगास दाखवू शकले नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण सहा मुद्दयांव्दारे माहिती मागविली होती. यातील मुद्दा क्रमांक ३ व मुद्दा क्रमांक ४ मधील "नसेल तर त्याचे कारण द्या" या भागाची माहिती अपिलार्थीस देय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कोणत्याही निर्णयाबद्दल अथवा एखाद्या कृतीबद्दल कारणे मागविता येणार नाहीत, माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती, ती ज्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देय होते हे पाहता, अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण सहा मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील "नसेल तर त्याचे कारण द्या" या मुद्दयांची अंशतः माहिती वगळता उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. **जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीच्या पतीस त्यांनी हीच माहिती यापूर्वीच दिली आहे हा मुद्दा, आयोग येथे फेटाळून लावत आहे कारण अपिलार्थी व त्यांचे पती हे दोघेही पती-पत्नी असल्याच्या त्यांचा नात्याचा माहिती पुरविण्यासाठी संबंध लावून पतीस माहिती दिली म्हणून पत्नीस माहिती देण्याची आवश्यकता नाही ही त्यांची धारणा योग्य नाही. अपिलार्थी व त्यांचे पती या दोघांचेही व्यक्ति व नागरिक म्हणून पूर्णतः स्वतंत्र अस्तित्व आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अशीच स्वतंत्र नागरिक या नात्याने केली आहे व त्यामुळे अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना ती देय आहे.** अपिलार्थीस माहिती पुरविण्यासाठीचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना आता ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७

(६) अनुसार विनामूल्य देणे भाग आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती आठ दिवसाच्या आत देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, मुद्दा क्रमांक ३ व ४ मधील वर नमूद केलेला अंशतः भाग वगळता त्यांना, हे आदेश प्राप्त होताच आठ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात ही माहिती त्यांना व्यक्तिशः अपेक्षित असल्याचे नमूद केल्याने अपिलार्थीने याच कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये स्वतः उपस्थित राहून ही माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी. सदर माहिती अपिलार्थीच्या कोणत्याही प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. उपरोक्त प्रकरणी विहित मुदतीत जे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत ते आता नियत वयोमानानुसार संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांच्यावर कारवाईचे आदेश नाहीत.

प्रसंगावशात् मराठवाडा क्षेत्रातील बहुतेक सर्व संस्थांनी त्यांच्या शाळा व महाविद्यालयातील मुख्याध्यापकांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले आहे, तथापि कोणत्याही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास संबंधीत मुख्याध्यापक हे संस्थेकडे अंगुलीनिर्देश करुन अर्जदारास संस्थेकडून माहिती घेण्याचे निर्देशित करतात, ही बाब माहिती अधिकार अधिनियमाच्या मूळ उद्देशाला तडा देणारी आहे, असे आयोगास वाटते. तेव्हा सचिव (शालेय शिक्षण) यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (८) (क) (४) च्या तरतुदीनुसार असे सूचित करण्यात येते की, त्यांनी राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयामध्ये जन माहिती अधिकारी म्हणून ज्यांच्या नेमणूका केल्या आहेत त्यांच्याकडे संस्थेकडील सर्व अभिलेखे उपलब्ध असण्याबाबत एक कार्यपध्दती निश्चित करुन त्यांच्या स्तरावर एक परिपत्रक निर्गमित करुन त्याची अंमलबजावणी शिक्षण खात्याच्या क्षेत्रीय अधिका-यांनी करावी जेणेकरुन अशा प्रकारच्या प्रसंगाची पुनरावृत्ती होणार नाही, असे आयोगास वाटते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (मुद्दा क्रमांक ३ व ४ ची अंशतः वगळता) त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ८ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ सौ. शारदा दासराव खरसडे, मु. पो. तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री संत ज्ञानेश्वर बहु. प्रशाला, तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. संत ज्ञानेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६३

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. दत्तात्रय बाबुराव पाटील,<br>मु. खेड, पो. धानुरी, तालुका लोहारा,<br>जिल्हा उस्मानाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा,<br>जिल्हा उस्मानाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी (महसूल),<br>उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत तर त्रयस्थ पक्ष गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अपूर्ण व खोटी असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार, मौजे खेड तालुका लोहारा येथील स्वस्त धान्य दुकानदार श्री. एम. जी.

कडबाने यांच्यामार्फत खेड येथे गहू, तांदूळ, साखर वाटप कोणत्या योजने अंतर्गत व काय भावाने झाले यासंबंधी जानेवारी २००६ ते दिनांक ०७-१२-२००६ पर्यंतच्या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात नसल्याने अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी श्री. एम. जी. कडबाने यांना दिनांक ११-१२-२००६ व ०६-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सादर करण्याचे कळविले. श्री. कडबाने यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १७-०२-२००७ रोजी पत्र दिले, तथापि या दरम्यान अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २३-०२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस विनाविलंब माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. त्याप्रमाणे प्रथमतः जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०५-०३-२००७ रोजी माहिती पुरविली आहे. सदर माहिती प्राप्त झ ााल्यानंतर अपिलार्थीने ही माहिती अपूर्ण व खोटी दिल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत दिनांक १३-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर देखील जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस अचूक व संपूर्ण माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना निर्देशीत केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस दिनांक १२-०७-२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात हजर राहून त्यांना हवी असलेली माहिती हस्तगत करण्याचे कळविले, तथापि अपिलार्थीने सदर माहिती उपलब्ध करुन घेतली नाही, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आठ दिवसाच्या आत उपस्थित राहून सदर माहिती हस्तगत करण्याचे आयोगाने निर्देशित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने सार्वजनिक प्राधिकरणाकडे जी माहिती मागितली आहे ती माहिती मुळात संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाच्या ताब्यात नव्हती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती संबंधीत सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली असलेल्या त्रयस्थ पक्षाकडे उपलब्ध होती, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाकडून जशी उपलब्ध होईल तशी ती अपिलार्थीस देणे हे जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणी कर्तव्य होते, त्याप्रमाणे त्यांनी ते पार पाडून अपिलार्थीस प्रथमतः

दिनांक ०५-०३-२००७ रोजी माहिती पुरविली व नंतर परत अपिलार्थीस दिनांक १२-०७-२००७ रोजी हीच माहिती देऊ केली. जन माहिती अधिकारी यांच्या मते अपिलार्थीस पूर्वी दिनांक ०५-०३-२००७ रोजी पुरविलेली माहिती व नंतर दिनांक १२-०७-२००७ रोजी देऊ करण्यात आलेली माहिती या दोनही एकच आहेत. अपिलार्थीस देण्याकरिता प्रस्तावित असलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास विहित कालावधीमध्ये देणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रत्यक्षतः ताब्यात नव्हती व त्यांना ही माहिती ज्या विशिष्ट स्वस्त धान्य दुकानदाराकडून प्राप्त करुन घ्यावयाची होती त्या स्वस्त धान्य दुकानदाराकडून त्यांनी जसजशी प्राप्त करुन घेतली आहे ती तसतशी अपिलार्थीस पुरविली असल्याने व ही माहिती खोटी कशी आहे हे - अपिलार्थी आयोगासमोर सिध्द न करु शकल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीस ही माहिती खोटी असल्याचे वाटत असल्यास त्यांनी या प्रकरणाशी संबंधीत सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करुन आपल्या प्रश्नांची तड लावावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय बाबुराव पाटील, मु. खेड, पो. धानुरी, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२११

निर्णय दिनांक ०३-०१-२००९

१ श्री. प्रभाकर प्रल्हाद मोरे, अपिलार्थी
प्रशिक २००० महुनगर, न्यू बालाजीनगर,
कर्मवीर शंकरसिंग नाईक हायस्कूलच्या पाठीमागे,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, सिडको
बस स्टँण्ड, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २५-०७-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना सन १९९० ते २००५ पर्यंतचे सर्व शिकाऊ उमेदवारांना ५० टक्के रिक्त जागेवर रा. प. मं. कार्यालयाने सेवेत मदतनिस म्हणून विनाअट सेवेत सामावून घेतले आहेत किंवा नाही. या रिक्त जागेचा व भरलेल्या जागेचा वर्षेनिहाय तपशील अशी माहिती अपेक्षित केलेली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"मी शिकाऊ उमेदवार असून आपल्या मंडळात १९९५ पासून मदतनिस या पदाच्या आजपर्यत वर्षनीहाय जेवढ्या जागा रिक्त होत्या तेवढया जागेसाठी मंडळाने दैनिकांमधून जाहिराती दिल्या आहे त्या रिक्त जागेवर रितसर आपल्या अर्जाची किंमत चुकवून वर्ष निहाय अर्ज भरले आहे (दि. २००४ पर्यतच्या जाहिराती) मंडळाने आपल्या जी. आर. नुसार पसंती गट क्र ६ देवून माझा कुठलाही सामावून घेण्याबाबत विचार केला नाही व रिक्त जागेवर मला आज पर्यत न्याय मिळाला नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची व मा. खंडपीठाच्या निकालाची व आपल्या परिपत्रकाची अंमलबजावणी झाली नाही.

आपल्या रा. प. म. मध्यवर्ती कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ३१/८९ पत्र क्र ७४०७, दि. १३/१२/८९ व परिपत्रक्रमांक ४१/९० पत्रक्र.६०५३ दि. १९/०९/९० अन्वये या सर्व परिपत्रकाच्या साक्षाकिंत प्रत (झेरॉक्स) कॉपी मला न्यायालयीन कामकाजासाठी हव्या आहेत. "

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिलेली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केल्याचे अथवा प्रथम अपिलावर निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचे सदरचे प्रकरण त्यांनी विभागीय नियंत्रक कार्यालयास हस्तांतर केले असून त्यांच्याकडून ते आता प्रादेशिक कार्यालयास सादर केले गेलेआहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरील युक्तिवाद व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतीही विशिष्ट अशी माहिती मागितली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रिक्त पदावर सामावून घेण्याबाबत विचार झाला नाही व त्यांना न्याय मिळाला नाही, असे त्यांनी प्रथम अर्जामध्ये नमूद केले आहे. याच अर्जामध्ये रापमं कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ३१/८९ पत्र क्रमांक ७४०७, दिनांक १३-१२-१९८९ व परिपत्रक दिनांक ४१/९० पत्रक क्रमांक ६०५३ दिनांक १९-०९-१९९० या परिपत्रकांच्या साक्षांकीत प्रती त्यांना न्यायालयीन कामासाठी हव्या असल्याचे म्हटले आहे तर राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी १९९० ते २००५ पर्यंतच्या सर्व शिकाऊ उमेदवारांना ५० टक्के रिक्त जागेवर रापमं कार्यालयाने सेवेत मदतनिस म्हणून विनाअट सामावून घेतले किंवा नाही याचा तपशील मागितला आहे. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्या अपेक्षित माहितीची मांडणी व्यवस्थित केली नाही, तसेच यामध्ये आपल्या आवश्यक माहितीचे स्वरुप बदलले आहे. अपिलार्थीच्या या अर्जावरुन अपिलार्थीस नेमकी कोणती माहिती हवी होती याचा बोध होत नाही, त्यामुळे अपिलार्थीचे अपिलातील हा मुद्दा फेटाळण्यायोग्य आहे असे आयोगास वाटते. तथापि अपिलार्थीस आतापर्यंत रापमं सेवेमध्ये सामावून न घेतल्यामुळे त्यांच्यावर अन्याय झाल्या-सारखा वाटत असल्यामुळे व रापमं कार्यालयाच्या व्यवस्थापनामध्ये पारदर्शकता स्पष्ट करण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मुद्दा क्रमांक ३ च्या समोर मागणी केलेली माहिती व आयोगाकडे व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील, जो वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केला आहे, यासंदर्भात अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता अपिलर्थीस आयोगाकडून रापमं कार्यालयास त्यांच्या नियुक्तीचे आदेश देणे अपेक्षित असल्याचे दिसन येते, तथापि अशा प्रकारच्या प्रशासकीय कारवाईसंदर्भात हस्तक्षेप करण्याची अधिकारिता आयोगास नसल्यामुळे, अपिलार्थीच्या या मुद्दयाचा आयोगास विचार करता येत नाही.

या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जास व प्रथम अपील अर्जास अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन अपिलार्थीच्या अर्जांची अक्षम्य उपेक्षा केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार वृत्तीची व कर्तव्यपरायणतेचा अभाव

असल्याबाबतची, उप अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मुद्दा क्रमांक ३ च्या समोर मागणी केलेली माहिती व व्दितीय अपील अर्जातील मुद्दा क्रमांक ८ च्या समोर दर्शविलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रभाकर प्रल्हाद मोरे, प्रशिक २००० महुनगर, न्यू बालाजीनगर, कर्मवीर शंकरसिंग नाईक हायस्कूलच्या पाठीमागे, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, प्रादेशिक कार्यालय, सिडको बस स्टँण्ड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, एस. टी. मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४०० ००८ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१४६५
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. कामाजी तुकाराम बनसोडे,<br>रा. तरोडा खू. ता.जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय, नायगाव<br>जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, नायगाव<br>जि.नांदेड | | |

त्रयस्थ पक्षः
१. श्री. उत्तम वसंत कवटीकवार,
२. श्री.माधव सिताराम मेडेवार,
३. श्री.अ.वाहेद रहेमतुल्ला

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.९.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री.उत्तम वसंत कवटीकवार,श्री. माधव सिताराम मेडेवार व श्री.अ.वाहेद रहेमतुल्ला यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल हॉकर्स/किरकोळ रॉकेल विक्रेते किंवा रिटेल रॉकेल विक्रेते यांना वाटप केलेल्या

बिलपुस्तिकेच्या छायाप्रती व त्यांचे साठा रजिस्टरच्या सत्यप्रती व विक्री रजिस्टरच्या सत्यप्रती, त्यांना दिल्या गेलेल्या दरमहा नियतनाच्या सत्यप्रती यांची माहिती मागितली होती, तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना ही माहिती पुरविली नसल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी संबंधित त्रयस्थ पक्ष श्री. उत्तम वसंत कवटीकवार,श्री.माधव सिताराम मेडेवार व श्री.अ. वाहेद रहेमतुल्ला उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षतः त्यांच्या ताब्यात नव्हती. अपिलार्थीने संबंधित त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात जी माहिती मागितली आहे, ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध ठेवणे अभिप्रेत नाही, मात्र ती माहिती त्रयस्थ पक्षाने त्यांच्याकडे उपलब्ध ठेवणे त्रयस्थ पक्षास अनिवार्य आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना त्रयस्थपक्षाकडून प्राप्त करुन घेऊन, नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची असल्याने त्यांना या माहितीचे संकलन करण्यासाठी त्रयस्थ पक्षाकडून प्रात होणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून राहावे लागले व त्यांनी त्यांना विलंबाने प्रतिसाद दिल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती विलंबाने दिली. अपिलार्थीस दि. १५.९.२००७ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसे पत्र जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास आज दि. ५.१.२००९ रोजी दिले असून त्या पत्रासोबत अपिलार्थीचे दि. १५.९.२००७ रोजीचे त्यांना संपूर्ण माहिती मिळाल्याचे व त्यांचा प्रथम अपील अर्ज निकाली काढण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करण्याबाबतच्या पत्राची सत्य झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली. यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ७.९.२००७ रोजी द्वितीय अपील दाखल केल्यानंतर एक आठवडयाने अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढण्याची त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.जन अपिलीय अधिकारी यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर सुनावणीसाठी उपस्थित

नाहीत, हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. कामाजी तुकाराम बनसोडे, रा.४३, "दिपज्योती",उल्हासनगर,मालेगावरोड, तरोडा (खू) नांदेड-५.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,नायगाव जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नायगाव, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६४
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

१ श्री. हेमंत शिवाजीराव वडणे, : अपिलार्थी
रा.तुळजापूर जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: उपकुलसचिव,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून त्यांचे दि. ३.१.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. या पत्रामध्ये त्यांनी आयोगाकडे दि. १.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील, त्यांना आवश्यक ती माहिती मिळाल्याने खारीज करावे, अशी विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे दि. १.१२.२००७ रोजी केलेले द्वितीय अपील अर्ज खारीज करण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीचे अपील क्र.२१६४/०७, दि. १.१२.२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२१६४/०७, दि.१.१२.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. हेमंत शिवाजीराव वडणे,द्वारा गपाट निवास, सेवासुविधा, टेलीफोनभवन, तुळजापूर जि.उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास विभाग,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६५ व २१६६
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

१ श्री. गोविंद लक्ष्मणराव बनसोडे, : अपिलार्थी
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्राचार्य,
पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर
२ जन अपिलीय अधिकारी तथा
प्राचार्य,
पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर
प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी,
पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर

त्रयस्थ पक्षः १.श्री. विरसंग महालिंग स्वामी
२.श्री.मारुती गणपत बिराजदार

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, तर त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत.

उपरोक्त दोन प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २.११.२००७ रोजी नोंदविलेली दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, या प्रकरणी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार खालील तरतुदींप्रमाणे प्राप्त झालेली माहिती अपूरी व

दिशाभूल करणारी असून त्यांना सत्य माहितीपासून वंचित ठेवणारी अशी आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर येथे श्री.विरसंग महालिंग स्वामी व श्री.मारुती गणपत बिराजदार यांनी प्रवेश घेताना सादर केलेली टी.सी.,शिक्षण पूर्ण झाल्यानंतर दिलेली टी.सी., जातीचा दाखला व संस्थेतील निर्गम उतारा यांच्या प्रतींची त्यांना आवश्यकता आहे, असे आयोगास अवगत केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ३१.७.२००७ व १२.७.२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर नमूद केलेल्या श्री. स्वामी व श्री. बिराजदार या त्रयस्थपक्षा संदर्भात माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या दोनही अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.८.२००७ व १०.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस श्री. स्वामी यांच्या संदर्भातील अर्जास (अपील क्र.२१६५/०७) दि. ३०.८.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद दिला तर श्री. बिराजदार यांच्या अर्जासंदर्भात (अपील क्र.२१६६/०७) दि. १०.८.२००७ रोजी प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.९.२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले केली. या दोनही अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १०.१०.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर निर्णय देताना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती बरोबर असल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीची अपिले निकाली काढली आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयांनी व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे ही द्वितीय अपिले केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीचे वेळी अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी या प्रकरणी केलेल्या दोनही अर्जातील माहिती त्यांना प्राप्त झाल्यानंतर ते व्यापक जनहित साध्य करु शकणार आहेत. त्यांनी आयोगास असेही अवगत करुन दिले की, पुरणमल लाहोटी शासकीय

तंत्रनिकेतन या संस्थेमध्ये विद्यार्थी प्रवेश घेताना त्यांच्या टी.सी.मध्ये जी जात दाखविली असते, ती जात शासकीय तंत्रनिकेतन सोडून देतांना संबंधित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या टी.सी.मध्ये बदलली जाते, याची त्यांना निश्चित स्वरुपात माहिती आहे. या तंत्रनिकेतन महाविद्यालयाने दिलेल्या अशाप्रकारच्या बनावट टी.सी.च्या आधारे श्री. बिराजदार व श्री.स्वामी यांची शासकीय सेवेत नेमणूक झाली असून या पैकी एक वर्ग-१ व दुसरे वर्ग-२ या पदावर कार्यरत आहेत. अशातऱ्हेने बनावट जातीचा दाखला सादर करुन त्यांनी लायक उमेदवारांच्या हक्कावर गदा आणली आहे व असे प्रकार उघड झाल्यास सदर संस्था व इतर अशाप्रकारच्या संस्था बनावट दाखले देणार नाहीत, अशा गैरप्रकारांना आळा बसेल व संबंधितांना योग्य तो न्याय मिळेल.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी श्री. स्वामी यांच्या संदर्भात मागणी केलेली माहिती २५ वर्षांपूर्वीची जुनी आहे व श्री. बिराजदार यांच्या संदर्भातील माहिती ही ३३ वर्षापूर्वीची आहे. त्यांची संस्था स्थापन झाल्यापासून आतापर्यंत संस्थेचे दोन वेळा स्थलांतर झाले आहे व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती, ती त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे पुरविली आहे. टी.सी. देण्याच्या कार्यपध्दतीबाबत त्यांनी असे स्पष्ट केले की, निर्गत प्रमाणपत्र संबंधित विद्यार्थ्याला त्यांनी वेगळा अर्ज केल्यास त्यांना संस्थेकडून देण्यात येते.अपिलार्थीस माहिती देताना त्यांनी त्रयस्थ पक्षाशी कोणताही संपर्क साधला नव्हता.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाविषयी बऱ्याच पूर्वीची, म्हणजेच एक प्रमाणपत्र २५ वर्ष व दुसरे प्रमाणपत्र ३३ वर्षांपूर्वीचे अशी माहिती मागितली आहे. संस्थेची स्थापना १९६२ मध्ये झाल्यानंतर संस्थेचे आजपावेतो दोन ठिकाणी स्थलांतर झाले आहे. अपिलार्थीने ज्या टी.सी.च्या प्रतींची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली आहे, ते टी.सी.फक्त संबंधित विद्यार्थ्यांनाच त्यांनी त्याप्रमाणे अर्ज केल्यास मिळू शकतात. सदर टी.सी.ची प्रत संबंधित संस्थेकडे तयार स्वरुपात उपलब्ध नसते. कोणाही विद्यार्थ्यास टी.सी.देताना त्यांना

अनेक कागदपत्रांचा आधार घ्यावा लागतो. एवढे जरी असले तरी अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे व्यापक जनहिताचा जो मुद्दा आयोगासमोर मांडला आहे, तो आयोगास योग्य वाटतो, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, टी.सी.प्रमाणपत्रामध्ये जे मुद्दे समाविष्ट असतात, त्या मुद्यांवर कोणाही विद्यार्थ्यास टी.सी. देताना ज्या कागदपत्रांचा आधार जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेतला जातो, अशा सर्व कागदपत्रांच्या श्री. बिराजदार व श्री.स्वामी यांच्या संबंधातील प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

अपिलार्थीचा व्यापक जनहिताचा मुद्दा व तसेच या संस्थेतर्फे कोणाही विद्यार्थ्यांस टी.सी.देताना ज्या पध्दतीने कार्यवाही केली जाते, ती पध्दत लक्षात घेता टी.सी. तयार करण्यासाठी ज्या कागदपत्रांचा आधार ही संस्था घेते, त्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस दिल्यास अपिलार्थी त्यांना अपेक्षित असणारी माहिती ते प्राप्त करु शकतील व अपिलार्थी या संदर्भात दुसऱ्या स्त्रोतातून प्राप्त झालेली माहिती व तंत्रनिकेतनने दिलेली माहिती यांची तुलना करुन आवश्यक त्या प्राधिकरणाकडे (सचिव, तंत्र शिक्षण व सचिव (सामाजिक न्याय) अर्ज करुन आपल्या गाऱ्हाण्याची तड लावू शकतील.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून कोणत्याही असद्‌हेतूने माहिती दडविल्याचे अथवा माहिती देण्यास नकारल्याचे वा टाळाटाळ केल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर अधिनियमानुसार कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची दोनही अपिले, अपील क्र.२१६५/२००७ व २१६६/२००७ निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२१६५/२००७ व २१६६/२००७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दोनही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे,त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गोविंद लक्ष्मणराव बनसोडे, अतिरिक्त सरचिटणीस, कास्ट्राईब रा.प.कर्मचारी संघटना, रा.प.विभागीय भांडार, दापोडी, पुणे-४११ ०१२.(नवीन पत्ता)

२. जन माहिती अधिकारी तथा विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६७
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ सौ. सीमा प्रदिप गोरक्ष,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, शिक्षण विभाग (माध्यमिक),<br>जि.प.औरंगाबाद | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः मुख्याध्यापक, आ.क.वाघमारे प्रशाला, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारीः शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन अपिलीय अधिकारी, सध्याचे जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दि. ३०.११.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांच्या दि. २०.८.२००७ रोजीच्या

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी केलेल्या मूळ अर्जातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या दि.८.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जातील व दि. १८.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या शाळेच्या संबंधित होती, त्या शाळेकडे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा अर्ज पाठविला व अपिलार्थीस संबंधित शाळेने दि. १०.४.२००७ रोजी माहिती पुरविल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले व तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याप्रमाणे कळविले. तथापि संबंधित शाळेकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १८.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

आज रोजी आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, या प्रकरणी माहिती अधिकारी हे संबंधित संस्थेचे मुख्याध्यापक असून अपिलीय अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद हे आहेत. घटनाक्रमाच्या या टप्प्यावर आयोगास, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे गरजेचे वाटते. सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जि.प.औरंगाबाद तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. १८.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झालेला व होणारा विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपले निर्णय द्यावेत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९(३) नुसार राज्य माहिती आयोग, खंडपीठ, औरंगाबाद

यांच्याकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१८.८.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन त्यावर आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०५-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. सौ. सीमा प्रदिप गोरक्ष,'यश-नक्षत्र' प्लॉट नं.२८,फ्लॅट नं.६,नाथ प्रांगण,जानकी हॉटेलच्या जवळ, शिवाजी नगर रोड,गारखेडा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आ.कृ.वाघमारे प्रशाला, मॉंटेसरी बालक मंदिर शिक्षण संस्था,सरस्वती भुवन परिसर,औरंगपूरा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६८
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

१ श्रीमती प.गं.कोदरकर, : अपिलार्थी
रा. औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी
तहसील कार्यालय,औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी
तहसील कार्यालय,औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः नायब तहसीलदार(महसूल),
तहसील कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारीः तहसीलदार, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २७.११.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे नमूद करुन, त्यांच्या दि. ३०.५.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्याकडील दि. ३०.५.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे -"औरंगाबाद महानगरपालिका हद्दीबाहेरील लगतच्या गावात निवासायोग्य शासकीय जमिनिची माहिती, गावाचे नाव-शासकीय जमिन उपलब्ध आहे/नाही", - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्याकडील दि.२५.७.२००७ पत्राद्वारे व दि. ४.९.२००७ रोजीच्या स्मरणपत्राद्वारे जन अपिलीय अधिकारी यांना त्यांच्या मूळ अर्जाच्या व प्रथम अपील निर्णयासंदर्भात कार्यवाही करण्याची जाणीव करुन दिली आहे. तथापि याकडे अपिलीय अधिकारी यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना या माहितीची आजही आवश्यकता आहे, असे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांना न दाखविल्याने त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्या या पदावर नुकत्याच रुजू झाल्या असल्याने तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय का घेतला नाही, याची कारणे त्यांना माहित नाहीत. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मूळात अपिलार्थी यांचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमातील विहित तरतुदीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न देऊन अपिलार्थीच्या अर्जाची व पर्यायाने माहिती अधिकार अधिनियमाची उपेक्षा केल्याचे दिसून येते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांना जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही न करुन जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे दिसून येते. सबब जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक अधिकारी/कर्मचारी यांच्यावर प्रचलित सेवानियुानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात माहिती विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीत पुरेशी स्पष्टता नसल्याने विशेषतः "लगतच्या गावात" या शब्दाद्वारे अपिलार्थीस औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीपासून नेमक्या किती अंतरावरील गावांसंदर्भात माहिती हवी आहे, याचा उल्लेख अपिलार्थीने न केल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची ठरते व ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत नाही.परंतु अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत निर्णय घेण्याचे साधे सौजन्यदेखील जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविल्याचे आढळून येत नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना वरीलप्रकारची शिफारस राज्य माहिती आयोगाकडून करण्यात येत आहे, जेणेकरुन अशाप्रकारच्या प्रसंगाची पुनरावृत्ती इतःपर होणार नाही.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी औरंगाबाद तहसील कार्यालयामध्ये सर्व गायरान जमिनीची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे आयोगास सांगितले व ही माहिती उपलब्ध झाल्यास अपिलार्थी यांचे काहीही म्हणणे नाही, असे अपिलार्थीने आयोगासमोर कबूल केले, हे पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्रीमती प.गं.कोदरकर,द्वारा श्री. अकोलकर, ३३(अ), 'रेणुका' छत्रपतीगर,गारखेडा परिसर,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१६९
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अमरराजे कदम परमेश्वर,<br>मु.पो.तुळजापूर, जि.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभाग,<br>औरंगाबाद. | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः उपप्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, लातूर

जन अपिलीय अधिकारीः प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण विभाग,
औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १.१२.२००७ रोजी नोंदणी झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून बिनचुक माहिती देण्यात आली नाही, खरी माहिती लपविण्यात आली, पूर्ण माहिती

देण्यास टाळाटाळ करण्यात आली, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सांभाळून घेतले व चुकीचा निर्णय दिला, त्यांच्या निर्णयात जन अपिलीय अधिकारी यांनी द्वितीय अपील कोठे करावयाचे हे न कळविता प्रकरण बंद करुन माहिती अधिकार अधिनियमाचा भंग केला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २१.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे तामलवाडी, ता. तुळजापूर येथील 'बालाजी अमाईन्स केमिकल इंडस्ट्रीज' या कारखान्याच्या स्थापनेपासून ते अपिलार्थीने अर्ज करेपर्यंतच्या कालावधीशी संबंधित एकूण ६ मुद्यांद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये- बालाजी अमाईन्स केमिकल इंडस्ट्रीज कारखान्यासाठी सुरुवातीपासून लागणारे पाणी कोठून आणायचे त्याची व्यवस्था योजना कसा स्वरुपाची होती, कारखान्याच्या आसपास प्रदुषण होणार नाही यासाठी कोणती तरतूद करण्यात आली व काय उपाययोजना आवश्यक आहे, कारखान्यातून वाहणारे सांडपाणी (विषारी) याची विल्हेवाट लावण्याची कोणती व्यवस्था आवश्यक आहे, कारखान्याची सुरुवात करतेवेळी वाढीव प्लँटसाठी एकाचवेळी आपली परवानगी घेतली कां? की एक एक प्लँटसाठी वेगवेगळी परवानगी घेतली तसेच याची सर्व बाबींची योग्य ती तपासणी करुनच परवानगी आपणाकडून देण्यात आली का याचा सविस्तर अहवाल, कार्यालयामार्फत वेळोवेळी केलेले तपासणी अहवाल, त्यामध्ये आढळलेल्या त्रुटींची माहिती, विषारी सांडपाणी साठवण तलावात सोडणे योग्य आहे अयोग्य- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांनी अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे, अपिलार्थीने

त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांशी संबंधित माहिती अपिलार्थीस दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या या पत्राद्वारे दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, 'बालाजी अमाईन्स केमिकल इंडस्ट्रीज' या कारखान्याचे विषारी सांडपाणी तामलवाडी येथील साठवण तलावात सोडले जाते व त्यामुळे तलावाचे पाणी दुषित होऊन सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याने त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारली होती. संबंधित कारखान्यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे योग्य ते नियंत्रण नसल्याने हा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. त्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस माहितीपोटी टपालावर जास्त खर्च करावा लागत असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य पाठविली.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या प्रथम अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ६ मुद्यांद्वारे प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असून अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात आलेली माहिती, या प्रश्नांना दिलेली उत्तरे अशा स्वरुपात आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अशाप्रकारे प्रश्नांची उत्तरे देणे अपेक्षित नसून अपिलार्थीने ज्या माहितीची मागणी केली आहे ती माहिती ज्या कागदपत्रांमध्ये उपलब्ध आहे, अशा कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २(च) मधील

'माहिती' या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांना प्रश्न विचारणे, त्यांच्याकडून त्यांच्या कृती/ निर्णयाबाबत कारणे, खुलासे अथवा स्पष्टीकरणे विचारणे व जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्या कृती,निर्णयासंदर्भात खुलासे, स्पष्टीकरण देणे अशाप्रकारच्या प्रक्रिया अभिप्रेत नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची छाननी करता अपिलार्थीच्या मुद्दा क्र. १ संदर्भातील माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी 'बालाजी अमाईन्स केमिकल इंडस्ट्रीज'चा प्रकल्प अहवाल देणे भाग होते. तसेच अपिलार्थीच्या मुद्दा क्र.२,३ व ४ च्या संदर्भात मागणी केलेली माहिती संबंधित कंपनीकडून उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण मंडळ लातूर यांनी घेतलेल्या संमतीपत्रामध्ये उपलब्ध असेल, त्यामुळे या कारखान्याकडून प्राप्त झालेल्या संमतीपत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे या प्रकरणी अभिप्रेत आहे. तसेच अपिलार्थीने मुद्दा क्र. ४ द्वारे विचारलेल्या माहितीसंदर्भात कारखान्याने प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहारांच्या प्रती अपिलार्थीस पुरवून ती माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देता येणे शक्य होते. मुद्दा क्र. ५ च्या संदर्भातील तपासणी अहवालाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १२.९.२००७ रोजीच पुरविल्या असल्याने या मुद्यावर अपिलार्थीस माहिती प्राप्त झाल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ द्वारे अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याने व या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित केले असल्याने व अशाप्रकारचे अभिप्राय, नमूद केल्याप्रमाणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे अभिप्रेत नसल्याने अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ६ ची माहिती त्यांच्याकडून देय ठरत नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ ते ४ शी संबंधित माहिती ज्या कागदपत्रांमध्ये

उपलब्ध आहे, त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास नकार दिल्याचे वा हेतूतः टाळाटाळ केली असल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने व अपिलार्थीच्या दि. २१.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने, त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मुद्दा क्र.१ ते ४ शी संबंधित, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर, जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, मु.पो.तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१३
निर्णय दिनांक ०५-०१-२००९

१ श्री. विठ्ठल दादाराव जगताप, : अपिलार्थी
रा.भातांगळी,ता.लोहारा, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्राम विकास अधिकारी,
भातागळी,ता.लोहारा जि. उस्मानाबाद
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी, पंचायत समिती,
लोहारा, जि.उस्मानाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना प्रथमतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही व त्यानंतर पहिल्या अपिलावर झालेल्या निर्णयाप्रमाणे देखील त्यांना कोणतीही परिपूर्ण व तपशीलवार माहिती न दिली गेल्यामुळे त्यांनी सदर अपील आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.४.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील व २००५-२००६ व २००६-२००७ या आर्थिक वर्षामधील, त्यांच्याकडे जमा झालेल्या रकमेचा तपशील व खर्च मागितला होता. त्यांना निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे, याचे सविस्तर वर्णन त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या मूळ अर्जासोबत जोडलेल्या परिशिष्टात केलेले आहे. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २९.५.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.६.२००७ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले. या अपील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस फक्त त्यांचे अपील मंजूर करण्यात येत आहे, अशा अर्थाचे एक पत्र देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात कोणत्याही सूचना अथवा आदेश दिले नाहीत. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २०.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि या माहितीने देखील समाधान न झाल्याने अपिलार्थीने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर काही शंका उपस्थित करुन त्यासंबंधित माहितीची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २४.८.२००७ रोजीच्या स्वतंत्र अर्जाद्वारे केली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ११.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटी एकूण ३९७ रुपये इतके शुल्क भरण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ११.९.२००७ रोजी दिलेल्या या पत्रामध्ये त्यांनी शुल्काचा तपशील, हे शुल्क कोठे भरावयाचे आहे या संदर्भात त्यांनी काहीही उल्लेख केलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने परत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय

अधिकारी यांनी आपला निर्णय दि. ३.११.२००७ रोजी एका पत्राद्वारे देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर करण्यात आले असल्याचे त्यांना कळविले. प्रथम अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देताना प्रथमतः जशी चुक केली होती त्या चुकीची पुनरावृत्ती त्यांनी याही वेळी केली अपिलार्थीस कशी व किती दिवसात माहिती द्यावयाची या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या निर्णयामध्ये आदेश दिले नाहीत.

आजरोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना या त्यांच्या प्रथम व द्वितीय अपील अर्जासंबंधातील संपूर्ण माहितीची आजही आवश्यकता आहे. ग्रामपंचायत कार्यालयात एकूण वेगवेगळया स्त्रोतामधील निधी कसा प्राप्त व खर्च झाला यासंबंधातील माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दि. १६.४.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस त्यांनी पुरविली आहे. अपिलार्थीने दि. २४.८.२००७ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३९७/- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरल्याने अपिलार्थीस ते माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून सदर माहिती अपिलार्थीस ते ८ दिवसांच्या आत पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे ग्रामपंचायत,भांतागळी,ता.लोहारा जि.उस्मानाबादच्या जमाखर्चाची माहिती मागितली. सदर माहिती त्यांना दि. २०.७.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या माहितीचे परीक्षण करुन, त्यावर आपल्या शंका व्यक्त केल्या व त्यांनी विहित प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत दि. २४.८.२००७ रोजीच्या स्वतंत्र

अर्जाद्वारे त्यांच्या आक्षेपांचे अनुपालन अपेक्षित करणारी माहिती मागितली. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दि. ११.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये या माहितीपोटीचे शुल्क रु.३९७/- त्यांच्याकडे भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांच्या दि. ११.९.२००७ रोजीच्या याच पत्राच्या स्थळप्रतीवर त्यांनी आपले अभिप्राय लेखी दिले असून सदर अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत.

"कायदयांतील तरतुदीप्रमाणे फीस आकारावी व तपशील वार माहिती देऊन फीसची मागणी पत्र द्यावे."

यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रथमतः माहिती अपेक्षित असावी व प्राप्त माहितीने समाधान झाल्यास ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे आवश्यक ते शुल्क भरण्यास तयार असावेत. अपिलार्थी यांची ही भूमिका सर्वथा गैर असून जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळल्यानंतर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे शुल्क भरण्याची व माहिती प्राप्त करुन घेण्याची तयारी दर्शविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि. ११.९.२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिलेला नाही, जो प्रत्येक जन माहिती अधिकाऱ्यांस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे देणे अनिवार्य असते. त्याचबरोबर ही रक्कम कोठे व कशी भरावयाची याचे कोणतेही मार्गदर्शन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी या पत्रामध्ये केलेले नाही. या सर्व त्रूटींमुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. ११.९.२००७ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांचे अपिलार्थीस शुल्क भरण्याचे सूचित करणारे पत्र अशाप्रकारे अवैध ठरत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी

सुनावणीमध्ये अपिलार्थीस ही माहिती ८ दिवसांच्या आत विनामूल्य देण्याचे कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने दि. १६.४.०७ व २४.८.२००७ रोजीच्या दोनही अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या दि. २४.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने बरीचशी माहिती प्रश्नार्थक स्वरुपात व जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासे अपेक्षित करणारी अशी विचारली आहे, ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही. तसेच अपिलार्थीने एका विशिष्ट प्रपत्रात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्याच स्वरुपात त्यांनी अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. त्यामुळे त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाद्वारे अपेक्षिलेली माहिती ज्या कागदपत्रांमध्ये आहे, त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्याव्यात, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १६.४.२००७ रोजीच्या प्रथम अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याने, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा ता.जि.उस्मानाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलास दिलेला प्रतिसाद म्हणजे कोणत्याही अपिलावर निर्णय कसा असू नये, याचा उत्तम नमूना आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. त्यांना असे सूचित करण्यात येते की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रत्येक प्रथम अपिलावर निर्णय देताना त्यांनी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांना एकत्र बोलावून, दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून,ते नोंदवून घेतल्यानंतर त्यावर आपला निश्चित स्वरुपाचा निर्णय पारित करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०५-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. विठ्ठल दादाराव जगताप, मु.पो.भातागळी ता.लोहारा जि.उस्मानाबाद-४१३ ६०८

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,ग्रामपंचायत भातागळी,ता.लोहारा जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहारा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७०

निर्णय दिनांक ०६-०१-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, अपिलार्थी
मु. पो. पिंपळगाव रेणुकाई तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकरदन,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना,
जिल्हा जालना

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी ठेवली नाही व एक प्रकारे माहिती दडविण्याचा प्रयत्न

दोन्ही कार्यालयाकडून झाला असल्याचे म्हटले असून आपल्या मूळ माहितीच्या अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०४-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. एस. बी. पाटील यांच्या भोकरदन येथील कार्यकाळातील कामासंबंधी - "तालुका कृषि अधिकारी श्री. एस. बी. पाटील यांच्या कार्यकाळात झालेले नियोजन त्यासंदर्भात झालेला खर्च बाबनिहाय माहिती व गावनिहाय यादी" - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे या रकान्यासमोर कसलाही उल्लेख केलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांना दिनांक २९-०५-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तदनंतर त्यांनी दिनांक २८-०८-२००७ व २९-०८-२००७ रोजी परत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी एकाही प्रकरणात प्रत्यक्षतः कधीही सुनावणी घेतली नाही. त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीमधील सूचनेप्रमाणे दिनांक ०८-०९-२००७ रोजी तयार करुन ठेवली होती. सदर माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली. अपिलार्थीस माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या पत्रावर पोचसही केलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडील दिनांक २८-०८-२००७ रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. त्यांच्या या विधानापृष्ट्यर्थ त्यांनी या अपील अर्जासंदर्भातील

कागदपत्रे आयोगास दाखविली. यावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती देण्याचा निर्णय या सुनावणीमध्ये झाला व तो अपिलार्थी यांनी मान्य केला होता व या निर्णयाच्या मान्यतेप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे एका कागदावर स्वाक्षरी देखील केली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला त्यांचा दिनांक ०५-०४-२००७ रोजीचा प्रथम अर्ज व्यवस्थित भरलेला नाही. या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे यासंदर्भात कोणतेही भाष्य केलेले नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०९-२००७ रोजी माहिती दिली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०८-०९-२००७ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर सही केली आहे, तथापि ही सही अपिलार्थीची नाही असे अपिलार्थी आज रोजी सुनावणीमध्ये सांगत आहेत, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०८-२००७ रोजी सुनावणीमध्ये निर्णय दिला तो निर्णय अपिलार्थीस मान्य असल्याप्रीत्यर्थ त्यांची सही जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसंदर्भातील कागदपत्रावर उपलब्ध आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अत्यंत मोघम स्वरुपात आपल्या माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागतांना, माहितीची मांडणी आवश्यक त्या पध्दतीने केलेली नाही. माहितीचे स्वरुप मोघम आहे व मूळ माहितीचा अर्ज अपूर्ण आहे. अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे, तथापि माहिती मिळाल्यानंतर केलेली सही अपिलार्थी यांची नाही, असे अपिलार्थी सांगत आहेत, मात्र आयोगाकडील इतर उपलब्ध कागदपत्रांवरुन ही सही व अपिलार्थीची मूळ अर्जातील सही यामध्ये साम्य आढळून येते, त्यामुळे ही सही अपिलार्थीची आहे असे अनुमान काढण्यास हरकत नाही. या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने आयोगाकडे केलेला व्दितीय अपील अर्ज फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगाव रेणुकाई तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७१ व २१७२

निर्णय दिनांक ०६-०१-२००९

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, अपिलार्थी
मु. पो. पिंपळगाव रेणुकाई तालुका भोकरदन,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ अपील क्रमांक २१७१/०७
जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,
जिल्हा जालना

२ अपील क्रमांक २१७२/०७
जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर,
जिल्हा जालना

३ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,
जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

हे दोनही अपील अर्ज अपिलार्थीने ज्या मूळ अर्जासंदर्भात केलेले आहेत त्या दोनही अर्जातील माहिती एकसारखीच असल्याने या दोनही अपिलांची सुनावणी एकत्रित घेण्यात येत आहे. या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. या निर्देशनाबरोबरच अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांच्याकडे श्री. टी. पी. शेळके, कृषि सहाय्यक यांच्या सन २००७ च्या कालावधीमधील कामाच्या संबंधी माहिती मागितली होती तर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांच्याकडे श्री. गंधारे, श्री. पवार व श्री. कुलकर्णी यांच्या कामाची सन २००४-२००७ या कालावधीशी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये, संबंधितांच्या कार्यक्षेत्रातील संपूर्ण कामांची यादी, मजुरांची संख्या, अंदाजपत्रक, मजुरांचे हजेरीपत्रक, धान्य कुपन या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती दोनही अर्जांमध्ये व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांच्याकडे दिनांक २७-१०-२००७ रोजी त्यांच्या घनसावंगी येथील अर्जासंदर्भात व याच अपिलीय अधिका-याकडे दिनांक २८-१०-२००७ रोजी परतूर येथील अर्जासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक ३०-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे या दोनही प्रकरणी, अपिलार्थीस पाच दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता असून अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी

यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही. त्यांनी माहिती व्यक्तिशः मागविली असल्यामुळे ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहिल्याबाबत त्यांच्याकडे काही पुरावा आहे काय, असे आयोगाने विचारले असता, त्यांच्याकडे असा कोणताही पुरावा नसल्याचे त्यांनी सांगितले. तथापि या दोनही जन माहिती अधिका-यांकडे प्रत्येकी दोन वेळा जाऊन आल्याचे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहिल्याच्या तारखा विचारल्या असता या तारखा त्यांना आता आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस काही माहिती द्यावयाची आहे हे त्यांना आयोगाकडील सुनावणीपूर्वी दोन दिवसापूर्वी कळाले. या पदाचा त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत सशुल्क देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने ज्यावेळेस माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्या कार्यालयात दाखल केला त्यावेळी श्री. धोंगडे नावाचे अधिकारी जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. सध्या ते तालुका कृषि अधिकारी, सेलू जिल्हा परभणी या पदावर कार्यरत आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ माहितीसाठीचा अर्ज करतांना त्यामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख केला नाही, तसेच या अर्जावर त्यांनी दिनांक लिहिलेला नाही. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद दिला असून हे पत्र त्यांनी अपिलार्थीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविले आहे. यासंदर्भातील पोस्टाची पावती त्यांनी आयोगास दाखविली. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाकडे श्री. टी. पी. शेळके नावाचे कृषि सहाय्यक कार्यरत नव्हते असे कळवून याच नावाचे मंडळ कृषि अधिकारी राणी ऊंचेगाव या कार्यालयात असल्याने त्यांनी मंडळ कृषि अधिकारी राणीऊंचेगाव यांच्या संदर्भातील अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देऊ केली. अपिलार्थीच्या मूळ अर्जावर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याचा त्यांना बोध झाला नाही, त्यामुळे याबाबतही त्यांनी अपिलार्थीस या पत्राव्दारे स्पष्टीकरण मागितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या या पत्राबरोबरच काही माहिती श्री. टी. पी. शेळके, मंडळ कृषि अधिकारी यांच्यासंदर्भातील दिली असल्याचे दिसून येते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले.

अपिलार्थीच्या दोनही अपील अर्जातील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी व त्यांचे उप विभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी अपिलार्थीस या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास आढळून येत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता तिची व्याप्ती जरी मोठी असली तरी सन २००४ ते २००७ या कालावधीतील अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना पुरविणे फार जिकिरीचे अथवा अवघड काम होते, असे आयोगास वाटत नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यक्षेत्रातील मजुराव्दारे केलेल्या कामाच्या संदर्भातील हजेरीपत्रके व अंदाजपत्रकाच्या फक्त झ ेरॉक्स प्रती अपिलार्थीस पुरविणे एवढेच काम त्यांना करावयाचे होते. जन माहिती अधिकारी यांनी हे काम तर केले नाहीच परंतु अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) नुसार विहीत मुदतीत कळविल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी, परतूर यांच्या मनात होते किंवा कसे याबाबत आयोगाच्या मनात संदेह निर्माण होत आहे. अर्थात अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जरी त्रयस्थ पक्षासंदर्भातील असली तरीही ती सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य आहे. आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी तथा तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी ही माहिती अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत सशुल्क देण्याची तयारी दर्शविली आहे. मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्यासाठी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत आता व्यपगत झाली असल्याने अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य द्यावी लागेल हे पाहता, जन माहिती अधिकारी तथा तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित राहणे त्यांना अनिवार्य आहे. अपिलार्थीच्या कोणाही प्रतिनिधीस ही माहिती देय होणार नाही. या प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्याचे कोणतेही कारण जन माहिती अधिकारी, परतूर हे आयोगास देऊ शकले नाहीत किंबहुना आयोगाचे असे मत झाले आहे

की, अपिलार्थीच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाची माहिती न देण्याच्या संबंधात जन माहिती अधिकारी व त्यांचे सहाय्यक यांच्या कृतीचे कोणतेही समर्थन मूळात अस्तित्वात असू शकत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे व त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांना सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहाय्यक, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी असे समजावे अशी तरतूद आहे त्या सर्वांवर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांच्याकडील प्रकरणासंदर्भात आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे यासंदर्भात कोणताही उल्लेख केलेला नाही, अपिलार्थीने ज्या श्री. टी. पी. शेळके, कृषि सहाय्यक यांच्याविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती, त्यावेळी अशी कोणतीही व्यक्ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात या पदावर कार्यरत नव्हती. विशेषतः अपिलार्थीच्या या अर्जाशी संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी ही बाब अपिलार्थीस दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविली, हे पत्र पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी, घनसावंगी यांच्याकडे उपलब्ध आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांच्या प्रकरणात अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे दिसून येते, कारण मूळात त्यांनी अर्ज अपूर्ण लिहिला, अर्जामध्ये त्यांना ज्या कर्मचा-याच्या कामासंदर्भात माहिती हवी होती त्या पदावरील कर्मचारी घनसावंगी येथे कार्यरत नव्हता. अपिलार्थीचा मूळ अर्ज व मागितलेल्या माहितीतील विसंगती यासंदर्भात जन माहिती अधिकारी, घनसावंगी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे योग्य प्रकारे प्रतिसाद देऊन ती विसंगती अपिलार्थीच्या लक्षात आणून दिली, तथापि हे पत्र त्यांना प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पत्र पाठविल्याचा योग्य पुरावा आयोगाकडे सादर केला आहे त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी, घनसावंगी यांनी दिलेला लेखी पुरावा आयोग ग्राह्य धरत असून अपिलार्थीचे अपील, त्यांचा मूळ अर्ज त्यांनी बरोबर व पूर्ण भरला नसल्याने व मागितलेल्या माहितीमध्ये विसंगती असल्याने, फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील क्रमांक २१७१/२००७ हे फेटाळण्यात येऊन व अपील क्रमांक २१७२/२००७ हे मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१७१/२००७ हे फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक २१७२/२००७ हे मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी, परतूर यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन तालुका कृषि अधिकारी, परतूर व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सर्व सहाय्यक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन संतुकराव देशमुख, मु. पो. पिंपळगाव रेणुकाई तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७४

निर्णय दिनांक ०६-०१-२००९

१ श्री. सुनिल पंडितराव कुलकर्णी, अपिलार्थी
रा. जवळा (नि.) तालुका परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा,
तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : मंडळ कृषि अधिकारी जवळा (नि), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती दिली नाही, मुदत निघून गेल्यानंतर खोटी व अपूर्ण माहिती दिली असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाईचे आदेश व्हावेत. तसेच त्यांनी तालुका कृषि अधिकारी परंडा यांच्याकडे माहिती मागितली असतांना तालुका कृषि अधिकारी यांनी ते स्वतः जन अपिलीय अधिकारी आहेत असे त्यांना खोटे कळविले व सदर अपील हे पहिले अपील असतांना व्दितीय माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य आयुक्तसाहेब असे आदेश करुन अपिलार्थीची दिशाभूल केली आहे. त्यामुळे त्यांच्याविरुध्द योग्य ते आदेश व्हावेत व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना मिळावी, अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०५-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च २००७ ते मे २००७ या कालावधीशी संबंधीत मौजे जवळा (नि) तालुका परंडा येथील गट नंबर ४७९/४७६ या शिवारात चालू असलेल्या कामांची, हे काम ट्रॅक्टरव्दारे चालू असून त्याचे पेमेंट अदा केल्याची छायांकीत प्रत, मजुराव्दारे काम असेल तर त्यांच्या पगारपत्रकाची छायांकीत प्रत व हे काम कोणत्या योजनेव्दारे चालू आहे व त्यासाठी किती बजेट मंजूर केले आहे त्याची छायांकीत प्रत - अशी माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने सदर अर्ज हा तालुका कृषि अधिकारी परंडा यांना उद्देशून केला होता, तथापि या प्रकरणी मंडळ कृषि अधिकारी, जवळा (नि) यांना जन माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले असल्याने त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १६-०५-२००७ रोजीचा अर्ज मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०५-२००७ रोजी पाठविला. अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या पत्राने आवश्यक ती माहिती पुरविली व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०६-२००७ रोजी पोस्टाने पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या पुराव्यावरुन दिसून येते. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने यापूर्वीच अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील देखिल अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याचे दिसून येते. सदर अपील अर्ज त्यांनी कृषि उप अधीक्षक कृषि कार्यालय, भूम या अधिका-याकडे केल्याचे दिसून येते. तथापि असे कोणतेही पद कृषि खात्यामध्ये अस्तित्वात नाही, तथापि अपिलार्थीचा सदर अपील अर्ज उपविभागीय कृषि अधिकारी, भूम यांच्याकडे प्राप्त झ ााल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०५-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणी जन अपिलीय

अधिकारी म्हणून तालुका कृषि अधिकारी यांची नेमणूक झाली असल्याचे कळविले. अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे परत पाठविला व अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढल्याचे कळविले. उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता तालुका कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी त्यांच्या कार्यालयात असतांना देखील मंडळ कृषि अधिकारी जवळा यांच्याशी संपर्क साधण्याचे सूचित केले. तालुका कृषि अधिकारी यांच्या सुचनेनुसार त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीप्रीत्यर्थ मंडळ कृषि अधिकारी जवळा यांना पत्र पाठविले असता जवळा येथे मंडळ कृषि अधिकारी कार्यालय नसल्याने त्यांचे पत्र अपिलार्थीस परत आले. म्हणून त्यांनी कृषि उप अधीक्षक कार्यालय, भूम यांच्याकडे दिनांक १९-०६-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलासंदर्भात अपिलार्थीस उपविभागीय कृषि अधिकारी यांच्याकडून त्यांचे दिनांक ०५-०७-२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले. या पत्रामध्ये त्यांनी तालुका कृषि अधिकारी, परंडा हे जन अपिलीय अधिकारी असल्याचे म्हटले आहे. अशा प्रकारे त्यांना कृषि विभागाशी संबंधीत क्षेत्रीय अधिका-यांकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांना राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या पत्राने पाठविली आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागवूनही त्यांच्याशी या माहितीप्रीत्यर्थ त्यांनी कधीही संपर्क साधला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात ते व्यक्तिशः गेले नसल्याचे आज रोजी सुनावणीच्या वेळी कबूल केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १६-०५-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक १५-०६-२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अभिप्रेत होते, तथापि अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रत्यक्षतः दिनांक २९-०६-२००७ रोजी प्राप्त झाली. अपिलार्थीस माहिती पाठविल्याचा जन माहिती अधिकारी यांनी जो पुरावा सादर केला आहे तो पुरावा म्हणजे परंडा येथील पोस्ट ऑफिसची दिनांक २५-०६-२००७ रोजीची ४२१४ क्रमांकाची पावती होय. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०६-२००७ रोजी

माहिती दिल्याचे अनुमान काढण्यास हरकत नाही. या प्रकरणी अशा त-हेने अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सहा दिवस विलंबाने दिल्याचे दिसून येते. या ६ दिवसांपैकी ४ दिवसांचा विलंब तालुका कृषि अधिकारी परंडा यांनी लावल्याचे दिसून येते त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेला विलंब २ दिवसांचा असल्याचे सिध्द होते. अपिलार्थीस दोन दिवस विलंबाने माहिती पुरवून जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे (२ दिवसाकरिता) एकूण रुपये ५०० (अक्षरी रुपये पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी भरणा करतील, असे तालुका कृषि अधिकारी, परंडा यांनी पहावे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १८-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते, त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती देय होत नाही.

या प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थी यांनी आपसात केलेला पत्रव्यवहार पाहता अपिलार्थीने प्रथम अर्ज व त्यानंतरचे प्रथम अपील हे चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याने अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यास विलंब लागला असे दिसून येते. मूळात अपिलार्थीचा दिनांक १६-०५-२००७ रोजीचा अर्ज तालुका कृषि अधिकारी यांनी संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) प्रमाणे सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून ५ दिवसांच्या आत पाठवावयास हवा होता, तथापि त्यांनी या टप्प्यावर प्रथमतः ४ दिवसांच्या विलंबाने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविला.

तसेच अपिलार्थीने चुकीच्या प्राधिकरणाकडे त्यांचा प्रथम अपील अर्ज केल्याने संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांनी अपिलार्थीचा मूळ अपील अर्ज अपिलार्थीकडे परत पाठविला. उपविभागीय कृषि अधिकारी यांची ही कृती सर्वस्वी गैर असून त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज स्वतःच्या पातळीवर त्या

प्रकरणाशी संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविणे भाग होते, तथापि त्यांनी अशी कृती न करुन आपल्या अशा प्रकारच्या बेजबाबदार व चुकीच्या कृतीव्दारे अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्यापासून विनाकारण प्रदीर्घ कालावधीकरिता वंचित ठेवले. अपिलार्थीस सुरुवातीला या प्रकरणाशी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोण आहेत याची माहिती असती तर कदाचित अपिलार्थीस माहिती मिळण्यासाठी एवढा वेळ लागला नसता. आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी कोण आहेत याचे फलक प्रथमदर्शनी सर्वांच्या नजरेस पडतील असे लावलेले नाहीत. अपिलार्थीने केलेले विधान जर वस्तुस्थिती दर्शवित असेल तर उपविभागीय कृषि अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयात अभ्यांगताना सहजपणे दृष्टीस पडतील अशा पध्दतीने त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे फलक त्वरित लावले जातील, असे पहावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. संबंधित जन माहिती अधिकारी यांना रुपये ५०० (अक्षरी रुपये पाचशे) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुनिल पंडितराव कुलकर्णी, रा. जवळा (नि.) तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी जवळा (नि), तालुका परंडा जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७५

निर्णय दिनांक ०६-०१-२००९

१ श्री. मोरे प्रविण व्यंकटराव, अपिलार्थी
मु. पो. रामनगर, शिवपुरी रोड, उमरगा,
तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, उमरगा, जिल्हा
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद (बांधकाम), उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, (बां.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०५-०१-२००९ रोजीचे पत्र सादर केले आहे. या पत्रासोबत त्यांनी अपिलार्थीने त्यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २१-०४-२००८ रोजीचे पत्र जोडले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाल्याने ते अपील काढून घेत असल्याचे व त्यांची या प्रकरणी कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. खुद्द अपिलार्थीच आता त्यांचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील काढून घेत असल्यामुळे अपिलार्थीचे

आयोगाकडे सादर केलेले आज रोजी विचाराधीन असलेले व्दितीय अपील क्रमांक २१७५/२००७ दिनांक २५-१०-२००७ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१७५/२००७, दिनांक २५-१०-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोरे प्रविण व्यंकटराव, मु. पो. रामनगर, शिवपुरी रोड, उमरगा, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७६

निर्णय दिनांक ०६-०१-२००९

१ श्री. चंद्रकांत शंकर गुड्ड, अपिलार्थी

मु. पो. अणदूर, तालुका तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय,

अणदूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी,

पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दिनांक ०५-०१-२००९ रोजीच्या पत्राची साक्षांकीत सत्यप्रत आयोगास सादर केली आहे. या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी नजरचुकीने या प्रकरणी दिनांक ०६-१०-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. त्यांना अपेक्षित असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १६-०७-२००७ रोजी पूर्णतः मिळाली असल्याने व या अपील अर्जाबाबत त्यांची आता कोणतीही तक्रार उरली नसल्याने त्यांचा अपील अर्ज निकाली काढावा. खुद्द अपिलार्थीसच सदर अपील चालविण्यास कोणतेही स्वारस्य नसल्याचे त्यांच्या वरील पत्रावरुन दिसून येते.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थीस हे हजर नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील क्रमांक २१७६/२००७ दिनांक ०६-१०-२००७ वरील पार्श्वभूमीवर खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१७६/२००७, दिनांक ०६-१०-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत शंकर गुड्ड, मु. पो. अणदूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अणदूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७७

निर्णय दिनांक ०६-०१-२००९

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाह खान, अपिलार्थी
९-४-४५५, कय्यूम प्लॉटस्
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, वॉटर वर्क्स ॲण्ड युजीडी, नांदेड
वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उप अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितल्यानंतर त्यांना ७८ दिवसांनी जन माहिती

अधिकारी यांच्याकडून अपूर्ण व चुकीची माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी आयोगाकडे हे अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०३-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दुष्काळ निवारण योजनेंतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रात सन २००५-२००६ या कालावधीमध्ये घेतलेल्या बोअर, हातपंपाविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मान्यताप्राप्त रक्कम, मंजूर बोअर, मंजूर झालेले अनुदान, घेतलेल्या बोअरची संख्या, काम करणा-या कंत्राटदाराचे नांव, काम देण्याची पध्दत, किती प्रभागात ही कामे झाली, कामांचे प्रभागनिहाय निश्चित स्थान व बोअरची खोली, प्रत्यक्ष किती विहिरी खोदण्यात आल्या, व्यास आणि पाईपची लांबी, प्रभागनिहाय अनुदानीत विहिरीवर बसविलेल्या विद्युतपंपांची संख्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती रजिस्टर्ड पोस्टाव्दारे मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यानंतर अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०३-२००७ रोजीचे पत्र देऊन त्यांना माहितीपोटीचे शुल्क रुपये १२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एका आठवड्याच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे निर्देशित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या आदेशावर जन अपिलीय अधिकारी यांच्या वतीने दुस-या कर्मचा-याने / अधिका-याने सही केली आहे. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविल्याचे दिसून येते. विलंबाने प्राप्त झालेल्या या माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयातील श्री. बोधनकर व सजलेगावकर या दोन कनिष्ठ अभियंत्याकडून प्राप्त करुन घेऊन नंतर ती संकलीत करुन ती अपिलार्थी यांना पुरवावयाची होती परंतु संबंधित कनिष्ठ अभियंत्यांनी त्यांना वेळेवर माहिती

न दिल्याने प्रथमतः ते अपिलार्थीस वेळेवर माहिती देऊ शकले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झ ाालेल्या सुनावणीनंतर संबंधीत कनिष्ठ अभियंत्यांना नोटीसा देऊन त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेतली व नंतर ती एकत्रित करुन घेऊन ती अपिलार्थीस दिनांक २०-०४-२००७ रोजी पुरविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक ०३-०२-२००७ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागितली होती. हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०३-०२-२००७ रोजी प्राप्त झाला असल्याने या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीन्वये अपिलार्थीस दिनांक ०२-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे अभिप्रेत होते, तथापि या प्रकरणी मूळात अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २३-०३-२००७ रोजी प्रथम पत्र पाठविले जे त्यांनी दिनांक ०२-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी पाठविणे आवश्यक होते. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देण्यासाठी २३ दिवसांचा विलंब लागला आहे. अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जी माहिती दिनांक ०२-०३-२००७ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे आवश्यक होते ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अंतीमतः दिनांक २०-०४-२००७ रोजी म्हणजे एकूण ४८ दिवसांच्या विलंबाने अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता त्यांच्या सहाय्यकांनी वेळेवर माहिती सादर न केल्याने ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाहीत, असा खुलासा आयोगाकडे केला आहे. जन माहिती अधिकारी स्वतः उप अभियंता असून त्यांचे कार्यालय व संबंधीत कनिष्ठ अभियंत्यांचे कार्यालय एकाच इमारतीत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीबाबत जर जन माहिती अधिकारी पुरेसे गंभीर असते तर त्यांनी संबंधीत कनिष्ठ अभियंत्यांकडे पाठपुरावा करुन त्यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेतली असती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या समर्थनार्थ त्यांनी केलेला युक्तिवाद आयोगास मान्य नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केल्यानंतर दिनांक २०-०४-२००७ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस एवढ्या विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या मनातील इच्छाशक्तीचा अभाव हे एकच कारण, या प्रकरणी असल्याचे आयोगास दिसून येत आहे. अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देता ती ४८ दिवस इतक्या विलंबाने देऊन त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीचा भंग केल्याचे दिसून येत

आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २०-०४-२००७ रोजी दिलेली माहिती पाहता, त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ३ मधील माहिती दिली नसल्याचे दिसून येते. सर्वसाधारण सर्व नगरपालिकांनी कोणत्याही कामांची ठेकेदारी निश्चित होतांना प्रथमतः स्थायी समितीकडे ठराव पास केले जातात व तद्‌नंतर आवश्यकतेनुसार सर्वसाधारण सभेत असे ठराव मान्यतेकरिता ठेवले जातात व ठरावांना मान्यता मिळाल्यानंतर कामाची ठेकेदारी निश्चिती होते त्यामुळे या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी स्थायी समितीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त व ठरावाच्या प्रती अपिलार्थीस या मुद्दयासंदर्भात देणे भाग होते तथापि या मुद्दयावर त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेली उर्वरित माहिती त्यांच्या मूळ अर्जातील माहितीशी सर्वसाधारणतः सुसंगत असल्याचे दिसून येते. अशा प्रकारे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत असल्याने त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे (४८ दिवसाकरिता) एकूण रुपये १२,००० (अक्षरी रुपये बारा हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी शासकीय कोषागारात पुढील लेखशिर्षामध्ये करावा.

लेखाशीर्ष- "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) "

सदर शास्तीचा संबंधित जन माहिती अधिकारी भरणा करतील, असे आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका यांनी पहावे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांच्या कार्यालयातील जे सहाय्यक / कर्मचारी जबाबदार असतील त्यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे हे पाहता, या प्रकरणी आवश्यकता वाटल्यास, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी या प्रकरणी हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत या शास्तीची कर्मचारी / अधिकारीनिहाय या शास्तीच्या रकमेची विभागणी त्यांच्या स्तरावर करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण व चुकीची कशी आहे हे आयोगास सांगण्यासाठी अपिलार्थी हे आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत, तथापि अपिलार्थीने मागितलेली एकूण माहिती व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अंतीमतः दिनांक २०-०४-२००७ रोजी पुरविलेली माहिती यांची तुलना करुन आयोगाने वरीलप्रमाणे अनुमान काढले आहे. त्याचप्रमाणे स्थायी समिती व सर्वसाधारण सभा समिती यांची,

या कामासंदर्भात झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून आले आहे की, कार्यकारी अभियंता यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली असतांना देखील अपिलार्थीच्या अपील प्रकरणात कार्यकारी अभियंता यांच्या ऐवजी त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी सही करुन अपिलार्थीच्या अपिलावर निर्णय दिला आहे, ही पध्दत चुकीची असून कोणत्याही अपिलावर निर्णय देणा-या अधिका-याने अपील निर्णयावर स्वाक्षरी करणे अनिवार्य आहे, याची नोंद संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना रुपये १२,००० (अक्षरी रुपये बारा हजार) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय कोषागारात करावा.

औरंगाबाद

दिनांक ०६-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहंमद अन्वरउल्लाह खान, ९-४-४५५, कय्यूम प्लॉटस् नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा व जलनिःस्सारण विभाग, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७८

निर्णय दिनांक  ०६-०१-२००९

१ श्री. ओमप्रकाश रतनलाल मालपाणी, अपिलार्थी
पूर्णवादी बँकेच्या मागे, बीड रोड, माजलगाव, तालुका
माजलगाव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यवाह, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, तानाजी
मालुसरे चौक, अंबाजोगाई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०६-०१-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये त्यांनी आयोगाकडे केलेले, आज रोजी विचाराधीन असलेले त्यांचे अपील क्रमांक २१७८/२००७ हे मागे घेत असल्याचे म्हटले आहे. खुद्द अपिलार्थीच आता त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेत असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील क्रमांक २१७८/२००७ दिनांक २७-०४-२००७ खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१७८/२००७, दिनांक २७-०४-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ओमप्रकाश रतनलाल मालपाणी, पूर्णवादी बॅकेच्या मागे, बीड रोड, माजलगाव, तालुका माजलगाव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यवाह, भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, तानाजी मालुसरे चौक, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७९
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र कचरु मोटे,<br>रा.गेवराई जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,लघुपाटबंधारे,<br>जि.प.उपविभाग,बीड<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे,<br>जिल्हा परिषद, बीड | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी त्यांना अर्जाप्रमाणे चलन भरुन देखील माहिती दिली नाही, त्यामुळे उर्वरित माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश व्हावेत व संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - दि. १.३.२००७ ते ३१.५.२००७ या कालावधीतील गेवराई तालुक्यातील रोहयो अंतर्गत चालू असलेल्या सेलू, राममळा व चकलांबा या तीन गावातील पाझर तलाव क्र.८ या कामावर असलेल्या मजूरांच्या हजेरीपटाची दि. १.३.२००७ ते ३१.३.२००७ पर्यंतच्या झेरॉक्स प्रतीची व मजूरांचे पगार या मुद्यांची माहिती मागितली होती.अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. ९.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १८.१०.२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे रु. ५००/- इतके शुल्क आकारुन, त्यांना माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपील निकाली काढले. तद्नंतर अपिलार्थीने दि. २४.१०.२००७ रोजी आवश्यक त्या शुल्क रु.५००/- चा भरणा चलनाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. आवश्यक ते शुल्क भरुनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात म्हटल्याप्रमाणे दि.४.१२.२००७ रोजी द्वितीय अपील केले आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि.११.१२.२००७ रोजी संपूर्ण माहिती दिली आहे. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना विलंबाने माहिती प्राप्त झाल्याने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची अपिलार्थीने आयोगास विनंती केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १३.७.२००७ रोजीच्या

मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली, २५० पृष्ठांची माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडून रु.५००/- इतक्या शुल्काची आकारणी करुन दि. ११.१२.२००७ रोजी त्यांना दिली आहे. अपिलार्थीस त्यांनी शुल्क भरल्यानंतरही माहिती देण्यास लागलेल्या या विलंबाचे समर्थनामध्ये त्यांनी जिल्हा परिषदेच्या लेखा विभागाच्या कामकाजपध्दतीची/कार्यपध्दतीची माहिती आयोगास दिली. त्यांनी यासंदर्भात असा युक्तिवाद केला की, जिल्हा परिषदेकडे लेखाविभागात त्यांच्याकडे प्रत्येक मस्टर रोलचे एक स्वतंत्र व्हाउचर केले जाते व सर्व विभागाकडून प्राप्त झालेले अशाप्रकारचे सर्व व्हाऊचर्स मुख्य लेखा अधिकारी हे एकत्रित करुन माहवार ठेवत असतात. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती एकूण ३ कामासंदर्भात व ३ महिने इतक्या कालावधीची असल्याने, अपिलार्थीस आवश्यक त्या मस्टर रोलच्या प्रती त्यांना संपूर्ण गठ्ठयातून शोध घेण्यासाठी वेळ लागला.अपिलार्थीच्या दि.१३.७.२००७ रोजीच्या प्रथम अर्जावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना मुदतीत का कळविले नाही, अशी आयोगाने विचारणा केली असता, त्यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.५००/- त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचना देणारे पत्र त्यांनी त्यांच्याकडे तयार केले होते, तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असल्याने हे पत्र त्यांनी पोस्टात टाकले नाही. अपिलार्थीस माहितीपोटीचे शुल्क भरण्यासाठी त्यांनी नेमके कोणते पत्र त्यांच्या कार्यालयात तयार ठेवले होते, याची जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी आयोगास जे पत्र दाखविले त्या पत्रावर दिनांक लिहिलेला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा त्यांनी अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काची कल्पना देण्याचे पत्र तयार करुन ठेवले होते, हा दावा फोल ठरत आहे. तसेच अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर त्यांना शुल्काची कल्पना देण्यासाठी तयार केलेले पत्र देखील अपिलार्थीने व्यक्तिशः त्यांच्या कार्यालयाकडून घेऊन जावे, ही त्यांनी केलेली अपेक्षा देखील अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदीचे अवलोकन करता, अर्जदाराचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३०

दिवसांच्या आत त्यांनी अपिलार्थीस अधियिमातील कलम ७(१) प्रमाणे लेखी पत्राद्वारे प्रतिसाद देणे अभिप्रेत आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी केल्याचे आयोगास आढळून येत नाही. मूळात अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचा आहे. जन महिती अधिकारी यांनी अपिलार्थीस न कळविल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य देय ठरते. सबब जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीकडून स्वीकारलेले माहितीपोटीचे शुल्क रु.५००/- त्यांना अपिलार्थीस परत करावे लागेल.उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमांतर्गत केलेल्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद न देऊन,जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे, सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांच्यावरही कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्याची अधिकारिता आयोगास नसल्याने अपिलार्थीची ही विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त झाली असल्याने माहिती देण्यासंदर्भात कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.५००/- इतके त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांचे आत परत करावे.

३. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र कचरु मोटे, मोटे गल्ली, गेवराई ता. गेवराई जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग,बीड जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद,बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव, (जलसंपदा) मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८०
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र कचरु मोटे,<br>रा.गेवराई जि.बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (पुरवठा),<br>तहसील कार्यालय,गेवराई,<br>जि.बीड | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, गेवराई. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत, जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.४.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापही कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही, अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भाने निकाल न देता वारंवार अपिलाची सुनावणी पुढे ढकलली आहे, तरी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त व्हावी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.०४.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वस्त धान्य दुकान व केरोसीन विक्रीबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीमध्ये - स्वस्त धान्य दुकान क्र.२,१०,३,१४,१८ या दुकानांतून दि. १.२.२००७ ते ३१.३.२००७ दरम्यान वाटप केलेल्या कार्डधारकांना धान्याबाबतची माहिती, सेल रजिस्टर व स्टॉकरजिस्टच्या प्रती, गेवराई शहरातील सर्व घाऊक रॉकेल विक्रेत्यांचे विक्री रजिस्टर,स्टॉक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती, बाबासाहेब भोसले, भगवान बोराडे या घाऊक रॉकेल विक्रेत्यांच्या सेल रजिस्टर,स्टॉक रजिस्टरच्या नकला, बी.बी.परदेशी,सय्यद इस्माईल,कल्याण पैठणे, प्रदीप पोटभरे, विठ्ठल कानगुडे (हॉकर्स), नंदकुमार मंत्री, सय्यद इलीयास अख्तर,प्रेमचंद गंगवाल (किरकोळ) या सर्वांनी रॉकेल वाटलेल्या लोकांची रॉकेलच्या परिमाणासह यादी - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापि आज रोजी तहसीलदार, गेवराई यांनी आयोगाकडे सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि.१६.७.२००७ रोजी पत्र लिहून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे कळविले. तथापि अपिलार्थी हे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून घेऊन गेले नाहीत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार गेवराई यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि.११.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आयोगाकडे केलेल्या निवेदनामध्ये त्यांनी दि.३०.७.२००७,दि.७.८.२००७,दि.१४.९.२००७ व दि. ३०.१०.२००७ रोजी अपिलार्थीच्या प्रथम

अपील अर्जाची सुनावणी ठेवली होती. परंतु अपिलार्थी हे सुनावणीस उपस्थित न राहिल्याने त्यांना या संदर्भात कोणताही निर्णय देता आला नाही.शेवटी त्यांनी दि. ३०.१०.२००७ रोजी जप माहिती अधिकारी यांना, माहिती अधिकार अधिनियमातील उपलब्ध नियमानुसार फीस भरुन माहिती देण्यास्तव आदेशित केले व अपिलार्थीचे प्रकरणी एकतर्फी निकाली काढले असल्याचे नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. ३०.१०.२००७ च्या कथित निर्णयाद्वारे कोणताही बोध होत नाही. मात्र त्यांनी या निर्णयाद्वारे माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती द्यावी, असा निर्णय दिल्याचे अनुमान काढण्यात येत आहे. आयोगाकडे जन अपिलीय अधिकारी यांनी सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, अपिलार्थी यांच्याविरुध्द गेवराई तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदारांनी त्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थी हे शिधा कार्डधारक नसून ते प्रत्येक धान्य दुकानदाराकडे महिन्यास १०००/- रुपयांची मागणी करतात. पैसे न दिल्यास जिल्हाधिकारी कार्यालयास माहितीसाठीचा अर्ज करणार, असे त्यांना धमकावून त्रास देत असतात.

अपिलार्थी यांनी आज असा युक्तिवाद केला की, त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही तर त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्यास तहसीलदार, गेवराई यांनी टाळाटाळ केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडील दि. १६.७.२००७ रोजीचे पत्र व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील सुनावणीसाठीचे एक पत्र वगळता त्यांना उर्वरित पत्रे प्राप्त झाली नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः त्यांच्या ताब्यात कधीही उपलब्ध नसते. ही माहिती अपिलार्थीने ज्या त्रयस्थपक्षासंदर्भात मागितली होती, त्या त्रयस्थपक्षाशी संपर्क साधून नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने एकूण १० त्रयस्थपक्षासंदर्भात माहिती मागितली असल्याने ही माहिती संकलीत करण्याकरिता काही कालावधी लागणे अपरिहार्य आहे. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती

अधिकारी यांच्याकडे एकूण १० त्रयस्थ व्यक्तींसंदर्भात माहिती मागितली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सार्वजनिक स्वरुपाची माहिती आहे. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे देय आहे. सर्व त्रयस्थपक्ष हे सार्वजनिक प्राधिकरणातील कोणतेही कर्मचारी नसून ते पुरवठा परवानाधारक अशा खाजगी व्यक्ती आहेत. सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचाऱ्यांसंदर्भात अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालमर्यादेत माहिती देणे अभिप्रेत आहे, तथापि अशाप्रकारे खाजगी व्यक्तींकडून माहिती घेऊन, नंतर ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात अधिनियमामध्ये कोणतीही निश्चित कालमर्यादा घालून दिलेली नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यासाठी खरोखरीच माहिती तयार करुन ठेवली होती किंवा कसे हे कळण्यास जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे मार्ग नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना सात दिवसांच्या आत देण्याचे कबूल केले आहे, हे पाहता संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळ माहिती व्यक्तिशः मागितली असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे याच मुदतीत व्यक्तीशः उपस्थित राहून उपलब्ध करुन घ्यावी लागेल.या मुदतीनंतर अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देय असणार नाही.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २६.४.२००७ रोजीच्या अर्जास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी

यांच्यावर कारवाई करण्याची अधिनियमामध्ये कोणतीही तरतुद नसल्याने, जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची अपिलार्थी यांची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र कचरु मोटे, रा.मोटे गल्ली, गेवराई ता.गेवराई जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय,गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, गेवराई,जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८१
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

१ श्री. राजकुमार माधवराव कोरेकर, : अपिलार्थी
रा.मंगरुळ,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याधिकारी,
नगरपरिषद, नळदुर्ग,
ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त (सा.प्र.),
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निकाल दिला, दि. १४.११.२००७ व २३.११.२००७ रोजीचे सुनावणीचे पत्र त्यांना देण्यात आले नाही, माहिती अधिकारी यांनी दि. २९.९.२००७ रोजी जे पत्र दिले आहे, असे कळविले आहे, ते प्रत्यक्षात त्यांना कळविले नाही, सुनावणीच्या तीनही वेळेस जन माहिती अधिकारी हे प्रत्यक्षात गैरहजर असताना त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली नाही व त्यांना माहिती

परिपूर्ण देण्यात आली नाही, अशाप्रकारचे अभिप्राय नोंदवून त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी द्वितीय अपील अर्जामध्ये कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. २६.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००४ ते २००७ या कालावधीशी संबंधित एकूण ५ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - सन २००४ ते २००७ या कालावधीत एकूण कामे,कोणत्या फंडातून मंजूर झाले तसेच अपूर्ण व पूर्ण झाले याचा गोषवारा, त्या कामांचा कॉलीटी कंट्रोल अहवाल, सन २००७ मधील नियोजित कामाची माहिती इस्टिमेट रक्कम, कोणत्या फंडामध्ये आहेत ती यादी, सन २००६ व २००७ अद्यापपर्यंत पूर्ण व अपूर्ण कामावर मुख्याधिकारी या नात्याने तसेच नगर अभियंता यांनी दोघांनी मिळून केलेली पहाणी अहवाल (O.M.Report) (ऑब्झर्वेशन मेमो), सदरील कामे इस्टीमेटप्रमाणे किंवा योग्य रित्या होत असल्याबाबतचा जन माहिती अधिकारी यांचा अभिप्राय या सर्व माहितीच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताच सकारात्मक प्रतिसाद न देता अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २८.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये मुदतवाढ देण्याची विनंती केली व तद्नंतर दि. २९.९.२००७ रोजी माहिती तयार असल्याचे व माहितीपोटीचे शुल्क रु.१०/- त्यांच्याकडे भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने रु.१०/- इतक्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरणा केला व माहिती हस्तगत केली. तथापि या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ३०.१०.२००७, १४.११.२००७ व २३.११.२००७ रोजी अशा तीन वेळेस सुनावणी ठेवून आपले आदेश दि.२६.११.२००७ रोजी पारित केले. या सुनावणीच्या

वेळेस जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ३०.१०.२००७ रोजी माहिती पुरविल्याचे सिध्द झाल्याने,अपिलार्थीचे अपील त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याचे नमूद करुन, निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे विनापरवानगी गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांना दि. ३०.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेली माहिती निश्चितपणे कशी परिपूर्ण नाही, तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी एकतर्फी निर्णय दिला, असे त्यांच्या द्वितीय अपील अर्जात नमूद केले हे सिध्द करण्यासाठी, ते आयोगासमोर विनापरवानगी गैरहजर असल्यामुळे, कळण्यास मार्ग नाही. उपलब्ध कागदपत्रांवरुन जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २३.११.२००७ रोजी घेतलेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर होते. दि. ३०.१०.२००७ रोजीच्या सुनावणीस अपिलार्थी हे उशीरा हजर झाले असल्याचे दिसून येते, त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नसल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.९.२००७ रोजी पत्र पाठविल्यापृष्ठयर्थ आयोगासमोर कार्यालयाची जावक नोंदवही सादर केली आहे. यामध्ये अपिलार्थीस दिलेल्या दि. २९.९.२००७ रोजीच्या पत्राचा उल्लेख आयोगास आढळून आला नाही, याबाबत सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री. ज्योतीबा रामराव एडगे यांच्याकडे दि. २९.९.२००७ रोजी व्यक्तिश: हस्तांतरित केल्याचे आयोगास सांगितले व यापृष्ठयर्थ श्री. एडगे यांची पोचसही असलेल्या पत्राची प्रत आयोगास दाखविली. सदर पत्र अपिलार्थीस देण्याऐवजी अपिलार्थीच्या प्रतिनिधीस का दिले, याची विचारणा केली असता त्यांनी अपिलार्थीने त्यांना श्री.एडगे यांच्याकडे पत्र देण्याबाबत दूरध्वनीवरुन विनंती केली असल्याने त्यांनी सदर पत्र त्यांना दिले, असे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती चुकीची असून इत:पर माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त अर्जासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार करताना त्यांनी तो फक्त अर्जदाराशीच

सरळ करावा, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या द्वितीय अपील अर्जात, त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील तीनही सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी गैरहजर असताना त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली नाही, असे नमूद केले आहे, या मुद्यावर त्यांना असे स्पष्ट करण्यात येते की, जन माहिती अधिकारी हे केवळ गैरहजर आहेत, या कारणावरुन जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची अथवा त्यांना शास्ती लावण्याची तरतुद माहिती अधिकार अधिनियमामध्ये नाही. त्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या अपील अर्जामध्ये अंतिमतः त्यांना परिपूर्ण माहिती देण्यात आली नसल्याचे नमूद केले आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती परिपूर्ण कशी नाही हे सांगण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थीचा हा मुद्दा देखील आयोग फेटाळून लावत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २६.७.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क व त्याचा संपूर्ण तपशील अपिलार्थीस कळविणे भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही केली नाही, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी सरळ पत्रव्यवहार न करता त्यांच्या प्रतिनिधीस विहित मुदतीनंतर माहिती हस्तांतरित केली. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते, या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील

फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : ०७-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजकुमार माधवराव कोरेकर, मु.पो.मंगरुळ ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, नळदुर्ग ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८२
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजकुमार माधवराव कोरेकर,<br>रा.मंगरुळ,ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, उस्मानाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत,तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली, त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापही पुरविण्यात आली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दि. ५.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयामार्फत सध्या चालू असलेल्या व झालेल्या रोहयो कामांसंदर्भात सन २००६ ते

२००७ या कालावधीशी संबंतधित एकूण ३ मुद्यांद्वारे काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये -उस्मानाबाद तालुक्यातील भू विकास कामावर सन २००६-२००७ मध्ये झालेले खर्च व मस्टरची झेरॉक्स , रो.ह.यो. अंतर्गत झालेल्या कामावर मजूरांचे शिल्लक राहिलेल्या कुपनाची वाटप केलेली रक्कम, गावनिहाय व गटनिहाय व मजूरांच्या यादीची झेरॉक्स सत्यप्रत, मजूरांच्या मस्टर्सच्या झेरॉक्स - या मुद्यांचा समावेश होता. सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १०.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विस्तृत प्रमाणात असल्याने ही माहिती देण्यास वेळ लागणार, याची कल्पना अपिलार्थीस दिली. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीच माहिती प्राप्त झाली नसल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ९.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, त्यांनी सदरची माहिती दि. १०.१२.२००७ पर्यंत विनामूल्य देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १०.१२.२००७ पर्यंत माहिती न देता, अंतिमतः ती माहिती दि. ७.४.२००८ रोजी पुरविली आहे. ही माहिती प्राप्त झाल्याप्रित्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. ७.४.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राच्या कार्यालयीन (स्थळ) प्रतीवर पोचसही दिलेली आहे, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले असल्याचे व त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नसल्याचे लिहून दिले आहे. हे पाहता अपिलार्थीस आता त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असल्याने त्यांना माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे कोणतेही आदेश देण्यात येत

नाहीत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती २११५ इतक्या पृष्ठांची असून अपिलार्थीस त्यांनी ही माहिती दि. ७.४.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे.(अपिलार्थीस ही माहिती त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली आहे)अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना देण्याकरिता त्यांच्या कार्यालयातील साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार होती, त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब झाला. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज सुनावणीस उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता जन माहिती अधिकारी यांचा हा युक्तिवाद आयोगास योग्य वाटतो. मात्र या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ५.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जास प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क व त्याचा संपूर्ण तपशील अपिलार्थीस कळविणे भाग होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कार्यवाही न करता अपिलार्थीस फक्त त्यांना माहिती देण्यास वेळ लागेल, एवढेच त्यांनी त्यांच्या दि. १०.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविले. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) चा भंग केल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे. अपिलार्थीस आता पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने व अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी नाकारल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतेही कारवाई करण्याचे आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजकुमार माधवराव कोरेकर, मु.पो.मंगरुळ ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, उस्मानाबाद जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,उस्मानाबाद औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८३
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन संतुकराव देशमुख,<br>मु. पो. पिंपळगाव (रेणुकाई),<br>ता.भोकरदन,जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>वनक्षेत्रपाल, अजिंठा ता.सिल्लोड<br>जि.औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपवनसंरक्षक, औरंगाबाद | | |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद.

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज करुनही माहिती दिली नसल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीसाठीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दि. १२.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित दि.१.४.२००७ ते ३.५.२००७ या कालावधीशी संबंधित

रो.ह.योजनेच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - रोहयो कामासाठी प्राप्त झालेला निधी रु.१३.२६ लक्ष कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला, त्या कामाचे गटनिहाय नाव,मजूरांची संख्या, त्यांचे हजेरीपत्रक यांची तपशीलवार माहिती व जाईदेव येथे वघळीच्या कामांची संपूर्ण यादी व अंदाजपत्रक, मूळ रक्कम व हजेरीपट - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ४.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार करण्यात आली असून सदरील माहिती वनपरिक्षेत्र कार्यालय,अजिंठा यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपिलार्थीस या पत्राद्वारे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. १३.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन, अपिलार्थीस समक्ष माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व त्यांच्या आदेशाबाबतचा अनुपालन अहवाल ७ दिवसांचे आत त्यांच्याकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या संपूर्ण माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहितीसाठी दिलेला अर्ज ते स्वीकारीत नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी ३.२६ लक्ष निधी उचलला असून त्यांच्या परिक्षेत्रात त्यांनी हा निधी ज्या कामासाठी प्राप्त झाला ते काम प्रत्यक्षात झाले नाही व वनमजूरांचे मस्टर बोगस भरले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी यांना त्यांच्याकडे वेगवेगळया माहितीची मागणी करण्याची सवय असून २००६ साली देखील अपिलार्थीने केलेल्या अशाच अर्जाद्वारे मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व कामे दाखविली होती व ही कामे पाहिल्यानंतर अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे, जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने दि. ३०.८.२००६ रोजी लिहून दिले आहे. या प्रकरणी अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे रु.२५०००/- इतक्या रकमेची मागणी करीत होते. परंतु अपिलार्थीची मागणी पूर्ण न केल्याने त्यांनी हे अपील आयोगाकडे केले आहे. अपिलार्थीच्या दि. १२.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात देखील त्यांना वेळोवेळी माहिती देण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. अपिलार्थीने या प्रकरणी व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती घेऊन जाण्यासाठी कधीही उपस्थित राहिले नाहीत. त्यांच्या या विधानापृष्ठयर्थ त्यांनी दि. ३१.१.२००८ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र आयोगास दाखविले. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात दि. १२.६.२००७ रोजी दिलेला अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षात सहायक वन संरक्षक, औरंगाबाद यांच्याकडून दि. ३१.७.२००७ रोजी प्राप्त झाला आहे.

जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीने जरी हा अर्ज वन क्षेत्रपाल यांना उद्देशून केला असला तरी त्यांनी प्रत्यक्षात तो पोस्टाने सहायक वन संरक्षक, औरंगाबाद यांच्या पत्त्यावर पाठविला. त्या कार्यालयाकडून अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दि. ३१.७.२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दि. ४.८.२००७ रोजी अपिलार्थीस माहिती तयार असल्याचे व ती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे पत्र लिहिले आहे. सदर पत्र अपिलार्थीस मिळाले नाही, असे

अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये सांगितले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याचा आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये प्रथम प्रतिसाद दिल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने मध्यंतरीच्या कालावधीत अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दि. १३.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, या अपिलावर दि. ६.८.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन, या संदर्भातील आपले आदेश दि.१३.८.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस ७ दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्यात येणारी माहिती, सशुल्क अथवा विनामूल्य द्यावयाची किंवा कसे याबाबत कोणताही उल्लेख केला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २५.८.२००७ रोजी सशुल्क माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले व तद्नंतर दि. ३१.१.२००८ रोजी पुन्हा माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. या प्रकरणी असे दिसून येते की, हे प्रकरण हाताळताना अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांकडूनही चुका झालेल्या आहेत. अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज पूर्णपणे भरला नाही. त्यामुळे सदर मूळ अर्ज अपूर्ण ठरत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी त्यांच्या दि. ४.८.२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम त्यांना कळविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील निर्णयासंदर्भात दिलेल्या आदेशामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी कशाप्रकारे माहिती पुरवावयाची आहे, याचे स्पष्ट आदेश दिले नाहीत. तद्नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २५.८.२००७ रोजी सशुल्क व दि.३१.१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती

विनामूल्य देण्यात येईल किंवा कसे याचा कोणताही उल्लेख केला नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, अधिनियमाद्वारे विहित केलेली कालमर्यादा आता व्यपगत झाली असल्याने, अधिनियमातील कलम ७(६) नुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य द्यावी लागेल. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत त्यांच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध करुन ठेवावी. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी लागेल.सदर विहित कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य उपलब्ध होऊ शकणार नाही तसेच सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचा कोणताही प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविणे त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यपध्दतीबाबत काही आक्षेप नोंदविले आहेत, या संदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, यासंदर्भात त्यांची काही तक्रार असल्यास रो.ह.योजनेमधील कामासंदर्भात महसूल विभागाचे आयुक्त, ज्यांना सक्षम प्राधिकरण म्हणून शासनाच्या नियोजन विभागातर्फे नेमले गेले आहे, त्या महसूल विभागाकडे त्यांनी वेगळयाने अर्ज करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०७-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गणपत संतुकराव देशमुख, मु.पो.पिंपळगाव (रेणुकाई), ता.भोकरदन, जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा वनक्षेत्रपाल, वनपरिक्षेत्र अजिंठा, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८४
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन संतुकराव देशमुख,<br>मु. पो. पिंपळगाव (रेणुकाई),<br>ता.भोकरदन,जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जालना<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय कृषि अधिकारी,जालना<br>जि.जालना | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी आयोगासमोर असे कबूल केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अपिलासंदर्भात त्यांनी मागणी केलेली माहिती दि. २०.८.२००८ रोजीच्या आयोगाच्या आदेशानंतर मिळाली असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती येणे बाकी नाही.

आयोगाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणातील मूळ माहितीच्या अर्जावर राज्य माहिती आयोगाने सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २०.८.२००८ रोजी निर्गमित केले आहेत. अपिलार्थीने एकाच माहितीसाठीच्या अर्जावर दोन वेगवेगळया तारखांना स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत. त्यापैकी अपिलार्थीच्या एका द्वितीय अपील अर्जावर निर्णय झाला असल्याने आज विचाराधीन असलेल्या अपील अर्जावर विचार करण्याचे कोणतेही कारण आयोगास आढळून येत नाही.

खुद्द अपिलार्थीने आयोगाचे दि. २०.८.२००८ रोजीच्या निर्णयानंतर त्याचविषयी दि. २९.१०.२००७ रोजी केलेले दुसरे द्वितीय अपील त्यांना चालवावयाचे नाही असे कबूल केल्याने अपिलार्थीचे अपील क्र.२१८४/०७, दि. २९.१०.२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.२१८४/०७, दि.२९.१०.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,मु. पो. पिंपळगाव (रेणुकाई),ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,जालना जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८५
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन संतुकराव देशमुख,<br>मु. पो. पिंपळगाव (रेणुकाई),<br>ता.भोकरदन,जि.जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता (लघुपाटबंधारे )<br>जिल्हा परिषद उपविभाग,भोकरदन,<br>जि.जालना | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे),<br>जिल्हा परिषद,जालना | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणात अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी दोन वेळा सुनावणी ठेऊन दोनही वेळेस सुनावणी रद्द केली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २५.६.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "दि. २२.२.२००७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या रु. ७.७१ लक्ष

व ३.८४ लक्ष हा निधी कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला होता, त्या कामाचे नाव, मंजूरांची संख्या, हजेरीपत्रके आदी तपशीलवार माहिती देण्यात यावी" अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार दि. ३०.७.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. सुनावणीस उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी या अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय दिल्याचे आयोगासमोर सांगत आहेत, तथापि या संदर्भातील निर्णयाची प्रत ते आयोगासमोर सादर करु शकत नाहीत, यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आयोगास सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांना दि. २१.११.२००७ रोजीच्या लेखी पत्राद्वारे त्यांचे प्रथम अपील, त्यांना दि. २५.६.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती मिळाली असल्याने निकाली काढण्याची विनंती केली असल्याचे पत्र आयोगास सादर केले आहे. या पत्रावरुन अपिलार्थीने त्यांचे प्रथम अपीलच मूळात निकाली काढण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे, तथापि आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सादर केलेल्या दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्रावरील सही त्यांची नसल्याचे आयोगास सांगितले. आयोगाकडे उपलब्ध असलेल्या इतर कागदपत्रांवरुन अपिलार्थीच्या सहया पाहिल्या असता,त्यामध्ये सकृतदर्शनी साधर्म्य आढळत

असल्याने अपिलार्थीचे हे म्हणणे आयोग ग्राहय धरत नाही. अपिलार्थीने आयोगास आजच्या सुनावणीमध्ये असेही अवगत करुन दिले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१२.२००८ रोजी पत्र लिहून त्यांच्या कार्यालयाकडे वरील प्रकरणी रु.७.७१ लक्ष व रु.३.८४ लक्ष इतका निधी त्यांच्या उपविभागाकडे प्राप्त झाला नाही, असे कळविले आहे. जर त्यांच्या विभागाकडे निधी प्राप्त झाला नव्हता, तर त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. २५.६.२००७ रोजीच्या अर्जास निश्चित कोणती माहिती दिली अशी शंका अपिलार्थीने व्यक्त केली.

या संपूर्ण प्रकाराचे स्पष्टीकरण करताना जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेला निधी हा जिल्हा परिषदेच्या वित्त खात्याकडील एकत्रित निधीमध्ये जमा केला जातो व या निधीचे वितरण जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी हे संबंधित जिल्हा परिषद कायद्यातील तरतुदीप्रमाणे व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या आवश्यकतेप्रमाणे करीत असतात. जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडून दि. २२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे रु.७.७१ लक्ष व रु.३.८४ लक्ष अशा दोन वेगवेगळया पतमर्यादा मंजूर करण्यात आल्या होत्या. सदर निधी रो.ह.यो.च्या कुशल बाबीवर खर्च करावयाचा असल्याने हा निधी रोहयो कामाच्या कुशल बाबीवर खर्च करण्यात आला आहे. उपअभियंता, भोकरदन यांच्याकडे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून अपिलार्थीने नमूद केलेला रु.७.७१ लक्ष व रु.३.८४ लक्ष इतका निधी सरळ (Directly)प्राप्त झाला नव्हता.त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे त्यांच्या कार्यालयाकडे निधी प्राप्त न झाल्याचे उत्तर बरोबर आहे, असे त्यांनी आयोगास स्पष्ट केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले स्पष्टीकरण व उपलब्ध कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, जिल्हाधिकारी,जालना यांनी दि. २२.२.२००७ रोजीच्या त्यांच्या आदेशाद्वारे दिलेल्या रु. ७.७१ लक्ष व रु.३.८४ लक्ष या पतमर्यादेमध्ये त्यांनी जी कामे पूर्ण केली आहेत, त्या कामांची यादी जन माहिती अधिकारी यांचेकडून अपिलार्थीस देय ठरते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २९.१२.२००८ रोजी दिलेले पत्र त्यांच्या दृष्टीने जरी बरोबर असले तरी अपिलार्थीस माहिती देताना त्यांनी वरील वस्तुस्थिती या पत्रामध्ये स्पष्ट करणे गरजेचे होते. तथापि त्यांनी ही वस्तुस्थिती

त्यांच्या दि. २९.१२.२००८ रोजीच्या पत्रामध्ये स्पष्ट केली नाही. त्यामुळे कदाचित अपिलार्थीचा गैरसमज झाला असावा, असे अनुमान काढण्यास हरकत नाही. अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज अपूर्ण भरला आहे. द्वितीय अपिलावर दिनांक नमूद केला नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडून त्यांना दि. २२.२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या वेगवेगळया पतमर्यादेअंतर्गत त्यांनी ज्या कामावर निधी खर्च केला होता, त्या कामांची यादी त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात याच कालावधीत व्यक्तिशः उपस्थित राहून प्राप्त करुन घ्यावी, त्यांनी मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती अपेक्षिली असल्यामुळे ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना त्यांचा कोणताही प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाठविणे अनुज्ञेय असणार नाही. तसेच अपिलार्थीने या कामासंदर्भातील मस्टर्सची तपासणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वतंत्र अर्ज केल्यास, त्यांनी संबंधित मस्टर्सच्या प्रती अपिलार्थीस तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : ०७-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख,मु. पो. पिंपळगाव (रेणुकाई),ता.भोकरदन,जि.जालना

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे उपविभाग भोकरदन,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (लघुपाटबंधारे), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१८६
निर्णय दिनांक ०७-०१-२००९

१ श्री. मगन दगडू अहिरे, : अपिलार्थी
रा.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी
समिती,औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी तथा
वरिष्ठ संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी
समिती,औरंगाबाद

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: उपसंचालक (सं.),
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी
समिती,औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली जानेवारी, २००६ ते डिसेंबर, २००६ या कालावधीतील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी नोंदवही नमुना (ब) नियम ४ ची प्रत व नोंदवही नमुना (ड) नियम ६(१) ची जाने.०६ ते डिसें.०६ पर्यंतची मागणी केली होती.

तथापि ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही. सदर माहिती त्यांना विनामूल्य देय असल्याने त्यांनी मागितलेली या कालावधीतील अनुसूचित जमाति प्रमाणपत्र तपासणी वैध व अवैध प्रमाणपत्र नोंदवहयाची माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लावावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. २२.१२.२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी नोंदवही नमुना ब (नियम ४(४)) व नमुना ड (नियम ६(१)) च्या झेरॉक्स प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.१.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, "नमूना नोंदवही ऐवजी कॉलममध्ये बदल आहे. आपणास सदर वैध प्रकरणे व अवैध प्रकरणे नोंद वहयांचे झेरॉक्स पुरविण्यात येतील सदर बाब मान्य असल्यास तसे या कार्यालयास कळवावे. त्यानंतर रक्कम भरणा केल्यानंतर माहितीबाबत विचार होईल", असे कळविले. या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाविषयी जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २७.४.२००७ रोजीच्या नोंदणीकृत पत्राद्वारे आवश्यक रकमेसंदर्भात विचारणा केली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून शुल्कासंदर्भात आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीने दि. ४.१०.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपिलावर कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ७.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांना देण्यात येणारी माहिती ७७८ पृष्ठांची असून त्याप्रित्यर्थ अपिलार्थीस रु.१५५६/- इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(क) प्रमाणे अपेक्षित असलेला सर्व खुलासा केल्याचे दिसून येते. सदर निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी सहआयुक्त तथा समिती उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती यांचे दि. ७.१.२००९ चे पत्र आयोगासमोर सादर केले असून त्यामध्ये असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीची विनाशुल्क माहितीची मागणी नाकारली होती. सदर चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस दि. ३.५.२००८ रोजी पोस्टाने माहिती पाठविली होती. तथापि सदर माहितीची तामिली अपिलार्थीस होऊ शकली नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये, 'श्री. मगन दगडू अहिरे, प्रमुख लिपीक,जिल्हाधिकारी कार्यालय, जालना, मु.पो.जि.जालना' असा पत्ता दिला होता.या पत्त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती अपिलार्थी हे या पत्त्यावर उपलब्ध नसल्याने त्यांना प्राप्त होऊ शकली नाही. जालना जिल्हाधिकारी कार्यालयात अपिलार्थीचा नवीन पत्ता, 'श्री.एम.डी.अहिरे,B/H High Cont., MRT, औरंगाबाद' असा होता. त्यामुळे या पत्त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती जालना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून Redirect करण्यात आली. तथापि या पत्त्यावर देखील अपिलार्थी उपलब्ध न झाल्याने ही माहिती त्यांच्याकडे अंतिमतः परत आलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात दिलेला पत्ता चुकीचा असल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दि. २२.१२.२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.१.२००७ रोजीच्या पत्रान्वये अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला होता तथापि या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्यासंदर्भात कोणतीही सूचना केली नव्हती. त्यामुळे अपिलार्थी यांनी परत दि. २७.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविण्याची विनंती केली. तथापि अपिलार्थीच्या या पत्रास देखील जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जास प्रतिसाद न

मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ४.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी याची न सुनावणी घेता, अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कलम १९(६) अन्वये विहित केलेली कालमर्यादा व्यपगत झाल्यानंतर, दि. ७.१२.२००७ रोजी पत्र देऊन अपिलार्थी यांना त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटी रु. १५५६/- इतके शुल्क चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरण्याचे सूचित केले. या सर्व कागदपत्रांची तपासणी केली असता, मूळात अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क दि. २१.१.२००७ रोजी अगर तत्पूर्वी कळविणे अधिनियमातील कलम ७ (१) प्रमाणे अभिप्रेत असताना अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी अंदाजे एक वर्षाच्या कालावधीनंतर त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले. अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत झाली असल्याचे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जानंतर लक्षात आल्याने, त्यांनी दि. ०३.५.२००८ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पुरविली. परंतु अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर ते उपलब्ध न झाल्याने अंतिमतः अपिलार्थीस ही माहिती मिळू शकली नाही.

या घटनाक्रमाचे प्रामुख्याने दोन भाग पाडता येतील, त्यापैकी पहिला भाग म्हणजे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आपले कर्तव्य मूळात अधिनियमातील तरतुदीपमाणे पार पाडले आहे किंवा कसे, दुसरा भाग म्हणजे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जातील पत्त्यामध्ये बदल झाल्यानंतर, पत्त्यातील बदल संबंधित जन माहिती अधिकारी यांना कळविला किंवा कसे, या दोन्ही भागांची उत्तरे नकारार्थी आहेत. पहिल्या भागाचे अवलोकन करता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे प्रतिसाद न देता अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊ केली, तर दुसऱ्या भागासंदर्भात, अपिलार्थीने त्यांच्या पत्त्यामध्ये झालेला बदल जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास कळविल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जातील नोंदवही नमुना 'ब' व 'ड' मध्ये कोणत्या प्रकारची नोंद घेतली जाते, असे आयोगाने विचारले असता, नियम क्र. ४(४) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रथम अर्जाची नोंद, ज्यामध्ये अर्जदारांचे नाव, पत्ते,दिनांक,जात व प्रयोजन याचा उल्लेख असतो, ही माहिती त्यांनी अधिनियमाद्वारे ठेवली जाणे अपेक्षित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तथापि नियम ६(१) प्रमाणे निश्चित कोणती माहिती ठेवली जाते याचा खुलासा उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी आयोगास करु शकत नाहीत. अपिलार्थीस त्यांनी देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता सदर माहिती एका विहित नमुन्यामध्ये असल्याचे दिसून येते. तथापि या माहितीच्या स्तंभांना कोणतेही शीर्षक नाही, तसेच अपिलार्थीस कोणती माहिती द्यावयाची याची कल्पना उपस्थित जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना नाही. अपिलार्थीस दिलेली माहिती हीच आहे किंवा कसे याचा आयोगास अर्थबोध होत नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात नमुना ४(४) व नमुना ६(१) मधील विहित तरतुदीप्रमाणे माहितीचे व्यवस्थापन होत नसावे,असे अनुमान काढण्यात येत आहे. सबब सचिव (आदिवासी विकास) यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे असलेल्या माहितीचे व्यवस्थापन नियमाप्रमाणे अथवा विहित निर्देशाप्रमाणे केले जात आहे किंवा कसे याचा त्यांनी आढावा घेऊन क्षेत्रीय कार्यालयांना आवश्यक त्या सूचना एका परिपत्रकाद्वारे प्रसृत कराव्यात, जेणेकरुन या प्रकरणातील उणिवांसारख्या उणिवा क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या भविष्यातील कामामध्ये राहणार नाहीत. सदर सूचना त्यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(४) च्या तरतुदीप्रमाणे देण्यात येत आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे या प्रकरणी स्पष्ट होत असल्याने, सचिव (आदिवासी विकास) यांना,

त्यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांच्या कार्यालयात निर्दोष स्वरुपात हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत तयार करुन ठेवावी व अपिलार्थी त्यांच्याकडे या माहितीकरिता व्यक्तिशः आल्यास किंवा त्यांनी यासंदर्भात काही पत्रव्यवहार केल्यास, त्यांच्या नवीन पत्त्यावर त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत निर्दोष स्वरुपात तयार करुन, अपिलार्थीस ती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
३. सचिव (आदिवासी विकास) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ०७-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मगन दगडू अहिरे, उपप्रबंधक, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, जुन्या हायकोर्टाच्या पाठीमागे, स्नेहनगर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक (सं.) अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (आदिवासी विकास), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५६

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. वसंतराव बाजीराव रणशूर, अपिलार्थी
मामलेदार कचेरी रोड, वॉर्ड नं. १, श्रीरामपूर,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.),
जिल्हा परिषद कार्यालय, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : कार्यालयीन अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून, यामध्ये अपिलार्थीने सदर अपील, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती

त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याने केल्याचे दिसून येते. या अपिलात त्यांनी जन माहिती अधिकारी यांनीच जन अपिलीय अधिकारी म्हणून काम पाहून दिलेले दिनांक १५-१०-२००७ रोजीचे आदेश त्यांना समाधानकारक वाटत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली त्यांच्या कार्यालयाशी माहिती संबंधित असतांना अपिलार्थीस इतर कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्याचे सूचित करुन दिशाभूल केली व माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २५-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-१९६५ साली स्थापन झालेल्या हरेगांव ग्रामपंचायत तालुका श्रीरामपूर निर्मितीबाबत काढण्यात आलेल्या शासकीय आदेशाच्या छायांकीत प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर माहिती शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने ही माहिती जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडून उपलब्ध करुन घेण्यासाठी व तसेच दिनांक १३-०७-२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती शासकीय फोटो झिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर सुनावणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी घेतली. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणीवर आक्षेप घेऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, मूळात त्यांनी मागणी केलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे असणे अनिवार्य आहे. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्याकडे अपील केले असता या

अपिलाची सुनावणी जन माहिती अधिकारी यांनीच घेतली व सुनावणीवर निर्णय देखील त्यांनीच पारित केला त्यामुळे त्यांना प्रथम अपिलाच्या पातळीवर योग्य तो न्याय मिळाला नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादामध्ये तथ्य असल्याचे आयोगास आढळून आले आहे. या प्रकरणीचे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीवर त्यांचे नियंत्रण आहे हे पाहता, यातील गांभीर्य लक्षात घेऊन जिल्ह्यातील इतर सर्व ग्रामपंचायतीचे निर्मितीविषयक शासकीय आदेश, सूचना त्यांच्या कार्यालयात असणे नितांत गरजेचे आहे. अपिलार्थीने मागणी केलेले दस्तऐवज शासनाच्या "अ" प्रवर्गातील अभिलेख्यात मोडत आहे त्यामुळे हे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांनी कायमस्वरुपी जतन करुन ठेवणे त्यांना भाग आहे. हे पाहता ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी आता जर त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर त्यांनी ती शासनाशी पत्रव्यवहार करुन अथवा व्यक्तिगत संपर्काव्दारे प्राप्त करुन घ्यावी व ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जिल्हाधिकारी कार्यालय अथवा इतर खात्याकडे संपर्क साधण्याचे कोणत्याही असद्हेतुने सूचित केल्याचे वा माहिती नाकारल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने व अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर
दिनांक ०९-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंतराव बाजीराव रणशूर, मामलेदार कचेरी रोड, वॉर्ड नं. १, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५७

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. अर्जून राधाकृष्ण शिंदे, अपिलार्थी
५९१ लकारे गल्ली, भिंगार,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक २, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक २, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई कार्यालयात दिनांक ०३-११-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मागणी केलेली माहिती न देता, मागणी न केलेली माहिती दिली आहे, दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे, जादा शुल्क घेऊन कमी कागदपत्रे दिली आहेत व माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींची पायमल्ली जन माहिती अधिकारी यांनी केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये त्यांच्या स्वतःच्या आस्थापना विषयक बाबीसंदर्भात जानेवारी २०००

ते मे २००६ या कालावधीशी संबंधीत काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ८ मुद्दयांव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कार्यकारी अभियंता मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक २ यांच्या कार्यालयाचे आदेश क्रमांक २३, २४, ३० व क्रमांक ११/२००४ हे कोणत्या नियमाव्दारे निर्गमित केले त्या नियमाची प्रत व कार्यकारी अभियंता यांच्याकडील दिनांक ०६-११-२००३ च्या पत्राव्दारे त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या पत्रव्यवहाराच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तदनंतर अपिलार्थीने दिनांक १३-०६-२००६ रोजी सदर शुल्क भरल्यानंतर दिनांक ११-०७-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन दिली. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ११-०७-२००६ रोजी प्राप्त झाली. माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १७-०६-२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर त्यांची पोचसही केल्याचे दिसून येते. ही सही अपिलार्थीने केल्याचे आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे, तथापि प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०८-२००६ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले आदेश पारित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतेही निश्चित स्वरुपाचे आदेश दिले नसून अपिलार्थीसोबत त्यांनी घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त यासंदर्भात आयोगास सादर केले आहे. या इतिवृत्तास प्रथम अपिलाचा निर्णय म्हणता येणार नाही. या कथित आदेशाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणीची पार्श्वभूमी थोडक्यात अशी विषद केली की, अपिलार्थी हे सध्या रोजगार हमी योजना विभागात अहमदनगर येथे वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असून ते पूर्वी कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक २ या कार्यालयामध्ये वरिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत होते. त्यांना शासनाच्या आदेशानुसार कालबध्द पदोन्नती तसेच या दिलेल्या पदोन्नतीनुसार त्यांच्या वेतनाचे अनुषंगीक सर्व फायदे त्यांना देण्यात आले होते, तथापि हे पदोन्नती आदेश काढल्यानंतर तत्काळ रद्द करण्यात आले. तसेच दुस-या एका प्रकरणात अपिलार्थी कार्यालयात हजर असूनही

गैरहजर दर्शवून त्यांना १७ दिवसांच्या कालावधीचे, त्यांनी या कालावधीमध्ये कोणतेही काम केले नाही म्हणून वेतन दिले नाही. त्यांनी आयोगासमोर पुढे असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधीत त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रती त्यांना दिलेल्या आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ शी संबंधीत कागदपत्रे त्यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांनी हेतूतः टाळलेले नाही.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, त्यांना एकदा देण्यात आलेली पदोन्नती व तदनुषंगीक फायदे आणि त्यानंतर कोणत्याही कारणाशिवाय पदोन्नती रद्द केल्याच्या संदर्भातील असल्याचे दिसून येते. आयोगाकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एकदा दिलेली पदोन्नती त्यांनी का रद्द केली यासंदर्भात, आयोगास त्यांच्याकडील कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे सांगून, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी सदर निर्णय एकतर्फी व अतार्कीक पध्दतीने घेतला असावा, अशी शक्यता व्यक्त केली. सुनावणीमध्ये आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या प्रकरणात कोणतेही कारण न देता एकदा दिलेली पदोन्नती रद्द करुन पदोन्नतीपासून प्राप्त होणा-या सर्व फायद्यांपासून संबंधीतांनी कोणत्याही कारणांची नोंद अभिलेख्यावर न ठेवता वंचित ठेवल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारच्या प्रशासकीय बाबीमध्ये हस्तक्षेप करण्याची आयोगास अधिकारिता नाही, तथापि अपिलार्थीच्या कालबध्द पदोन्नतीसंदर्भात व याचबरोबर अपिलार्थीस कोणत्याही कारणाशिवाय केवळ त्यांनी काम केले नाही असे समजून त्यांचा १७ दिवसांच्या सेवेचा, ते प्रत्यक्ष कार्यालयात हजर असूनही गैरहजर असल्याचे दर्शवून त्यांच्या सेवेचा हा कालावधी हा असाधारण रजा समजण्यात आला. या दोनही मुद्दयाशी संबंधीत प्रकरणी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांनी चौकशी करुन दोन्ही मुद्दयावरील चौकशीचा आपला निर्णय अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत द्यावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्याचे व माहितीपोटी जादा शुल्क आकारल्याचे प्रतिपादन केले आहे. यासंदर्भात अपिलार्थीने असे सांगितले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून २४ पृष्ठांच्या माहितीसाठी ४८ रुपये इतके शुल्क आकारुन प्रत्यक्षात त्यांना १५ पृष्ठांची माहिती विलंबाने देण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०६-२००६ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४८ त्यांचे कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या सुचनेनुसार अपिलार्थीने दिनांक १३-०६-२००६ रोजी

हे शुल्क भरल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०६-०७-२००६ रोजी देय असतांना त्यांना ती दिनांक ११-०७-२००६ रोजी सशुल्क पुरविण्यात आली आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अधिनियामातील कलम ७ मधील तरतुदीनुसार न देऊन या कलमाचा भंग केल्याचे दिसून येते, मूळ अर्जातील माहिती देण्यासाठी अधिनियमातील तरतुदीपेक्षा ५ दिवसाच्या विलंबाने दिल्यामुळे आता अपिलाथीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य देय ठरते. परिणामी जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीकडून त्यांनी या माहितीपोटीचे घेतलेले शुल्क रुपये ४८ इतके त्यांना परत करावे लागेल. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-११-२००३ रोजीचे पत्र उपलब्ध असल्याचा पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. सदर पुरावा म्हणजे अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांनी अपिलार्थीस लिहिलेले दिनांक १०-११-२००३ रोजीचे पत्र असून या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या दिनांक ०६-११-२००३ रोजीच्या पत्राचा संदर्भ त्यामध्ये असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने सादर केलेला पुरावा आयोग ग्राह्य धरत असून, जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, सदर पत्राचा त्यांनी त्यांच्या कार्यालयात शोध घेऊन जर सदर पत्र त्यांना हे आदेश निर्गमीत झ ाल्यापासून ३० दिवसापर्यंत उपलब्ध झाले नाही तर याविषयाचे अभिलेख जतन करुन ठेवण्याची जबाबदारी त्यांच्या कार्यालयातील ज्या कर्मचा-यावर होती त्या कर्मचा-यावर त्यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंग विषयक कारवाई अथवा फौजदारी कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत करावी. व जर पत्र उपलब्ध झाले तर त्याची प्रत अपिलार्थीस याच कालावधीत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविल्याचे म्हटले आहे. तथापि सदर माहितीमध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून वेळोवेळी मिळालेली ज्ञापने आहेत व ज्ञापनाची मागणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली नव्हती. ही ज्ञापने अपिलार्थीस देण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता अपिलार्थीने त्यांची रजा बिनपगारी करण्याच्या कारणासमर्थनार्थ त्यांनी या ज्ञापनाच्या प्रती अपिलार्थीस दिल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या ज्ञापनाच्या प्रती देण्याची या प्रकरणी गरज नव्हती असे आयोगास आढळून आले आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी एकूण पाच दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे वर म्हटल्याप्रमाणे सिध्द झाले आहे. कायद्यातील तरतुदी त्यांना नीटपणे समजल्या नसल्याने त्यांनी अपिलार्थीने आवश्यक ते

शुल्क भरल्यानंतर ३० दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती देणे अनुज्ञेय असल्याचे अनुमान काढून अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलबं लावल्याचे दिसून येत आहे. त्यांनी हा विलंब कोणत्याही असद्‌हेतूने लावल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन निःसंशयपणे दिसून येत नाही. त्यामुळे अधिनियमातील कलम २० प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश आयोग देत नाही, मात्र येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जावर कारवाई करण्याबाबत सतर्क राहावे, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून माहितीपोटीचे घेतलेले शुल्क त्यांना, हे आदेश निर्गमित होताच २४ तासाच्या आत परत करावे.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती ३० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर

दिनांक ०९-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अर्जून राधाकृष्ण शिंदे, ५९१ लहारे गल्ली, भिंगार, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक २, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग क्रमांक २, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५८

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. अनिल दिनकर तारु, अपिलार्थी
मु. पो. गुहा, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : श्री. सखाराम मारुती कवडे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १८-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ८ (त्र) प्रमाणे त्रयस्थ पक्षाविषयी, त्यांनी मागितलेली माहिती नाकारल्याचे नमूद करुन, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. कवडे, शिक्षण विस्तार अधिकारी

यांच्यासंदर्भात एकूण दहा मुद्दयांवर काही माहिती मागितली होती. या माहितीमध्ये - श्री. कवडे यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी, सर्व शिक्षा अभियान या विभागात कोणत्या पदावर काम करत होते त्या पदाचे पदनाम, त्या पदाला शासकीय मान्यता होती काय, ते पद शिक्षण विस्तार अधिकारी या पदाशी समांतर होते काय, नसेल तर कसे, श्री. कवडे यांनी ज्या पदावर काम केले त्या पदाची आणि शिक्षण विस्तार अधिकारी या पदाच्या वेतनश्रेणीत फरक असेल तर तुलनात्मक माहिती, प्रतिनियुक्तीच्या कालावधीत श्री. कवडे यांनी शिक्षण विस्तार अधिकारी या पदाव्यतिरिक्त घेतलेले भत्ते व सवलती, श्री. कवडे यांनी केलेला प्रवास व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी अशैक्षणिक काम करणे योग्य आहे काय, त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांची मंजुरी घेतली आहे काय - या मुद्दयांचा समावेश होता. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष यांचा युक्तिवाद ऐकून घेता, अपिलार्थी यांनी त्यांना ही माहिती प्राप्त झाल्यानंतर ते कोणते व्यापक जनहीत साध्य करणार आहेत याचा आयोगाकडे खुलासा केला आहे. त्यामध्ये त्यांनी असे सांगितले की, श्री. कवडे यांना शासकीय निधीतून त्यांचे वेतन व वेगवेगळे भत्ते मिळत असतात त्यामुळे श्री. कवडे यांची माहिती प्राप्त झाल्यास शासकीय निधीचा गैरवापर सिध्द झाल्यास त्यातून त्यांना व्यापक जनहीत साध्य करता येईल. श्री. कवडे यांनी अशैक्षणिक कामे केल्याबाबत त्यांच्याकडे काही पुरावा आहे काय ? अशी आयोगाने विचारणा केल्यानंतर असा कोणताही पुरावा अपिलार्थी यांच्याकडे नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अधिनियामतील कलम ८ (त्र) नुसार नाकारली आहे. अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार वेगवेगळया विषयावर माहितीची मागणी करत असतात व त्यांना ही माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. त्रयस्थ पक्ष श्री. कवडे यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी सर्व शिक्षा अभियानांतर्गत अथक परिश्रम घेऊन व कष्टाची कामे करुन त्यांची शारीरिक हेळसांड केली आहे व त्यामुळे ते आजारी पडले आहेत. एवढे असूनही त्यांनी प्रामाणिकपणे आपले काम करुनही अशा प्रकारची माहिती त्यांच्याबाबत अपिलार्थीने विचारल्यानंतर त्यांचे व त्यांच्यासारख्या अधिका-यांचे मनोधर्य खच्ची होऊन या कामाविषयी ती कामे धडाडीने करण्यात त्यांना कोणतेही स्वारस्य रहाणार नाही, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक २४-०१-२००७ रोजीच्या मूळ माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००७ रोजी अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (त्र) अन्वये माहिती देण्याचे नाकारले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाविरुध्द अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात आपले आदेश दिनांक १३-०३-२००७ रोजी पारित करुन जन माहिती अधिकारी यांच्याप्रमाणे भूमिका घेतली व अपिलार्थीचे अपील अंतीम केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील दहा मुद्दयांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, या दहा मुद्दयांपैकी एकूण चार मुद्दयांवर (अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४, ५, ७ व १०) अपिलार्थीस माहिती देय होत नाही. या मुद्दयांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचे अभिप्राय अपेक्षित करणा-या व खुलाश्यांच्या स्वरुपात माहिती मागितल्याचे दिसून येते, ती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (च) प्रमाणे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत असलेली माहिती देय होते. अधिनियमातील कलम २ (च) मधील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतदीनुसार प्रश्न विचारणे, त्यांच्या निर्णयासंबंधी कारणे अथवा खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारणे, त्यांना अनुज्ञेय नाही. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ८ (त्र) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारले आहे.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील वरील ४ मुद्दयावरील माहिती वगळता उर्वरित ६ मुद्दयांसदर्भातील माहिती प्रगट केल्याने, या प्रकरणी त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीमध्ये हस्तक्षेप होईल, असे आयोगास वाटत नाही, कारण अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उर्वरित सहा मुद्दयाव्दारे जी माहिती मागितली आहे त्यामध्ये श्री. कवडे यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश, त्यांच्या पदाची वेतनश्रेणी, श्री. कवडे यांची मासिक दैनंदिनी व त्यांना प्राप्त झालेले प्रवास बील यांचा समावेश आहे ही कागदपत्रे शासनाच्या अथवा सार्वजनिक प्राधिकरणाच्या इतर विभागाकडे, शासकीय कोषागाराकडे तसेच शासनाच्या वित्त व प्रशासकीय विभागाकडे उपलब्ध होत असतात, ही कागदपत्रे गोपनीय स्वरुपाची नाहीत तसेच ही माहिती शासकीय निधीशी निगडीत असल्याने व शासकीय निधी हा सार्वजनिक स्वरुपाचा निधी असल्याने, परिणामी ही माहिती सार्वजनिक माहिती असल्याने अपिलार्थीस अशा प्रकारची ही माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना डावलता येणार नाही. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी

अपिलार्थीने मागणी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २, ३, ६, ८, ९ शी संबंधीत माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १, २, ३, ६, ८, ९ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिल दिनकर तारु, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३५९

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. विजयकुमार बाबुराव बोरकर, अपिलार्थी
'सौभद्र' प्लॉट नं. ८, पंकज हौसिंग सोसायटी,
टी. व्ही. केंद्राच्या पूर्वेस, अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा रजा राखीव तहसीलदार,
अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (टंचाई शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, अपिलार्थी हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०८-०५-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, मात्र त्यांनी अपिलार्थीचा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला व माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने त्यांना

आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागत असल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०९-११-२००५ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयाव्दारे त्यांच्या मौजे मठपिंप्री तालुका नगर येथील शेतीवर झालेल्या नुकसानीसंदर्भात दिनांक ११-०४-१९९७ ते ०८-१०-१९९७ या कालावधीशी संबंधीत माहिती मागविली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता असे दिसून येते की, प्रथमतः त्यांच्याकडील दिनांक ०९-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००५ रोजी माहितीच्या अधिकारात जी माहिती मागविली होती ती, त्यांना दिनांक १६-०३-२००५ रोजीच्या पत्रान्वये दिली असल्याचे कळविले. अपिलार्थीने महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ प्रमाणे केलेल्या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिले आहे ते उत्तर जन माहिती अधिका-याने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दिलेल्या अर्जास दिले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर असून, महाराष्ट्र माहिती अधिकार अधिनियम २००२ हा निरसीत झाल्याची कोठलीही दखल त्यांनी या अर्जासंदर्भात उत्तर देतांना घेतली असल्याचे आयोगास आढळून येत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांची मौजे मठ पिंप्री तालुका नगर येथे काही जमीन असून, दिनांक २२-१०-१९९६ रोजी मठ पिंप्री के. टी. वेअर भरावा फुटल्याने त्यांच्या जमिनीचे नुकसान झाले. नुकसानीचा अंदाज घेण्यासाठी तत्कालीन तहसीलदार यांनी मंडळ अधिकारी यांना पंचनामा करण्याचे सूचित केले होते व त्याप्रमाणे मंडळ अधिकारी यांनी त्यांच्या जमिनीच्या झालेल्या नुकसानीचा त्यावेळी पंचनामा देखील केला होता. त्यानंतर मंडळ अधिकारी यांनी सदरचा अहवाल तहसीलदार, अहमदनगर यांच्याकडे सादर केला. पंचनामा करतेवेळी मंडळ अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या जमिनीचे झालेले नुकसान, जलसंपदा विभागाचे अधिकारी त्याच जमिनीचे सपाटीकरण विनामूल्य करुन देण्यास तयार आहेत व तसे करण्यास अपिलार्थीची मान्यता आहे काय असे विचारले होते व त्याबाबत मंडळ अधिकारी यांना त्यांनी होकार दिला होता. जलसंपदा विभागाचे श्री. गाडेकर नावाचे उप अभियंता यांनी अपिलार्थीच्या जमिनीचे सपाटीकरण विनामूल्य करुन देण्याचे मान्य केले होते. तदनंतर मंडळ अधिकारी यांच्याकडून तहसीलदार व तहसीलदार यांच्याकडून जिल्हाधिकारी यांच्याकडे या नुकसानीचा अहवाल पाठविण्यात आला होता व तदनंतर जिल्हाधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग यांना दिनांक

०८-१०-१९९७ रोजी संपूर्ण कागदपत्रे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविली, तथापि आजपर्यंत त्यांच्या जमिनीचे सपाटीकरण कोणत्याही शासकीय अधिका-याने केले नाही किंवा अपिलार्थी यांना कोणतीही नुकसानभरपाई प्राप्त झाली नाही. त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे त्यांना न्यायालयाच्या कामकाजासाठी आजही आवश्यक आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत, ती कागदपत्रे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध आहेत.

जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात मागणी केलेली जी माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित आहे, ती माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून निश्चितपणे टाळाटाळ केल्याचे या प्रकरणी सिध्द होत आहे. मूळात जन माहिती अधिकारी यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या मूळ अर्जास दिलेला प्रतिसाद पूर्णतः अवैध आहे, कारण अपिलार्थीस त्यांनी, ही माहिती देण्यासंदर्भातील निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे द्यावयास हवा होता. जन अपिलीय अधिकारी यांनी देखिल अपिलार्थीस आवश्यक ती कागदपत्रे कशी उपलब्ध करुन देता येईल याचा विचार न करता अपिलार्थीच्या प्रथम अपिल अर्जामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील बंद केले. अपिलार्थीस या प्रकरणी झालेले नुकसान व त्यांना या प्रकरणी आवश्यक असलेली माहिती सदर घटना (शेतीचे नुकसान ) घडून १२ वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी व्यपगत होऊनही प्राप्त होऊ शकत नाही, ही बाब खरोखरच दुर्दैवी आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा त्यांनी सर्व संबंधीत शासकीय कार्यालयात शोध घेऊन ही माहिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अन्यथा ही माहिती ज्या कर्मचा-याकडे जतन करुन ठेवली जाते, त्या कर्मचा-यावर प्रचलीत सेवानियामप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाई करावी व माहितीच्या उपलब्धतेबाबत अपिलार्थीस कळवावे. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे मयत झाले असल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश देता येत नाहीत. या प्रकरणाशी संबंधीत कागदपत्रे तहसीलदार, अहमदनगर यांना उपलब्ध करुन देण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर व कार्यकारी अभियंता, लघुपाटंधारे विभाग, अहमदनगर यांनी पूर्णतः सहकार्य करावे (अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ) असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विजयकुमार बाबुराव बोरकर, 'सौभद्र' प्लॉट नं. ८, पंकज हौसिंग सोसायटी, टी. व्ही. केंद्राच्या पूर्वेस, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (टंचाई शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६०

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. गौतम विजय बोरा, अपिलार्थी
२५३८, एम. जी. रोड,
अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
विभागीय माहिती कार्यालय, महाराष्ट्र शासन, लक्ष्मी
निवास, कान्हेरीवाडी, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
विभागीय माहिती कार्यालय, महाराष्ट्र शासन, लक्ष्मी
निवास, कान्हेरवाडी, नाशिक

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लक्ष्मी निवास, कान्हेरीवाडी, नाशिक

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, नाशिक

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. शिवाजी मानकर हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयास दिनांक २८-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना अपिलीय अधिकारी, विभागीय माहिती कार्यालय यांनी दिलेली माहिती अपूर्ण, असमाधानकारक व खोटी आहे. त्यांनी विचारलेल्या प्रश्नासंदर्भात संबंधीत अधिका-याने चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे संबंधीत अधिका-यावर कायदेशीर व कडक कारवाई करण्यासाठी त्यांनी हे अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, आपल्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण नऊ मुद्दयावर काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. शिवाजी मानकर यांना श्री. बोरा यांनी माहिती मागविल्याने नेमका काय त्रास झाला आहे याचा सविस्तर लेखी खुलासा द्यावा, माहिती मागण्यामागे राग, आकस या उद्देशाने माहिती मागविली आहे असे ठरविण्याकरिता माहितीच्या अधिकारामध्ये कोणती कायदेशीर तरतूद आहे काय, श्री. शिवाजी मानकर यांना नेमका कशा प्रकारे मनःस्ताप झाला, श्री. शिवाजी मानकर यांनी केलेल्या तक्रारीचे स्त्रोत, श्री. शिवाजी मानकर यांनी श्री. बोरा यांच्या दूरध्वनी संभाषणाचे ध्वनीमुद्रण करुन आरोप केले आहेत काय, श्री. बोरा यांच्याविरुध्द कोणकोणत्या कर्मचा-यांनी तक्रार केली आहे त्यांची नांवे व त्यांनी केलेल्या तक्रारीची प्रत, श्री. बोरा यांनी श्री. शिवाजी मानकर यांच्यासंदर्भात आयकर आयुक्त, तहसीलदार, नाशिक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक यांच्याकडून माहिती मागविली आहे ही बाब श्री. मानकर यांना कोणत्या स्त्रोतातून अधिकृतरित्या कळाली आहे. श्री. शिवाजी मानकर यांनी यासंदर्भात कायदेशीर कारवाई करण्यासाठी सर्व पुराव्यानिशी योग्य त्या शासकीय खात्याकडे लेखी तक्रार केली होती का ? व श्री. बोरा यांच्या सदर कृतीमुळे श्री. शिवाजी मानकर यांच्यावर दहशत निर्माण करुन ब्लॅकमेलींग केली होती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राव्दारे त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस माहिती देऊ नये असे कळविल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम प्रतिसादाव्दारे निरंक माहिती कळविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-१२-२००७ रोजीच्या आपल्या पत्राव्दारे निर्णय दिला असून, जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात घेतलेल्या भूमिकेशी सहमती दर्शवून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने

व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे आढळून आले आहे की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या नऊ मुद्दयांव्दारे वेगवेगळी माहिती मागविली आहे, त्यातील मुद्दा क्रमांक २ व ६ वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देय होत नाही. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) अन्वये "माहिती" या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

<u>कलम २ (च)</u>

"माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.

वरील व्याख्येचे अवलोकन करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही वरील "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नसल्याचे दिसून येते. त्रयस्थ पक्ष श्री. शिवाजी मानकर यांनी अपिलार्थीच्या विरुध्द प्रसिध्दी महासंचालक यांच्याकडे अर्ज केल्याने व अपिलार्थी हे एका वृत्तपत्राचे संपादक असल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्याची गरज निर्माण झाली. अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जाव्दारे श्री. शिवाजी मानकर यांना नेमका काय मनःस्ताप झाला व तो कशा प्रकारे झाला, श्री. शिवाजी मानकर यांना श्री. बोरा यांनी त्यांच्याविषयी मागणी केलेल्या माहितीचे स्त्रोत कोणते, श्री. शिवाजी मानकर यांनी श्री. बोरा यांचे दूरध्वनी संभाषण ध्वनीमुद्रण करुन ठेवले आहे काय, इत्यादी प्रकारची माहिती मागविली आहे. "माहिती" या शब्दाच्या वरील व्याख्येचे अवलोकन करता, अशा प्रकारच्या प्रश्नांना कोणतेही लिखित स्वरुपात उत्तर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असण्याची शक्यता नाही, मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ मध्ये सदर माहिती मागण्यामागे राग, आकस या उद्देशाने माहिती मागितली आहे असे ठरविण्यासाठी माहितीच्या अधिकारामध्ये कोणती तरतूद आहे तिची माहिती व श्री. बोरा यांच्या विरुध्द श्री. शिवाजी मानकर यांच्याकडे केलेल्या तक्रारीची प्रत, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरते. सदर माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ८ (१) (छ) मधील तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले आहे. अधिनियमातील कलम

१० मधील तरतूद लक्षात घेता, अपिलार्थीस त्यांच्याविरुध्द नेमक्या संबंधीत कर्मचा-याने कोणती तक्रार केली आहे हे कळण्याकरिता, जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध कागदपत्रांच्या तक्रारीमध्ये तक्रादाराचे नाव वगळता उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यास हरकत नसावी. त्रयस्थ पक्षातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिल्याने त्यांच्या जीवितास धोका उत्पन्न होईल असे वाटल्याने अपिलार्थीस माहिती देऊ नये असे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले, तथापि अपिलार्थीच्या विरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीची प्रत तक्रारदाराचे नाव वगळता अपिलार्थीस देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या विरुध्द त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये तक्रारदाराचे नांव वगळता, फक्त तक्रारीच्या भागाची छायाप्रत व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करण्याविषयी विनंती केली आहे, तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिलेला आहे, यामध्ये अपिलार्थीची कोणतीही दिशाभूल झाल्याचे आयोगास निःसंशयपणे आढळून येत नसल्याने, आयोग अपिलार्थीची ही विनंती मान्य करत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ व ६ शी संबंधीत माहिती वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गौतम विजय बोरा, २५३८, एम. जी. रोड, अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, लक्ष्मी निवास, कान्हेरीवाडी, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक (माहिती), विभागीय माहिती कार्यालय, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६१

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. सुधीर महादेव आखाडे, अपिलार्थी
मु. पो. मिरजगाव, तालुका कर्जत,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक वनसंरक्षक रोहयो, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उप वनसंरक्षक, अहमदनगर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : सहाय्यक वनसंरक्षक रोहयो, अहमदनगर उप वनसंरक्षक कार्यालय, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १५-०९-२००६ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपुरी व अनावश्यक माहिती दिली आहे, तसेच त्यांनी दिलेली माहिती व जिल्हाधिका-यांनी मंजूर केलेल्या पतमर्यादेत तफावत दिसत असल्याने या प्रकरणाची चौकशी व्हावी. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००५ ते ३१-१०-२००५ या कालावधीशी संबंधीत कर्जत, मिरजगाव, श्रीगोंदा (प्रादेशिक) श्रीगोंदा (भरी वनीकरण कार्यक्रम) येथील कार्यालयामार्फत झालेल्या कामांच्या कॅशबुकच्या छायांकीत प्रतीची मागणी केली आहे. अपिलार्थीने सदर माहिती स्पीड पोस्टाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये १४०६ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मनीऑर्डरव्दारे दिनांक २९-०५-२००६ रोजी केला व तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०७-०६-२००६ रोजी पुरविली. अपिलार्थीचे प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०८-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे निर्णय देऊन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण, अनावश्यक माहिती दिली असून, त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. यासंदर्भात त्यांनी आयोगास असे स्पष्ट केले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०१-१२-२००४ ते ३१-१२-२००४ या कालावधीशी संबंधीत माहिती दिली आहे, जी त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली नव्हती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिलेल्या माहितीमध्ये दिनांक ०१-०९-२००५ ते ३१-१०-२००५ या कालावधीशी संबंधित माहितीचा समावेश नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क भरुन घेऊन त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती दिनांक ०७-०६-२००६ रोजी दिली आहे. दिनांक ०१-०९-२००५ ते ३१-१०-२००५ या कालावधीमध्ये त्यांच्या कार्यालया-मध्ये कोणताही आर्थिक व्यवहार झाला नव्हता का, अशी आयोगाने विचारणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यावर स्पष्ट स्वरुपात अभिप्राय व्यक्त करु शकले नाहीत. अपिलार्थीस या कालावधीतील माहिती त्यांनी निश्‍चितपणे दिली आहे का असे त्यांना

विचारले असता त्यांनी ती माहिती अपिलार्थीस दिल्याचे स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांनी केलेल्या या युक्तिवादामध्ये विसंगती आढळून आल्याने अपिलार्थीस आयोगातर्फे असे सूचित करण्यात येते की, त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याशी अभिलेखे तपासणीची दिनांक व वेळ निश्चित करुन, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहे त्या अभिलेख्याची त्यांनी तपासणी करावी. अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये त्यांना दिनांक ०१-१२-२००४ ते ३१-१२-२००४ या कालावधीशी संबंधीत माहितीची त्यांना आवश्यकता नव्हती असे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीचा हा मुद्दा बरोबर असल्याचे दिसून येते. सबब, जन माहिती अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०१-१२-२००४ ते ३१-१२-२००४ या कालावधीशी संबंधीत माहिती दिली असल्यास ही माहिती अपिलार्थीकडून परत प्राप्त करुन घ्यावी व या पृष्ठांपोटी त्यांनी अपिलार्थीस आकारलेले शुल्क, अपिलार्थीस याच कालावधीमध्ये परत करावे.

अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी, हीच माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून घेतली असून, या माहितीमध्ये व जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने दिलेल्या माहितीमध्ये तफावत असल्याने या कामाची चौकशी व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे. यासंदर्भात अपिलार्थीस अवगत करुन देण्यात येते की, रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भातील तक्रारीबाबत निर्णय घेण्याचे अधिकार शासनाने विभागीय महसूल आयुक्त यांना दिले असल्याने अपिलार्थीने आवश्यक असल्यास, त्यांच्याकडे स्वतंत्र अर्ज करावा व आपल्या गा-हाण्याची तड लावून घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत कोणत्याही कार्यालयीन दिवशी जन माहिती अधिकारी यांच्याशी अभिलेखे तपासणीची दिनांक व वेळ निश्चित करुन, त्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती

ज्या अभिलेख्यामध्ये उपलब्ध आहे, त्या अभिलेख्याची त्यांनी तपासणी करावी. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस तपासणीसाठी अभिलेखे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या अनावश्यक माहितीपोटीचे अपिलार्थीस आकारलेले शुल्क त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधीर महादेव आखाडे, मु. पो. मिरजगाव, तालुका कर्जत, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक रोहयो, अहमदनगर उप वनसंरक्षक कार्यालय, अहमदनगर, वनभवन, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप वनसंरक्षक, अहमदनगर वन विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६२

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. अरुण सोपान वाबळे, अपिलार्थी
मु. पो. गुहा, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक असलेली माहिती अद्यापही प्राप्त झाली नाही.

उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलासंबंधातील प्रथम अर्ज व अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे सांगितले. अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी

यांच्याकडे अर्ज प्राप्त झाला असल्यासंदर्भात आयोगाकडे त्यांनी खाजगी कुरिअरने त्यांचा अर्ज पाठविल्यासंबंधात कुरिअरची पावती दाखविली, तथापि अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, राज्य माहिती आयोगाकडील व्दितीय अपील सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार करुन दिली आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ---०२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य नसल्यास हा निर्णय प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ---०२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर झ ालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारित करावेत.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण सोपान वाबळे, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६३

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. अरुण सोपान वाबळे, अपिलार्थी
मु. पो. गुहा, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर

त्रयस्थ पक्ष : व्यवस्थापक, अशोक बिडकॉन

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन त्यांचे शंका निरसन न करता त्यांचे अपील फेटाळले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे अहमदनगर ते

औरंगाबाद रस्त्यावरील काही भागासंदर्भात एकूण ७ मुद्दयांव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी ०१-०१-२००६ ते ०१-१०-२००७ असा आहे. अपिलार्थीच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७१२ इतके त्यांच्या कार्यालयास भरण्याचे सूचित केले. तथापि हे शुल्क अवाजवी असल्याचे अपिलार्थीस वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही, मात्र त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१०-२००७ रोजीच्या पत्रान्वये या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयास सहमती दर्शवून अपिलार्थीचे अपील निकाली काढले व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कोषागारात जमा करण्याचे परत सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील एकूण सात मुद्दयांपैकी मुद्दा क्रमांक ५ संदर्भात त्यांनी मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या मुद्दा क्रमांक '५' व्दारे रस्ता बांधणीतील अलिकडील प्रस्तावित तरतुदी काय आहेत, याची माहिती द्यावी असे म्हटले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीचे स्वरुप हे अत्यंत मोघम असल्याने ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मुद्दा क्रमांक ६ व्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे शासन व अशोक बील्डकॉन कंपनी यांच्यामध्ये करारपत्राव्यतिरिक्त इतर अटी व शर्ती असल्या तर त्यावरील प्रती मागितलेल्या होत्या. मूळात अपिलार्थीची ही मागणी चुकीच्या कल्पनेवर आधारित असल्यामुळे व शासन व कंत्राटदार यांच्यातील करार हा लिखित स्वरुपातील असल्याने व या कराराव्यतिरिक्त इतर अटी मूळात अस्तित्वात नसल्याने अपिलार्थीस या मुद्दयावरील माहिती देखिल देय ठरत नाही, मात्र अपिलार्थीने त्यांच्या उर्वरित मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती, दिलेला कार्यारंभ आदेश, करारपत्राच्या प्रती, ही माहिती अपिलार्थीस देय आहे असे आयोगास वाटते. आज रोजी सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती अपिलार्थीस, अपिलार्थीने शुल्क भरल्यानंतर ८ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीने

मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची व्यक्तिशः मागणी करुन नंतर माहितीपोटीचे शुल्क भरण्याची वेळ आल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी शुल्क अवास्तव असल्याचे आकारल्याचे नमूद करुन प्रथम अपील करुन शुल्क भरण्याचे टाळले आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत व बरोबर प्रतिसाद दिला आहे त्यामुळे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात भरणे भाग होते, तथापि त्यांनी हे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले नाही. अपिलार्थीची शुल्क न भरण्याची कृती चुकीची असून या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने त्यांना हव्या असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरण्याची तयारी कोणत्याही टप्प्यावर न दाखविल्यामुळे अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी तेच जबाबदार असल्याचे सिध्द होऊन अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीस जर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व त्यांना देय असलेली माहिती हवी असेल तर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रतिपृष्ठ रुपये दोन याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणा-या माहितीपोटीच्या लागणा-या शुल्काचा भरणा, जन माहिती अधिकारी सांगतील त्याप्रमाणे करावा व त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण सोपान वाबळे, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६४

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अरुण सोपान वाबळे,<br>मु. पो. गुहा, तालुका राहुरी,<br>जिल्हा अहमदनगर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, अहमदनगर | प्रतिवादी |

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर |
| | जन अपिलीय अधिकारी | : शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्याकडून संगणक खरेदी प्रकरणी केलेल्या चौकशी आदेशाची व अहवालाची झेरॉक्स प्रत, चौकशी अहवाल मिळाल्यानंतर झ ाालेल्या कारवाईचा अहवाल, चौकशी अपूर्ण असेल तर का अपूर्ण राहिली, चौकशी लवकरात लवकर होऊन

कारवाई होण्यासाठी तुम्ही कोणते उपाय योजणार ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्याच्या दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील ०१ जानेवारी २००५ ते ०१ फेब्रुवारी २००७ या कालावधीशी संबंधीत एकूण पाच मुद्दयांव्दारे माहिती अपेक्षिली होती. अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतली नाही, मात्र यासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या प्रश्नांची उत्तरे दिली. तथापि या माहितीने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीस त्यांनी चौकशी अहवालाची संपूर्ण प्रत दिली असून अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या संगणक खरेदीसंदर्भात तक्रार प्राप्त झाल्याने जिल्हा परिषदेतर्फे या संपूर्ण व्यवहाराची विशेष समिती नेमून चौकशी करण्यात आली, तथापि या चौकशीत कोणीही दोषी आढळून आले नसल्याने या चौकशी अहवालासंदर्भात पुढील कारवाई करण्याचे कोणतेही प्रयोजन उरले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादात अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे उत्तर समाविष्ट आहे. या प्रकरणी चौकशी अहवाल जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. चौकशी अहवालात कोणीही दोषी न आढळल्याने अहमदनगर जिल्हा परिषदेतर्फे कोणतेही कारवाईचे आदेश देण्यात आलेले नाहीत. चौकशी रेंगाळलेली नाही आणि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिली आहे. या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक २१-०३-२००७ रोजीच्या प्रथम प्रतिसादाचे अवलोकन करता, यामध्ये चौकशी अहवालानंतर झालेल्या कारवाईची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे दिसून येते त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती अपिलार्थीस मिळू शकली नाही, ही वस्तुस्थिती आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील "चौकशी अपूर्ण असेल तर चौकशी का रेंगाळली, तसेच चौकशी लवकरात

लवकर होऊन कारवाई होणेसाठी तुम्ही कोणते उपाय योजणार" ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही कारण ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्दयाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने भविष्यकाळातील माहिती विचारली आहे जी वर नमूद केल्याप्रमाणे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत होत नसल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही, त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ४ ची संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. यामध्ये अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी असद्हेतूने टाळल्याचे अथवा ही माहिती हेतूतः अपिलार्थीपासून दडविली, अशातली कोणतीही बाब निःसंशयपणे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबतचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ३१-०१-२००७ रोजीच्या अर्जास अधिनियमातील विहित मुदतीमध्ये प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांना असे सूचित करण्यात येते की, येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांवर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे सकारात्मक कारवाई करावी. आज रोजी ही उर्वरित माहिती अपिलार्थीस ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस उर्वरित माहिती, हे आदेश निर्गमित होताच ३ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या व्दितीय अपिलातील मुद्दा क्रमांक १ व ३ शी संबंधीत माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

अहमदनगर — ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण सोपान वाबळे, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६५

निर्णय दिनांक ०९-०१-२००९

१ श्री. अरुण सोपान वाबळे, अपिलार्थी
मु. पो. गुहा, तालुका राहुरी,
जिल्हा अहमदनगर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, अहमदनगर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०९-०१-२००९ रोजी अहमदनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १८-०४-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने कारण म्हणून त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेल्या पेपरच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांनी नाकारल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत जिल्ह्यातील गट समन्वयकांच्या नेमणुकीसंदर्भात दिनांक ०१-०१-२००२ ते ०१-०१-

२००७ या कालावधीशी संबंधीत एकूण पाच मुद्दयांव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०१-२००७ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३३ इतके चलनाव्दारे भरणा करुन चलनाची प्रत त्यांच्या कार्यालयास सादर करण्याचे सूचित केले. (४ पृष्ठांचे ८ रुपये व २५ रुपये टपालखर्च). अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर शुल्क त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविले होते, तथापि जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने ते स्वीकारले नाही व परिणामी अपिलार्थीस माहिती मिळाली नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०२-२००७ रोजी प्रथम अपील केले. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्रमांक ३ शी संबंधीत - पेपरच्या झेरॉक्स प्रती - वगळता उर्वरित माहिती दिली. अपिलार्थीस पेपरच्या झेरॉक्स प्रती नाकारतांना जन माहिती अधिकारी यांनी शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या दिनांक २३-०६-२००६ च्या निर्णयातील तरतुदीस अनुसरुन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारल्याचे दिसून येते. ग्रामविकास विभागाच्या दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता त्यामध्ये शासनाच्या सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना जिल्हा परिषदेच्या वर्ग-३ व वर्ग-४ च्या पदांकरिता घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती पाच दिवसाच्या आत संबंधीत उमेदवारांनी मागणी केल्यास २०० रुपये इतके शुल्क आकारुन त्यांना देण्यात याव्यात, असे म्हटले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने ज्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकासंदर्भात माहिती मागितली आहे ती परीक्षा २००५ साली झाली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती नाकारली आहे व अपिलार्थीने ही माहिती २००७ साली मागितली आहे. अपिलार्थीने या विषयासंदर्भात सर्व ठिकाणी पेपरच्या प्रती अशा माहितीची मागणी केली आहे, "पेपर" याचे अर्थ प्रश्नपत्रिका व "उत्तरपत्रिका" असेही असू शकतात. तथापि अपिलार्थीने सुनावणीमध्ये आयोगासमोर त्यांना उत्तरपत्रिकांच्या प्रती अभिप्रेत असल्याचे स्पष्ट केले आहे. उत्तरपत्रिकांच्या छायांकीत प्रती देण्याच्यासंदर्भात वेळोवेळी राज्य माहिती आयोगाने, मा. उच्च न्यायालयाने अपिलार्थीस उत्तरपत्रिका देण्याचे नाकारले आहे. आयोगाकडे दाखल झ ालेली व्दितीय अपिले क्रमांक १०९९/०७ व १५८२/०७, निर्णय अनुक्रमे दिनांक २५-०४-२००८ व २१-१०-२००८ मध्ये अपिलार्थीची उत्तरपत्रिकांच्या प्रती देण्याची विनंती आयोगाने मान्य केलेली नाही. व केंद्रीय माहिती आयोगाकडील निरजकुमार सिंघल विरुध्द वरिष्ठ विभागीय महाव्यवस्थापक, उत्तर-पश्चिम रेल्वे, जयपूर यासंदर्भात (अपील क्रमांक ११/५३/२००६/सीआयसी, दिनांक ०२-०५-२००६) दिलेल्या निर्णयाचे अवलोकन

करता अपिलार्थीस उत्तरपत्रिकांची प्रत नाकारण्याचा जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय आयोगास योग्य वाटतो. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पूर्णतः विनामूल्य माहिती दिली असल्याने व एका मुद्दयावरील माहिती त्यांना वरील कारणास्तव देय नसल्यामुळे फेटाळून लावण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

अहमदनगर ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०९-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण सोपान वाबळे, मु. पो. गुहा, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर.

२ जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१७३
निर्णय दिनांक १२-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अमित कृष्णकुमार कदम, तुळजापूर<br>जि.उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर<br>जि.उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक, तुळजापूर,<br>जि.उस्मानाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत, तर अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२३.११.२००७ रोजी केलेले दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाची अद्यापपावेतो अंमलबजावणी झालेली नाही, मागितलेली माहिती मुद्देनिहाय नाही, मुद्दा क्र.१ व २ या मुद्यांची अंमलबजावणी न केल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई करावी व योग्य ती माहिती देण्याचे आदेश द्यावेत तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी न घेता त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय दिला आहे, असे नमूद केले

आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ७.९.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २६.८.२००७ व १.९.२००७ रोजी श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळुंके यांनी पोलीस निरिक्षक, तुळजापूर यांच्याकडे केलेल्या तक्रारीवर काय कार्यवाही केली, केली नसल्यास कोणत्या नियमानुसार सवलत देण्यात आली, तशी सवलत नसल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कोणती कारवाई होऊ शकते - ही माहिती मागितली होती.अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २८.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे कळविले व तद्नंतर अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. १.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती पुरविली. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ६.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.१०.२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयामध्ये त्यांनी, अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या तक्रार अर्जांची चौकशी लवकरात लवकर पूर्ण करण्याची उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर यांना सूचित करण्यात आले असल्याचे कळविले व चौकशी पूर्ण होताच जो निष्कर्ष असेल तो अपिलार्थीस कळविण्यासंदर्भात देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांना या निर्णयामध्ये सूचित केले आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अंतिमतः त्यांच्याकडील दि. २२.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीच्या तक्रार अर्जाची अंतीम स्थिती अपिलार्थीस कळविली. तथापि त्यांचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यांनी आपला युक्तिवाद लेखी पत्राद्वारे पाठविला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी आजपावेतो दिली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्याकडे अपील दाखल केल्यानंतर सुनावणी न घेताच निर्णय दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयानंतर देखील आज रोजीपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी या मुद्यांवर त्यांना माहिती दिली नाही.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद दिला आहे. मात्र उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अपिलार्थीस दि. २२.११.२००७ रोजीचे पत्र केव्हा उपलब्ध करुन दिले या संदर्भातील खुलासा आयोगासमोर करु शकले नाहीत. त्यांनी आयोगासमोर असे नमूद केले की, अपिलार्थी हे दि. २२.११.२००७ रोजीच्या पत्राची प्रत त्यांच्या कार्यालयात येऊन समक्ष घेऊन केले. तथापि या संदर्भात कोणताही पुरावा ते आयोगास सादर करु शकले नाहीत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.२ व ३ चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मुद्दा क्र.२ द्वारे - 'कार्यवाही केली नसल्यास त्यांना कोणत्या कलमानुसार सवलत देण्यात आली' व मुद्दा क्र. ३ द्वारे- 'तशी सवलत नसल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कोणती कारवाई होऊ शकते', अशी माहिती मागितली आहे. मुद्दा क्र. २ द्वारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची व यामध्ये, "त्यांना" म्हणजे नक्की कोणाला (पोलीस निरीक्षक की तक्रारीतील संदर्भिय व्यक्ति अथवा संस्था किंवा इतर कोणीही) याचा त्यांनी मूळ अर्जात स्पष्ट उल्लेख केला नाही. तसेच या शब्दाद्वारे त्यांना काय सूचवावयाचे आहे, हे स्पष्ट करण्यासाठी सुनावणीमध्ये अपिलार्थी हे उपस्थित नाहीत. यावरुन अपिलार्थीने मुद्दा क्र.२ द्वारे मागणी केलेली माहिती मोघम असल्याचे स्पष्ट झाल्यामुळे ही माहिती, अपिलार्थीस देय ठरत नाही. तथापि मुद्दा क्र. ३ मध्ये - 'संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कोणती कारवाई होऊ शकते' या

मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती देणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अंतिमतः दि. २२.११.२००७ रोजी देखील दिली नसल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या मुद्यामधील संदर्भित तक्रार अर्जावर चौकशीची कार्यवाही चालू असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस योग्य ती माहिती पुरविली आहे. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय योग्य वाटतो तथापि त्यांनी अपिलावर निर्णय देताना अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी दिली नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील प्रथम अपिलावर निर्णय घेताना नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार त्यांनी अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देणे या प्रकरणी गरजेचे होते. तथापि अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही जन अपिलीय अधिकारी यांनी केली नाही. इतःपर जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल होणाऱ्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेताना सर्व संबंधितांना बोलावून, त्यांचे म्हणणे मांडण्याची योग्य ती संधी देण्याची दक्षता घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली मुद्दा क्र. ३ शी माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने माहिती देण्याचे टाळले असल्याचे अथवा माहिती दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द न झाल्याने त्यांच्यावर कारवाईचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पाश्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमित कृष्णकुमार कदम, द्वारा श्री. संजय म.सोनवणे, राजे संभाजीनगर, तुळजापूर जि.उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२२२७/०७ व २२२९/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२२७ व २२२९
निर्णय दिनांक १२-०१-२००९

१ श्री. मुदखेडकर महमंद एकबाल महंमद युसुफ, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
सना ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
सचिव, सना एज्युकेशन सोसायटी,नांदेड
प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारीः १) शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२०.०६.२००७ रोजी दाखल केलेली दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे रितशीर रजिस्टर्ड पोस्टाने दि. २०.३.२००७ रोजी अर्ज पाठवून देखील मुदत संपल्यानंतर देखील माहिती अधिकारी यांनी

माहिती पुरविली नसल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी,नांदेड यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दि. १.५.२००७ रोजी दाखल केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती देण्यास व त्यांच्या प्रथम अपिलांवर निर्णय घेण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्याने, त्यांनी सदर अपिले आयोगाकडे केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने एकाच जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. २०.३.२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाद्वारे त्यांच्या शाळेविषयी वेगवेगळी माहिती विचारली होती. अपिलार्थीच्या या दोनही अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २४.३.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२/- या प्रकरणी त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्यांनी मागणी केलेली माहिती शाळेच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध असल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, नांदेड यांच्याकडे दि. ३०.४.२००७ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. या अपिलाच्या सुनावणी संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. १५.५.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि अपिलार्थी या सुनावणीस गैरहजर असल्याने ही सुनावणी होऊ शकली नाही, तर अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचे दि. ११.५.२००७ रोजीचे त्यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहण्याचे पत्र प्राप्त झाले नाही. आता शिक्षण संचालनालयाने त्यांच्याकडील पत्र क्र. संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्रं.(८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शालेय शिक्षण संस्थासंबंधाने संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमानुसार दाखल होणाऱ्या प्रथम अपीलावरील निर्णय घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहे. या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर आजतागायत सुनावणी झाली नाही, तथापि अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व तिची व्याप्ती पाहता, या टप्प्यावर होणे आयोगास गरजेचे

वाटते, सबब शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, या दोनही प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ३०.४.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जांवर, सदर आदेश निर्गमित होताच  झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची वरील दोनही द्वितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२२७/०७ व २२२९/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.)जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या वरील दोनही प्रकरणांशी संबंधित दि.३०.४.२००७ रोजीच्या प्रथम अपिलांवर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक :    १२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महमंद एकबाल महंमद युसुफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना ऊर्दू प्राथमिक शाळा, सना एज्युकेशन सोसायटी,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (सोबत अपिलार्थीच्या दि. ३०.४.२००७ रोजीच्या दोनही प्रथम अपील अर्जांच्या प्रती)

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२२२८/०७,२२३०/०७,२२३१/०७ व २२३३/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२२८,२२३०,२२३१ व २२३३
निर्णय दिनांक १२-०१-२००९

१ श्री. मुदखेडकर महमंद एकबाल महंमद युसुफ,रा.नांदेड :अपिलार्थी

**विरुध्द**

१ **अपील क्र.२२२८/२००७**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, बैतुल उलुम ऊर्दू प्रा.शाळा,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, बैतुल उलुम एज्युकेशन<br>सोसायटी,नांदेड | :प्रतिवादी |

२ **अपील क्र.२२३०/२००७**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, लालबहादूर शास्त्री<br>विद्यालय,कासराळी ता.बिलोली जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, गणेश शिक्षण संस्था<br>कासराळी, ता.बिलोली जि.नांदेड |

३ **अपील क्र.२२३१/२००७**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, मदिनातुल ऊलूम ऊर्दू<br>प्रा.शाळा,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, मॅनेजिंग कमेटी मदरसे<br>मदिनातुल उलुम शिक्षण<br>संस्था,नांदेड |

४ **अपील क्र.२२३३/२००७**

| | |
|---|---|
| मुख्याध्यापक,कुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा,<br>नांदेड जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सचिव, कुरेशिया एज्युकेशन<br>सोसायटी, नांदेड |

प्रत्यक्ष जन अपिलीय अधिकारी: १. अपील क्र.२२२८/०७,२२३१/०७ व २२३३/०७
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड
२. अपील क्र. २२३०/०७
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड

**निर्णय**

वरील चार प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत, तर अपील क्र.२२३०/०७ या

प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत, तर उर्वरित अपील क्र. २२२८/०७,२२३१/०७ व २२३३/०७ या प्रकरणाशी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त चार प्रकरणाबाबत अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.१२.०६.२००७ रोजी व दि. २४.७.२००७ रोजी नोंदविलेली प्रत्येकी दोन अशी एकूण चार द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, अपील क्र. २२२८/०७,२२३१/०७ व २२३३/०७ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील स्वीकारले नाही तर अपील क्र. २२३०/०७ च्या संदर्भात त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव श्री. गणेश शिक्षण संस्था,कासराळी ता.बिलोली जि.नांदेड यांच्याकडे त्यांचे प्रथम अपील रजिस्टर पोस्टाने पाठवून देखील त्यांच्याकडून आजपावेतो निर्णय पारित झाला नाही व जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी अपील क्र.२२२८/०७,२२३१/०७ व २२३३/०७ च्या संदर्भात प्रथमतः दि. २०.३.२००७ रोजी व अपील क्र.२२३०/०७ च्या संदर्भात दि. २.४.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित जून २००५ ते मार्च २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती साधारण टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शाळेतील अनुदानित सर्व वर्ग तुकडयांची संख्या, तांदुळ शालेय पोषण आहाराबाबतचा तपशील शिजवणे,वितरण,ठेकेदाराचे नाव, याकरिता निविदा काढली होती काय, काढली असल्यास वृत्तपत्रातील जाहिरातींची सत्यप्रत, काढली नसल्यास, त्याची कारणे, शाळेमध्ये घेण्यात येत असलेल्या घटक चाचण्या,प्रथम सत्र परीक्षा,द्वितीय सत्र परीक्षा याबाबत जमा केलेल्या फीसचा तपशील, ऑडीट रिपोर्ट व खर्चाबाबतचा तपशील,सर्व वर्गांची एकूण तुकडीनिहाय संख्या,

विद्यार्थ्यांकडून जमा केलेले शैक्षणिक शुल्क,प्रवेश फी या रकमेचा तपशील व खर्च विवरण- इ. मुद्यांचा समावेश होता.

आज रोजी सुनावणीमध्ये अपिलार्थीने आयोगास असे अवगत केले की, या चारही शिक्षण संस्थांतील तत्कालीन सचिव तथा जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नाही व परिणामी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून विनाकारण वंचित राहावे लागले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, या प्रकरणी, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर, या टप्प्यावर सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. शिक्षण संचालनालयाने त्यांच्याकडील पत्र क्र. संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्रं.(८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये शालेय शिक्षण संस्थांच्या संदर्भात संबंधित जिल्हयाचे शिक्षणाधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमानुसार दाखल होणाऱ्या प्रथम अपीलावरील निर्णय घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमले आहे. सबब संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) व शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त अपील क्र.२२२८/०७,२२३१/०७ व २२३३/०७ या तीन प्रकरणांमधील अपिलार्थीच्या दि.०७.५.२००७ रोजीच्या व अपील क्र.२२३०/०७ मधील दि. २५.५.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे, हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसांच्या आत द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची वरील चारही अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२२८/०७,२२३०/०७,२२३१/०७ व २२३३/०७ निकाली काढण्यात येत आहेत.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, नांदेड यांनी वरील प्रकरणातील अपिलार्थी यांच्या वरील प्रकरणांशी संबंधित दि.७.५.२००७ रोजीच्या तीन प्रथम अपिलांवर व शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थी यांच्या दि. २५.५.२००७ रोजीच्या एका प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ,मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, बैतुल उलुम ऊर्दू प्रा.शाळा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,लालबहादूर शास्त्री विद्यालय,कासराळी ता.बिलोली जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,मदिनातुल ऊलूम ऊर्दू प्रा.शाळा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कुरेशिया ऊर्दू प्राथमिक शाळा,इमाम मस्जिदजवळ,मनियार गल्ली नांदेड जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (सोबत अपिलार्थीच्या दि.७.५.२००७ रोजीच्या तीन प्रथम अपील अर्जांच्या प्रती )

७. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (सोबत अपिलार्थीच्या दि.२५.५.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत ).

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२३२
निर्णय दिनांक १२-०१-२००९

१ श्री. मुदखेडकर महमंद एकबाल महंमद युसुफ, रा.नांदेड : अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सय्यद फारुक पाशा,ऊर्दू प्राथमिक शाळा, नांदेड : प्रतिवादी

२ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कैनरसिंग शिक्षण संस्था,नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०७.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी त्यांच्या सहीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दि. १०.१.२००९ रोजीचं पत्र आयोगास सादर केले या पत्रामध्ये त्यांनी शेवटच्या परिच्छेदात असे नमूद केले आहे की त्यांना आज दि. १०.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य माहिती दिल्यामुळे व त्यावरुन त्यांचे समाधान झाल्या कारणाने द्वितीय अपील निकाली काढण्यास हरकत नाही.

खुद्द अपिलार्थीने, त्यांनी आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील निकाली काढण्याची विनंती असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील क्र. २२३२/०७, दि. २४.०७.२००७ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्र.२२३२/०७, दि.२४.०७.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १२-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ,मुख्य संपादक,सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर,बसस्टॅण्ड रोड रा.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सय्यद फारुख पाशा ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, कैनरसिंग कव्वाल शिक्षण संस्था, मार्फत सय्यद फारुख पाशा ऊर्दू प्राथमिक शाळा,नांदेड औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२११८

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. अरुण रामकृष्ण अवकाळे, अपिलार्थी
रा. जवखेडा ठेंग, पो. वरुड, तालुका जाफ्राबाद,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, जिल्हा
जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
(स्थानिक स्तर) विभाग, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०९-०१-२००९ रोजीचे पत्र सादर केले. या पत्रान्वये त्यांनी राज्य माहिती आयोगास असे कळविले आहे की, राज्य माहिती आयोगाकडे अपील करणारे अपिलार्थी श्री. अरुण रामकृष्ण अवकाळे यांनी मौजे हनुमंतखेडा पाझर तलावाबाबत जी माहिती मागितली होती ती त्यांना आता देण्याची आवश्यकता नाही व त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केलेला अपील अर्ज मागे घेतला आहे. या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीने त्यांना

उद्देशून लिहिलेल्या दिनांक १७-०२-२००८ रोजीच्या पत्राची सत्य झेरॉक्स प्रत जोडली असून अपिलार्थीने कार्यकारी अभियंता यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे हनुमंतखेडा पाझर तलावाची माहिती मागितली होती. त्यांचा काही लोकांनी कामाबाबत चुकीचा समज करुन दिला होता तो समज आता दूर झाला असून त्यांना आता कोणत्याही माहितीची आवश्यकता नाही व ते आपला मूळ अर्ज या पत्राव्दारे मागे घेत आहे. खुद्द अपिलार्थीने या अपिलासंदर्भातील आपला मूळ अर्ज मागे घेतला असल्याने व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या या निवेदनावर कोणतेही भाष्य करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत यावरुन ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस फारसे स्वारस्य नसल्याचे अनुमान काढून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आयोग खारीज करुन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २११८/२००७, दिनांक ०३-१२-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १३-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुण रामकृष्ण अवकाळे, रा. जवखेडा ठेंग, पो. वरुड, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, भोकरदन, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९७

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. आर. आर. बागवाण, अपिलार्थी
संपादक, सा. जालना टाईम्स, शहागड,
तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, परतूर,
जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता (लपावि),
जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-१०-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०८-२००७ रोजी माहिती मागितली असता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त झालेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील दिनांक ०१-०१-२००७ ते १४-०७-२००७ या कालावधीशी संबंधीत परतूर व मंठा तालुक्यातील गावतळ्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एकूण गावतळ्यांची संख्या, त्यांची किंमत, पगारपत्रक, मजुरांच्या हजेरीपत्रकाची प्रत, अंदाजपत्रकाची प्रत, मोजमाप पुस्तिका, मजुरांचे ओळखपत्र व त्यांच्या बँक पासबुक झेरॉक्स, LOC, पूर्ण अपूर्ण कामांची व अपूर्ण कामांची संख्या - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केलेला होता. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७९६४ इतके त्यांच्याकडे जमा करण्याचे सूचित केले, तथापि अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करुन अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००७ रोजी प्रथम अपील करणे पसंत केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यावेळी सुनावणी झाली नाही असे आयोगास अवगत केले. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून काहीही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने दिनांक ०४-०८-२००७ रोजी माहितीसाठीचा अर्ज दाखल केला होता. या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहे असे नमूद केले होते, तथापि अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा कोणताही पुरावा या अर्जासोबत जोडला नसल्याने अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ७९६४ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा करुन माहिती घेऊन जाण्याची कधीही तयारी न दर्शविल्यामुळे ते अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरवू शकले नाहीत. त्यांनी पुढे आयोगास

असेही अवगत केले की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची अपेक्षा करुनही ते ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करतांना ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा उल्लेख केला होता, तथापि यासंदर्भातील कोणताही ठोस पुरावा त्यांनी त्यांच्या मूळ अर्जासोबत जोडला नव्हता. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या संदर्भात दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजी प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेतील जोडपत्र 'अ' चे अवलोकन करता, दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितल्यास, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत यासंदर्भातील पुराव्याची फोटो कॉपी जोडणे अनिवार्य असल्याचे दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने अशा प्रकारची कारवाई केलेली नाही, तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविलेले शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरण्याकरिता कोणतीही तयारी दर्शविली नाही. तसेच माहिती व्यक्तिशः मागूनही त्यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी स्वतः उपस्थित राहीले नाहीत असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जास त्यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रथम प्रतिसाद हा अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीमधील विहित केलेल्या कालावधीत दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी अपिलार्थी आयोगासमोर विनापरवानगी गैरहजर आहेत, तसेच त्यांनी यासंदर्भात आपले लेखी म्हणणे आयोगास सादर केले नाही. या सर्व बाबी पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न होण्यासाठी ते स्वतः जबाबदार असल्याचे दिसून येते. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून विचाराधीन अर्जातील माहिती देय होत नाही. या एकूण पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, असा निष्कर्ष काढून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| औरंगाबाद | ( वि. बा. बोरगे ) |
| दिनांक १३-०१-२००९ | राज्य माहिती आयुक्त |
| | खंडपीठ औरंगाबाद |

प्रत,

१ श्री. आर. आर. बागवाण, संपादक, सा. जालना टाईम्स, शहागड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद उपविभाग, परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (लपावि), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१९९ व २२००

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, अपिलार्थी
मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मंडळ कृषि अधिकारी, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे दिनांक १२-०१-२००९ रोजीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगास फॅक्सव्दारे प्राप्त झाले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, वरील दोन्ही अपिलासंदर्भात मंडळ कृषि अधिकारी, तुळजापूर यांनी अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००९ रोजी समक्ष बोलावून त्यांना माहिती दाखविली आहे, तसेच ही माहिती अपिलार्थीस दिनांक १६-१२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी दाखविली आहे. त्यांना आवश्यक असणा-या माहितीच्या झेरॉक्स प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्या असल्याने यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार राहिलेली नाही, म्हणून दिनांक १३-०१-२००९ रोजी विचाराधीन दोन्ही अपिलासंदर्भात सुनावणी रद्द व्हावी अशी या पत्रामध्ये त्यांनी आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीने आता राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या

दोन्ही व्दितीय अपिलासंदर्भात त्यांना माहिती प्राप्त झाल्याने त्यांची काही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे, तसेच आज सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१९९/२००७, दिनांक २८-११-२००७ व अपील क्रमांक २२००/२००७, दिनांक २८-११-२००७ ही खारीज करण्यात येत आहेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बसवराज लिंगाप्पा जमादार, मु. पो. निलेगांव, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२०१

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. मोमीन इमाम घुडुसाब, अपिलार्थी
मोमीन गल्ली, लोहारा, तालुका लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, लोहारा (बु.), तालुका लोहारा, जिल्हा
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण
कंपनी मर्यादित, तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जाची दखल घेतली नाही, असे नमूद करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडील घरगुती, दुकाने, कृषि पंप व वीजचोरांची यादी या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००० ते मार्च २००७ या कालावधीमधील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत काही माहिती झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात मागितली होती व काही माहितीच्या कागदपत्रांची पाहणी करण्याची विनंती केली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या या अर्जावर ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०५-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००७ रोजीच्या पत्रान्वये निर्णय दिला असून, या निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीस सशुल्क माहिती पुरविण्याची सूचना जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना आजही आवश्यक असल्याचे नमूद केले आहे तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याची तयारी दर्शविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यांची छाननी केली असता, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-११-२००७ रोजी केलेले व्दितीय अपील एकूण ६७ दिवस इतक्या विलंबाने केले आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १६-०३-२००७ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिनांक २९-०६-२००७ रोजी दिल्याचे आढळल्यावरुन आयोगाची अशी खात्री झाली आहे की, अपिलार्थीस वेळेत अपील दाखल न करण्यासाठी वाजवी कारण होते, त्यामुळे अधिनियमातील कलम १९ (३) च्या परंतुकातील तरतुदीनुसार अपिलार्थीच्या विचाराधीन व्दितीय अपिलाची सुनावणी आयोगाने घेतली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मूळात जो दिनांक २९-०६-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३५० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे तो प्रतिसाद, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १५-०४-२००७ रोजी अगर तत्पूर्वी देणे अधिनियमातील

कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे अभिप्रेत होते, तथापि अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला असल्याचे सिध्द होत असल्याने आता अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती देय होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, तसेच त्यांच्या मूळ अर्जाव्दारे तपासणीसाठी मागणी केलेली कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीस तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत. सदर माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थी यांना स्वतः उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घेणे अनिवार्य आहे. यासाठी त्यांना त्यांचा कोणीही प्रतिनिधी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविता येणार नाही व माहिती व्यक्तिशः उपलब्ध करुन घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने या प्रकरणी तपासणीसाठी मागणी केलेली सर्व कागदपत्रे त्यांना याच कालावधीमध्ये तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोमीन इमाम घुडुसाब, मोमीन गल्ली, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, लोहारा (बु.), तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद रोड, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०७

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. बाळासाहेब भ. मोटे, अपिलार्थी
मु. पो. भूम, तालुका भूम,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१,
कार्यालय भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१,
(नि.क्षे.), उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. किसन संतराम गायकवाड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोडसाळपणे चुकीची व दिशाभूल करणारी विधाने करुन माहिती न दिल्याने त्यांनी हे अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०६-२००७ ते २१-०८-२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

"१. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालयाचे नकाशे घेवून हस्तांतरण केलेल्या दस्त ऐवजासंबंधी अ. क्रं., लिहून देणा-याचे नांव, लिहुन घेणा-याचे नांव, दस्त क्रमांक व दिनांक या सह माहिती देण्यात यावी.

२. दिनांक १६-८-२००७ रोजी किसन संतराम गायकवाड रा. तांदुळवाडी ता. वाशी यांनी आपल्या कार्यालयात दाखल केलेले खरेदीखत दुरुस्ती पत्रक व मान्यता पत्राचे दस्त कोणत्या अधिनियमाच्या तदतुदीअन्वये नाकारण्यात आला त्या अधिनियमाच्या व तरतुदीच्या प्रती मिळाव्यात.

३. दिनांक १६-८-२००७ रोजी किसन संतराम गायकवाड रा. तांदुळवाडी ता. वाशी यांनी आपल्या कार्यालयात दाखल केलेल्या खरेदीखत दुरुस्ती पत्रक व मान्यता पत्रासोबतच्या इनपुट फॉर्मचे उतारे देण्यात यावेत.

४. दिनांक १६-८-२००७ रोजी टोकन रजिष्टर (डे-बुक) उता-याची प्रत मिळावी.

५. बाजार मुल्य दर तक्ता २००७ ची प्रत मिळावी (भूम तालुका, वाशी तालुका प्रभाव क्षेत्र, ग्रामीण व नगर पालीकासह)"

अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस या पत्राव्दारे काही माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झ ाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर, कोणत्याही प्रकारची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी घेतल्याचे आढळून येत नाही, मात्र अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात त्यांनी दिनांक १५-१०-२००७ रोजी अपिलार्थीस एक पत्र लिहिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस एका मुद्दयावर सशुल्क माहिती देऊ केली आहे, तसेच अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ख) अन्वये नाकारली आहे. या पत्रामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस

माहिती नाकारतांना असे म्हटले आहे की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दिल्याने न्यायालयाचा अवमान होण्याची शक्यता आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तथापि त्यांनी त्यांच्या दिनांक ०३-०१-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आयोगासमोर त्यांचा युक्तिवाद मांडला असून, त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या पत्रान्वये आपली जबाबदारी जाणुन बुजून टाळण्याचा प्रयन केला आहे, तसेच माहिती देण्याचे टाळण्यासाठी कायद्यास विसंगत पत्र देऊन, त्यांना माहिती देण्यासाठी जाणुन बुजून टाळाटाळ केली आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपूर्ण माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित करावी. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय देतांना, जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगविषयक कारवाई केली नाही व जन माहिती अधिकारी यांना पाठीशी घालून अपिलार्थीच्या प्रथम अपिलाचा कायद्यास विसंगत निकाल दिला दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये केलेला खुलासा खोटा आहे, निकाल देतांना अपिलीय अधिका-यांचा पत्ता व अपिलाची मुदत नमूद न करुन माहिती अधिकार अधिनियम कायद्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी उल्लंघन केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली होती त्यावेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. ते या पदावर दिनांक ०१ मार्च २००८ पासून कार्यरत आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देण्यासाठी न्यायालयाचे कोणतेही विशिष्ट असे आदेश त्यांना अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाहीत, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देणे शक्य आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय देतांना ते या पदावर कार्यरत नव्हते.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण पाच मुद्दयांवर त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे

अवलोकन करता, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते, तथापि यासंदर्भात त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांना या मुद्दयाव्दारे भूमि अभिलेख कार्यालयाचे नकाशे घेऊन कोणकोणते दस्तऐवज दिनांक ०४-०६-२००७ ते २१-०८-२००७ या कालावधीत नोंदविले त्यासंबंधीची माहिती हवी असल्याचे दिसून येते. ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमानुसार अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे. उर्वरित ४ मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देण्यासाठी कोणत्याही न्यायालयाने जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध केलेला नाही, असे आज सुनावणीमध्ये उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास स्पष्ट केले आहे हे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय ठरत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपलब्ध कागदपत्रांची छाननी केली असता अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १८-०९-२००७ रोजी जरी प्रतिसाद दिला असला तरी, सदर प्रतिसाद हा चुकीचा आहे, कारण या पत्रामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे निश्चित किती शुल्क अपिलार्थीने कधी व कसे भरावयाचे याचा कोणताही उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी, या पत्रामध्ये केलेला नाही. तसेच अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३, ४ च्या संदर्भात त्यांनी सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने माहिती देता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले. आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २, ३ व ४ व्दारे जी माहिती मागविली आहे तिच्यासंदर्भात, कोणतेही प्रकरण न्यायप्रविष्ठ नसल्याचे व ही माहिती अपिलार्थीस न देण्यासाठी कोणत्याही न्यायालयाची त्यांना सूचना प्राप्त झाली नसल्याचे आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ व्दारे टोकन रजिस्टर उता-याची प्रत मागितली आहे तर या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे माहिती देता येत नाही, असा खुलासा केला आहे. कार्यालयीन नियमित वापरात येणा-या रजिस्टरच्या प्रती अपिलार्थीस देण्यास न्यायालयाने प्रतिबंध करावा अशी कोणतीही स्थिती या टप्प्यावर उद्‌भवली असण्याची शक्यता दुरान्वये देखिल निर्माण होण्याची शक्यता दिसून येत नाही, त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १८-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे मुद्दा क्रमांक २, ३ व ४ च्या संदर्भात दिलेली माहिती ही असत्य असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने

त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ५ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे बाजार मुल्य दर तक्ता २००७ सालची प्रत मागितली आहे. माहिती देतांना "झेरॉक्स काढण्यासाठी लागणा-या खर्चाचे बिल देऊन माहिती घेऊन जावी" अशा अर्थाचे त्यांनी अपिलार्थीस उत्तर दिले आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (३) (क) मध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा अपिलार्थीस कळवितांना संपूर्ण हिशोब देण्याची तरतूद आहे. तथापि अशा प्रकारे अपिलार्थीस याही मुद्दयावर कोणत्याही प्रकारे निश्चित माहिती न देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची दिशाभूल केल्याचे दिसून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी हे आज आयोगासमोर उपस्थित आहेत. अपिलार्थीस अशा प्रकारची विसंगत उत्तरे देण्याचे कारण त्यांना विचारले असता, त्यांनी त्यांच्या वरिष्ठ कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस अशा प्रकारची माहिती दिल्याचे आयोगास सांगितले. अर्थात या पत्रावर त्यांची सही असल्याने त्यांचा हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही व अपिलार्थीस अशा प्रकारे दिशाभूल करणारी खोटी माहिती दिल्याची जबाबदारी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर निश्चित करण्यात येत आहे. अपिलार्थीस वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळल्याचे, त्यांना विसंगत व खोटी माहिती दिल्याचे या प्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत असल्याने अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस संबंधीत जन माहिती अधिकारी हे नि:संशयपणे पात्र ठरत आहेत. सबब, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय घेतांना जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या मूळ अर्जाचा व अपील अर्जाचा विचार न करता, निर्णय दिल्याचे आयोगास जाणवत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीची नोंद, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी (श्री. अनिकेत शेषराव बनसोडे) यांच्यावर त्यांनी, उपरोक्त प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या व नितांत सचोटीच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळासाहेब भ. मोटे, मु. पो. भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, कार्यालय भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१, (नि.क्षे.), उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे, कौन्सिल हॉलसमोर, पुणे - ०१ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०८

निर्णय दिनांक  १३-०१-२००९

१ श्री. विनोद म. रसाळ, अपिलार्थी

व्दारा - श्री. संजय महादेवराव सोनवणे,

राजे संभाजी नगर, (प.) तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष श्री. अजय ज्ञानेश्वर साळूंके हे गैरहजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही, मागितलेली माहिती ही दिशाभूल करणारी आहे. जन अपिलीय

अधिकारी यांच्या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने माहिती अधिका-यावर कलम २० नुसार दंडात्मक व शास्तीची कारवाई करण्याची व त्यांना योग्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने पोलीस अधीक्षक यांच्याकडे दिनांक २३-०८-२००७ रोजी हिंदु दक्षता समितीने दिलेल्या निवेदनावर कोणती कारवाई केली, दिनांक २६-०८-२००७ रोजी श्री. अजय (भैय्या) ज्ञानेश्वर साळूंके तुळजापूर यांनी दिलेल्या अर्जावर कोणती कारवाइ करण्यात आली, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि या प्रकरणी पोलीस अधीक्षक यांच्याकडील दिनांक ३१-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर यांच्या कार्यक्षेत्रातील असल्याने व त्यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित केले असल्याने, त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज सादर करण्याच्या सूचना दिल्या. यावर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे याच संदर्भात दिनांक २१-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ११-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे निर्णय दिला. या निर्णयाव्दारे त्यांनी अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याच्या जन माहिती अधिकारी (उपविभागीय पोलीस अधिकारी) यांना सूचना दिल्या व या आदेश पत्राबरोबर अपिलार्थीचा दिनांक २८-०८-२००७ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठवून दिला. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे काही माहिती पुरविली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आज आयोगासमोर सादर करु शकले नाहीत, तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षेप्रमाणे माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील पत्र क्रमांक ११४८, दिनांक १६-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती दिली असल्याचा युक्तिवाद केला.

उपरोक्त प्रकरणी आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांचा दिनांक २८-०८-२००७ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज चुकीच्या

प्राधिकरणाकडे केला होता. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे उपलब्ध नव्हती. अशा प्रकरणी कोणती कारवाई करावयाची याचे स्पष्ट विवेचन अधिनियमातील कलम ६ (३) (एक) मध्ये केलेले आहे. या कलमाच्या तरतुदीप्रमाणे जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्या स्तरावर, त्यांना सदर अर्ज प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती त्या प्राधिकरणाकडे म्हणजे उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर यांच्याकडे पाठवावयास हवा होता व त्याची प्रत अपिलार्थीस त्यांनी अग्रेषित करावयास हवी होती, तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केलेली नाही. अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या स्तरावरुन संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमत: दिनांक ११-१०-२००७ रोजी पाठविण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांच्या अशा प्रकारच्या चुकीच्या कृतीमुळे अपिलार्थीस माहिती मिळण्याच्या प्रक्रियेमध्ये कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय विलंब लागल्याचे दिसून येते. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अपील निर्णयाबरोबर प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या प्रथम अर्जानुसार त्यांना दिनांक १६-११-२००७ रोजी काही माहिती पुरविली. अपिलार्थीस दिलेल्या या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधीत कोणतीही माहिती दिलेली नाही. यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित प्रतिनिधी आयोगास कोणताही खुलासा करु शकले नाहीत तर, जन अपिलीय अधिकारी हे सुनावणीस विना परवानगी गैरहजर राहिले आहेत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना त्यासाठी फारसे श्रम घ्यावे लागले असते अशातली कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती का पुरविली याचेही समर्थन जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी आयोगासमोर करु शकले नाहीत. सबब पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येते की, आयोगासमोर सुनावणीसाठी ज्यांना बोलाविण्यात येते त्या जन माहिती अधिका-यांना किमान त्यांची बाजू व प्रकरणातील तपशील पूर्णपणे अवगत आहे, अशा अधिका-यांना आयोगासमोर उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात. या प्रकरणी केवळ जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज विलंबाने प्राप्त झाला असल्याने अपिलार्थीस अंतीमत: माहिती पुरविण्यासाठी त्यांना विलंब लागला. अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविली असल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना, संबंधितावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे

आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व त्याची पोच घ्यावी.

३. जिल्हा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेवर प्रचलीत सेवानियमानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद — ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०१-२००९ — राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विनोद म. रसाळ, व्दारा - श्री. संजय महादेवराव सोनवणे, राजे संभाजी नगर, (प.) तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ पोलीस महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३०९

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. सोनटक्के काकासाहेब धनाजी, अपिलार्थी
रा. टाकळी (बें.), पोस्ट कनगरा,
तालुका जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी (बें.), पोस्ट कनगरा,
तालुका जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांनी वेळेमध्ये प्रतिसाद न देता माहिती देण्यास कसूर करुन वेगवेगळ्या प्रकारे माहिती देण्यासाठी अडथळा निर्माण केल्याचे नमूद केले आहे व याचबरोबर आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी योग्य निर्णय न देता माहिती देण्यास अडथळा करुन, माहिती अधिका-यास पाठीशी घातले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधीत सन १९९७ ते २००६ या कालावधीतील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जामध्ये - सन १९९७ ते २००६ पर्यंत ग्रामपंचायतीस आलेल्या एकूण सर्व योजनांची तपशीलवार माहिती देणे, आणि सर्व योजनासाठींचे एम. बी., इस्टीमेट, सी. सी. यांच्या साक्षांकीत प्रती देणे - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांना आवश्यक असणा-या माहितीपोटीचे शुल्क रुपये १३८ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तसेच या अर्जामध्ये त्यांनी अपिलार्थीस ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे त्याची माहिती दिली नसल्याचे कळवून अपिलार्थी जर दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असतील तर त्याप्रमाणे दाखला सादर करुन माहिती घेऊन जाण्याचे अपिलार्थीस कळविले, तथापि अपिलार्थीने हे पत्र स्वीकारण्यास नकार दिला. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पंचायत समिती कार्यालयात हे पत्र त्यांना देण्यासाठी दिनांक २६-०९-२००७ रोजी सकाळी ११-०० वाजता बोलाविले होते. अपिलार्थीने हे पत्र घेण्यासाठी नकार दिल्याच्या अपिलार्थीच्या कृतीचा जन माहिती अधिकारी यांनी एकूण सात साक्षीदारांच्या उपस्थितीत पंचनामा केला आहे. यावरुन अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २६-०९-२००७ रोजीचे पत्र स्वीकारण्यास नकार दिल्याचे दिसून येते. या प्रकारानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील त्रुटी त्यांच्या निदर्शनास आणल्या. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाने समाधान न झ ााल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-१०-२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपला निर्णय दिनांक ३०-१०-२००७ रोजी पारित केला आहे. या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस निश्चित रक्कम कळविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीने रक्कम भरताच त्यांना माहिती देण्याचे त्यांना सूचित केले. यानंतर दिनांक ३१-१०-२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे एकूण शुल्क रुपये २८२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले, तथापि सदर शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला नाही, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झ ाल्यानंतर कळविण्यात आले. त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास त्यांनी दिनांक २६-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे म्हणजेच अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे, तथापि हे पत्र स्वीकारण्यास अपिलार्थीने नकार दिला आहे, त्याप्रमाणे त्यांनी ७ ग्रामस्थांच्या उपस्थितीत पंचनामा देखील केलेला आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी नकार दिला नव्हता, तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीस जे शुल्क भरावयास सांगितले आहे ते शुल्क त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मोजमाप पुस्तिकांच्या पृष्ठांची संख्या व पूर्णत्वाच्या दाखल्यांच्या प्रतीच्या संख्येवरुन काढले आहे. अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची अपेक्षा करुनही ते ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये २८२ त्यांच्याकडे भरल्यास ते अपिलार्थीस त्वरित व्यक्तिशः माहिती देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०८-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती ही मोठ्या प्रमाणात होती. अपिलार्थीने या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीस आलेल्या मागील ९ वर्षातील एकूण सर्व योजनांची तपशीलवार माहिती, मागितली होती. "तपशीलवार" या शब्दाव्दारे अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे याचा अर्थबोध होत नाही, त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या मुद्दयावरील सर्व योजनांची तपशीलवार माहिती या मुद्दयांवरील माहितीची मागणी अपिलार्थीने मोघम स्वरुपात केल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अर्ज पूर्णपणे भरलेला नाही. या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहेत किंवा कसे याचा खुलासा त्यांनी केलेला नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील या त्रुटी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीच्या निदर्शनास आणल्या आहेत, त्यामुळे आपल्या अर्जातील त्रुटी निश्चितपणे

कोणत्या आहेत याची कल्पना अपिलार्थीस दिनांक २७-०९-२००७ रोजी होती, तथापि या त्रुटीचे अनुपालन करण्याची व आवश्यक असलेली माहिती घेण्यासाठी लागणा-या शुल्काचा भरणा करण्याची तयारी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर अपिलार्थीने दाखविल्याचे या कागदपत्रांवरुन स्पष्ट होत नाही. अपिलार्थी ज्यावेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करतात त्यावेळी त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून त्यांनी हस्तगत करणे हे अपिलार्थीचे प्रथम उत्तरदायित्व ठरते. तथापि या प्रकरणी अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः उपस्थित असल्याचा कोणताही पुरावा या कागदपत्रामध्ये उपलब्ध नाही. अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही टप्प्यावर नाकारले नाही. या सर्व बाबी पाहिल्या असता, अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सोनटक्के काकासाहेब धनाजी, रा. टाकळी (बें.), पोस्ट कनगरा, तालुका जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी, तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, टाकळी (बें.), पोस्ट कनगरा, तालुका जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८२

निर्णय दिनांक १३-०१-२००९

१ श्री. वायाळ गंगाधर कडाजी, अपिलार्थी
मु. पो. पांगरी (बु.), तालुका मंठा,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा,
तालुका मंठा जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,
तालुका परतूर, जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, तत्कालीन जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे हजर आहेत तर अपिलार्थी हे गैरहजर आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-१२-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी हे अपील केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ११-०७-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी

संबंधीत सन २००० ते २००७ या कालावधीशी संबंधीत पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संबंधात मंडळ कृषि अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले व संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होताच त्यांना देण्यासाठी याच पत्राव्दारे आश्वासित केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा यासंदर्भात अपिलार्थीबरोबर कोणताही पत्रव्यवहार केल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना संबंधीत सेवाभावी संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी लागत होती. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना संबंधीत सेवाभावी संस्थेवर अवलंबून राहावे लागत असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लागला, यासंदर्भात त्यांनी त्यांच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस कळविले होते. तदनंतर संबंधीत संस्थेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सशुल्क देण्यासाठी त्यांच्या दिनांक ०८-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे तयारी दर्शविली होती, तथापि अपिलार्थीने सदर शुल्क न भरल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती पुरविता आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला कथित दिनांक ०८-०८-२००७ रोजीचा प्रतिसाद हा अवैध आहे, कारण माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही अर्जदारास, त्यांचा माहितीसाठीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपोटीचे शुल्क अधिनियमातील

कलम ७ (३) (क) प्रमाणे संपूर्ण हिशोब तपशीलासह कळविणे आवश्यक आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०८-०८-२००७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता, या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील व त्याचा भरणा कशा प्रकारे करावयाचा याचे मार्गदर्शन केले नाही. मूळात कोणत्याही अर्जदाराने माहिती व्यक्तिशः मागितल्यास, माहिती संबंधीतांकडून उपलब्ध करुन घेण्याचे काम चालू आहे व ती उपलब्ध होताच अर्जदारास ती माहिती देता येईल, अशा प्रकारचे उत्तर देण्याची तरतूद, माहिती अधिकार अधिनियमामध्ये कोठेही नाही. या सर्व कारणास्तव जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ०८-०८-२००७ रोजीचे कथित पत्र अवैध ठरत आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी देखिल अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतेही लक्ष न पुरवून व यासंदर्भातील आपला निर्णय अपिलार्थीस न कळवून अधिनियमातील कलम १९ (६) चा स्पष्टपणे भंग केल्याचे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारे आपल्या कृतीव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीची नोंद सचिव (कृषि) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी, असे त्यांना येथे सूचविण्यात येत आहे. अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०८-२००७ रोजी दिलेला प्रतिसाद वर स्पष्ट केल्याप्रमाणे अवैध ठरत असल्याने व अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची, अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत आता व्यपगत झाली असल्याने, जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य माहिती द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१३-०१-२००९	राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. वायाळ गंगाधर कडाजी, मु. पो. पांगरी (बु.), तालुका मंठा, जिल्हा जालना.

२	जन माहिती अधिकारी, तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, तालुका मंठा जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव (कृषि) मंत्रालय मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१२
निर्णय दिनांक  १४-०१-२००९

१ श्री. ए.सी. कुवर सुकलाल मंगा रामा : अपिलार्थी
मु.पो.कहाटुळ, ता.शहादा
जि.नंदूरबार.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
पंचायत समिती,शहादा, जि.नंदूरबार
२ जन अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, शहादा,
जि.नंदूरबार

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दि.२५.२.२००८ रोजीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.२.२००८ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे विनादिनांकाचे पत्र आयोगाच्या कार्यालयात दि. २१.५.२००८ रोजी प्राप्त झाले असून या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी दि. ०९.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती पाहिली व त्यांचे समाधान झाले आहे, त्यामुळे त्यांचा दि. २५.२.२००८ रोजीचा अपील अर्ज निकाली काढण्यात यावा, अपिलार्थीने आयोगाकडे केलेली विनंती मान्य करण्यात येऊन विचाराधीन द्वितीय अपील

क्र.१२/०८,दि.२५.०२.२००८ खारीज करण्यात येऊन, खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१२/०८, दि.२५.०२.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १४-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ए.सी. कुवर सुकलाल मंगा रामा,मु.पो.कहाटूळ ता.शहादा जि.नंदूरबार

२. जन माहिती अधिकारी पंचायत समिती, शहादा, जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा,जि.नंदूरबार यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२२०२/०७, २२०३/०७ व २२०५/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२०२,२२०३ व २२०५
निर्णय दिनांक १४-०१-२००९

१ श्री. अविनाश आसाराम कव्हळे, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१ **अपील क्र.२२०२/२००७**
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,परतूर
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :प्रतिवादी
उपविभागीय कृषि अधिकारी,
परतूर जि.जालना

२ **अपील क्र.२२०३/२००७**
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, जालना
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
जालना जि.जालना

३ **अपील क्र.२२०५/२००७**
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, मंठा,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
परतूर जि.जालना

**निर्णय**

वरील तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १४.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त तीन प्रकरणांमध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे अनुक्रमे दि. २६.९.२००७,२२.१०.२००७ व १३.११.२००७ रोजी दाखल केलेली तीन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जांतील मूळ माहितीची मागणी एकसारखीच असल्याने, या तीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे. तथापि आयोगाकडे दाखल अपील क्र.२२०३/०७ मध्ये अपिलार्थीने एका मुद्यावर जादा माहितीची मागणी केली असल्याचे दिसून येत आहे. या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची दखल घेतली नाही व त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने अपील क्र. २२०२/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी परतुर यांच्याकडे दि. १६.७.२००७ रोजी, अपील क्र.२२०३/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांच्याकडे सादर केलेल्या अर्जावर दिनांक नाही (तथापि सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.८.२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते) व अपील क्र.२२०५/०७ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजी एकसारखी माहिती मागितली होती. तालुका कृषि अधिकारी, परतुर यांच्याकडे त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रोजगार हमी योजनेअंतर्गत प्राप्त झालेला निधी ज्या मजूरांना वाटप करण्यात आला, त्यांच्या दि. १.४.२००७ ते दि. ३०.६.२००७ या कालावधीतील कामनिहाय मस्टरच्या झेरॉक्स प्रतींची माहिती मागितली होती. अशाप्रकारची माहिती अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी जालना व मंठा यांच्याकडे अनुक्रमे - विनादिनांकाच्या (जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१८.८.२००७ रोजी प्राप्त झालेला) व दि.१३.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे, मागितली होती. तालुका कृषि अधिकारी, जालना व मंठा यांच्याकडे मूळ माहितीबरोबरच त्यांच्या कार्यक्षेत्रातील वरील कालावधीतील जी कामे एकाच महिन्यात पूर्ण झाली, त्या कामाच्या कोणत्याही दोन मस्टर्सच्या (मजूरांचे हजेरीपट) नकला या माहितीची मागणी जादा स्वरुपात केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास तालुका कृषि अधिकारी, परतुर यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही, तालुका कृषि अधिकारी,जालना यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि.१२.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातील लेखा शाखेकडे शासकीय नियमाप्रमाणे फीस भरुन घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी, मंठा यांनी अपिलार्थीच्या दि. १३.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागितलेली माहिती, "तयार करण्याकरिता त्यांच्या कार्यालयातील कर्मचारीवर्ग अपुरा असल्यामुळे माहिती देण्यास विलंब लागणार आहे, त्यामुळे अपिलार्थी ही माहिती कार्यालयात येऊन पाहू शकतात व ती दाखविण्यात येईल", असे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीने आज सुनावणीच्या वेळी त्यांना तालुका कृषि अधिकारी, जालना यांच्याकडील दि. १२.११.२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले नसल्याचा व तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्या दि. ६.९.२००७ रोजीचे पत्र प्राप्त झाले असल्याचा खुलासा आयोगासमोर केला. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर व जालना यांच्याकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने व जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतुर, जालना यांच्याकडे अनुक्रमे दि. २८.८.२००७, ३.१०.२००७ व २४.९.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले.

अपिलार्थीच्या या प्रथम अपिलांवर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन त्यांच्याकडील दि. ३०.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ५ दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी परतूर यांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलासंदर्भात दि. २६.९.२००७ रोजी पत्र पाठवून जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ३०.९.२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले व या पत्राची प्रत अपिलार्थीस दिली.

जन माहिती अधिकारी, मंठा यांच्या संदर्भात अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादांमुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, उपरोक्त तीनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, त्यांना या तीनही जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळविले नाही तसेच त्यांना माहिती देण्यासंदर्भात कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्याकडून झाली नाही. व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात किती वेळा गेले, याची आयोगाने पुरावासह विचारणा केली असता, अपिलार्थीने असा युक्तिवाद केला की, संबंधित जन माहिती अधिकारी हे कार्यालयीन वेळेत त्यांच्या कार्यालयामध्ये कधीही उपस्थित राहत नाहीत, त्यांनी शासनाच्या इतर विभागाकडे माहिती मागितली असता, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक ती माहिती वेळीच प्राप्त होते. तथापि कृषि विभागाकडून त्यांनी माहितीची मागणी केल्यास ती, त्यांना कधीही प्राप्त होत नाही. अपिलार्थीने या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणतीही माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर शास्तीची कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतुर यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर २९ जुलै, २००८ पासून कार्यरत असून अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयाकडे काही माहिती मागितली होती, हे त्यांना आयोगाची सुनावणीची नोटीस आल्यानंतर प्रथमतः ज्ञात झाले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे दि. १२.११.२००७ रोजी तयार होती, तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते ही माहिती घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे तयार आहे व ती ते ३ दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. अपिलार्थी हे त्यांच्याकडे नेहमी व्यक्तिशः माहितीची मागणी करत असतात,परंतु माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी मात्र ते स्वतः कधीही उपस्थित राहत नाहीत.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी असा युक्तिवाद केला आहे की, ते या पदावर दि. १२.१०.२००७ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे काही माहिती मागितली होती, हे त्यांना आयोगाची सुनावणीची नोटीस आल्यानंतर प्रथमतः ज्ञात झाले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस १० दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी परतूर यांनी असा युक्तिवाद केला की, माहिती अधिकार अधिनियमांतर्गत त्यांच्याकडे दाखल झालेल्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन कशाप्रकारे निर्णय घ्यावयाचा, या प्रक्रियेची माहिती त्यांना नसल्याने दि. ३०.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस ५ दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. २४.९.२००७ रोजीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. २६.९.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्याच दिवशी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस दि. ३०.९.२००७ पूर्वी माहिती देण्याचे सूचित केले व सदर अपिलावर दि. २८.२.२००८ रोजी सुनावणी घेऊन दि.२९.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, या तीनही प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत व तद्नंतरही कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. १८.८.२००७ रोजीच्या अर्जावर दि. १७.९.२००७ रोजी अगर तत्पूर्वी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क व त्याचा तपशील कळविणे भाग होते, तथापि या प्रकरणामध्ये त्यांनी अपिलार्थीस दि. १२.११.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस शासकीय नियमाप्रमाणे फीस भरुन माहिती घेऊन जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी अपिलार्थीस दि. ६.९.२००७ रोजी पत्र लिहून अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून आवश्यक त्या कर्मचारीवृंदाच्या अभावामुळे, देण्यास विलंब लागेल, अशी कबूली देऊन अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात येऊन बघून जाण्याचे सूचित केले.जन माहिती अधिकारी तथा अपिलार्थीने लेखी स्वरुपात माहिती मागितली असता, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात येऊन माहिती बघून जाण्याची जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली सूचना सर्वथा अवैध आहे. या तीनही प्रकरणामध्ये अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे अभिप्रेत असलेली कार्यवाही एकाही जन माहिती

अधिकारी यांनी केलेली नाही, तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर देखील निर्णय घेताना जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी जन माहिती अधिकारी, परतूर यांना ठराविक पध्दतीचे पत्र लिहून त्यांना ५ दिवसांच्या आत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. याच उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्या संदर्भातील प्रथम अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थीशी या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. जन अपिलीय अधिकारी (तथा उपविभागीय कृषि अधिकारी जालना) यांनी जन माहिती अधिकारी (तथा तालुका कृषि अधिकारी, जालना) यांच्याशी संबंधित अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. २९.२.२००८ रोजी म्हणजेच, अधिनियमातील कलम १९(६) मधील विहित मुदत व्यपगत झाल्यानंतर सुनावणी घेतली व अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती कशाप्रकारे व किती कालावधीमध्ये द्यावयाची याचा कोणताही उल्लेख जन अपिलीय अधिकारी यांच्या कथित निर्णयामध्ये नाही. हा सर्व घटनाक्रम पाहता व उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची पाहणी करता कृषि विभाग माहिती अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी आवश्यक त्या गांभीर्याने करीत नसल्याचे जाणवते, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एका ठराविक कालावधीतील त्यांच्या कार्यालयातर्फे केल्या गेलेल्या कामांवरील मजूरांच्या हजेरीपटाची झेरॉक्स प्रत व जे काम एकाच महिन्यात पूर्ण झाले आहे, त्यापैकी एका कामांचे कोणत्याही दोन मस्टर्सच्या झेरॉक्स प्रतीची माहिती मागितली होती. संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी अपिलार्थीस फक्त त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती काढून द्यावयाच्या होत्या, तथापि एवढी सोपी माहिती अपिलार्थीस देण्यासंदर्भात या तीनही जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणत्याही प्रकारे व कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कोणत्याही नागरिकास सार्वजनिक

प्राधिकरणाकडून तीस दिवसांच्या आत त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्याचा हक्क प्राप्त झाला आहे, संबंधित जन माहिती अधिकारी हे वर्ग-२ चे अधिकारी असल्याने, त्यांना ही बाब निश्चितपणे ठाऊक असणे अनिवार्य आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी, जालना यांनी दि. १२.११.२००७ रोजी म्हणजेच अधिनियमाद्वारे विहित केलेला कालावधी व्यपगत झाल्यानंतर दर्शविली. ही माहिती देखील त्यांनी अपिलार्थीस सशुल्क देऊ केली आहे.

तीनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, आज रोजी सुनावणीच्या वेळी युक्तिवादामध्ये स्पष्ट केलेल्या कालावधीमध्ये माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अधिनियमाद्वारे सशुल्क माहिती देण्याचा विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने त्यांना ही माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे विनामूल्य पुरवावी लागेल. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर , जालना व मंठा यांनी अपिलार्थीस अनुक्रमे पंधरा, तीन व दहा दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जालना व मंठा यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, अनुक्रमे पंधरा, तीन व दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद न देऊन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (कृषि) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थी यांनी तीनही प्रकरणामध्ये व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून ही माहिती

प्राप्त करुन घ्यावी लागेल. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांचा कोणताही प्रतिनिधी पाठविणे अनुज्ञेय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांची वरील तीनही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२०२/०७, २२०३/०७ व २२०५/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर,जालना व मंठा यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, अनुक्रमे पंधरा, तीन व दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जालना व मंठा या तीनही जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश आसाराम कव्हळे, दै.जालना दर्शन, साई कॉम्प्लेक्स, लक्कडगेट, बसस्टॅण्डजवळ, जालना-४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, जि. जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्र.२२०४/०७ व २२०६/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२०४ व २२०६
निर्णय दिनांक १४-०१-२००९

१ श्री. अविनाश आसाराम कव्हळे, : अपिलार्थी
रा.जालना.

**विरुध्द**

१ **अपील क्र.२२०४/२००७**
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,जालना,
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा :प्रतिवादी
उपविभागीय कृषि अधिकारी,
जालना, जि.जालना

२ **अपील क्र.२२०६/२००७**
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, मंठा
जि.जालना

जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
परतूर, जि.जालना

**निर्णय**

वरील दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १४.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त दोन प्रकरणांमध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.१०.२००७ व १३.११.२००७ रोजी दाखल केलेली दोन द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलावर निर्णय घेतला नसल्याचे नमूद

करुन आपल्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने अपील क्र. २२०४/०७ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी जालना यांच्याकडे विनादिनांकाच्या अर्जान्वये व जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये, त्यांच्या कार्यक्षेत्रातील, संदर्भित केलेल्या गावामध्ये झालेल्या कंपार्टमेंट बंडिग, मातीनाला बांधकाम व इतर कामावरील मजूरांना वाटप केलेल्या मजूरीचे मस्टर्स(हजेरीपट)च्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीने ही माहिती दि. १.१.२००७ ते दि. ३०.६.२००७ या कालावधीमधील वरील मुद्यांसंदर्भात माहिती टपालाद्वारे मागितली होती अपिलार्थीच्या या अर्जास तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत संपल्यानंतर प्रथम प्रतिसाद दिला या पत्रामध्ये अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती शासकीय नियमाप्रमाणे आवश्यक ती फी भरुन घेऊन जाण्याचे सूचित केले. तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी त्यांच्या दि. ६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्यास त्यांच्याकडे अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पाहून जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,जालना यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने व जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांच्याकडे दि. २४.९.२००७ रोजी व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांच्याकडे दि. ३.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जावर अपिलार्थीने कोणताही दिनांक लिहिलेला नाही. सदर दिनांक अपिलार्थीचा अपील अर्ज जन

अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात ज्या तारखेस प्राप्त झाला, ती तारीख हा अपिलार्थीच्या प्रथम अपिलाचा दिनांक म्हणून गृहीत धरण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या अपील अर्जावर उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, तथापि त्यांच्या दि. २६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दि. ३०.९.२००७ पूर्वी देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तर उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही अथवा अपिलार्थीशी या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही.

जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले केली आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने या संदर्भात असा युक्तिवाद केला की, उपरोक्त प्रकरणी दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना आवश्यक ती माहिती प्राप्त झाली नाही. उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही व कोणताही निर्णय दिला नाही, तर उपविभागीय कृषि अधिकारी जालना यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी आयोगाकडे दि. १३.११.२००७ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर दि. २८.२.२००८ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि या सूचनेनंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपर्यंत आवश्यक ती माहिती पुरविली नाही व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क, त्यांना दोनही जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत कळविलेले नाही.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. १८.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास उद्देशून त्यांनी दि. १२.११.२००७ रोजी एक पत्र लिहिले व या पत्राद्वारे त्यांनी अपिलार्थीस शासकीय नियमाप्रमाणे फीस भरुन आवश्यक ती

माहिती त्यांच्याकडील लेखा शाखेकडून घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि ही माहिती घेण्यासाठी अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात तद्नंतर कधीही उपस्थित झाले नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आज तयार असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे आज रोजी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती तयार असून अपिलार्थीस ही माहिती ते १० दिवसांच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने प्रथम अपील केले, त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. तथापि या पदावर रुजू झाल्यानंतर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या प्रथम अपील अर्जांवर सुनावणी घेण्यास सुरुवात केली. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांच्या पूर्वी या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांना सुनावणी घेणे क्रमप्राप्त होते, तथापि त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी न घेतल्याने, या अपील अर्जावर सुनावणी घेण्यास त्यांना विलंब लागला. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दि. २९.२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने त्यांच्या निदर्शनास न आणल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांना कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊन निर्णय देता आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन या प्रकरणी, अपिलार्थीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदीनुसार कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीस

अधिनियमाद्वारे विहीत केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद दिला आहे. या प्रतिसादाचे स्वरुप अधिनियमातील कलम ७(३)(क)मध्ये विहित केलेल्या तरतुदी प्रमाणे नाही. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस पुरविण्यात येणाऱ्या माहितीच्या संभावित पृष्ठांची संख्या व प्रतिपृष्ठ दर व याप्रमाणे अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे ठोक शुल्क त्यांना कळविले नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांचे दि. १२.११.२००७ रोजीचे पत्र अवैध ठरते. तसेच जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,मंठा यांनी अपिलार्थीच्या अर्जास दि. ६.९.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला, परंतु या पत्राचे स्वरुप पूर्णतया नकारात्मक असल्याचे दिसून येते. आपल्या कार्यालयात आवश्यक तो कर्मचारीवृंद उपलब्ध नसल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापेक्षा ती माहिती अपिलार्थीस दाखविण्याकरिता त्यांच्या कार्यालयास उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या. अपिलार्थीने लेखी स्वरुपात माहिती मागितली असता, तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी अंदाजे किती रक्कम त्यांना पुरवावी लागेल याची कल्पना अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना सहज शक्य असून सुध्दा त्यांनी अपिलार्थीस माहिती पाहण्याचे सूचविले, त्यामुळे तालुका कृषि अधिकारी,मंठा यांचे दि. ६.९.२००७ रोजीचे अपिलार्थीस उद्देशून लिहिलेले पत्र सर्वथा अवैध ठरत आहे.

या प्रकरणी उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेतली तर उपविभागीय कृषि अधिकारी परतूर यांच्या कार्यालयातील संबंधित लिपीकाने अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्या निदर्शनास न आणल्याने ते अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेऊ शकले नाहीत, हे पाहता कृषि विभागातील क्षेत्रीय कार्यालयामध्ये माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीचे काम कशाप्रकारे चालू आहे, याची कल्पना येईल.

प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील अर्जाचा पूर्णतया अनादर केला आहे. त्याचबरोबर त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यपध्दतीने त्यांच्या कार्यालयातील बेशिस्तीचे दर्शनही त्यांनी या प्रकरणी

पुरेपूररित्या घडविले आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. आज रोजी सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी जालना व मंठा यांनी अनुक्रमे तीन व दहा दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आयोगास कबूल केले. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने प्रतिसाद देण्याची त्यांनी दिलेली स्पष्टीकरणे अवास्तव व गैरलागू असल्याने ती, आयोगास मान्य करता येण्यासारखी नाहीत. सबब संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना व मंठा यांना, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अनुक्रमे तीन व दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी, असे आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य तो प्रतिसाद न देऊन, जन अपिलीय अधिकारी यांनी सूचना देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे माहिती न पुरवून, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे सिध्द होत असल्याने, सचिव (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थी यांची वरील दोनही अपिले मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.२२०४/०७ व २२०६/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना व मंठा यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अनुक्रमे तीन व दहा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सचिव (कृषि) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना व मंठा या दोनही जन माहिती अधिकारी यांच्यावर

प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अविनाश आसाराम कव्हळे, दै.जालना दर्शन, साई कॉम्प्लेक्स, लक्कडगेट, बसस्टॅण्डजवळ, जालना-४३१ २०३.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२०७ व २२०८
निर्णय दिनांक १४-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. राजेंद्र गुरुराज बहीरे,<br>रा.उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परंडा,<br>जि. उस्मानाबाद<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, परंडा,<br>जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील दोन प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी (सध्याचे व तत्कालीन) हे उपस्थित आहेत, तर अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २६.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपरोक्त दोन्ही अपील प्रकरणी अपिलार्थी यांची राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेली दि. ०९.०१.२००९ रोजीची दोन स्वतंत्र पत्रे आयोगाचे कार्यालयात प्राप्त झाली असून, या पत्रांमध्ये त्यांना आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून

आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी आयोगाकडे सादर केलेली दोनही द्वितीय अपिले खारीज करावीत, अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने दाखल केलेली दोनही अपिले खारीज करण्याची/निकाली काढण्याची विनंती केल्याने अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.२२०७/०७, दि.२६.१०.२००७ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र.२२०८/०७,दि. २६.१०.२००७ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहीरे, माणिकनगर,माणिक चौक,उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, जि.उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२०९
निर्णय दिनांक १४-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. मलंग अब्दुल रहेमान मो.इस्माईल,<br>रा.उदगीर, जि. लातूर. | : अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>उर्ध्व पेनगंगा प्रकल्प विभाग क्र,१,<br>नांदेड | : प्रतिवादी |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे उपस्थित आहेत, अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणामध्ये अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.१२.२००७ रोजी दाखल केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १.१२.२००७ रोजीच्या (प्रत्यक्षतः दि. ११.१२.२००७) निर्णयाविरुध्द केलेले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांनी दि. १२.९.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही वा माहिती उपलब्ध करुन

दिली नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी दि. २.११.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मागणी केलेल्या मुद्यांचा उल्लेख केला आहे परंतु जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली किंवा नाही, याचा कुठल्याही प्रकारे उल्लेख केला नाही. तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत का दिली नाही याचाही त्यांनी शोध घेतला नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये जे सविस्तर विवरण केले आहे, त्याचा त्यांच्या प्रथम अपीलाशी काहीही संबंध नाही. त्यांना माहिती नको आहे,मूळात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर जास्तीत जास्त दंडात्मक कार्यवाहीची शिफारस अधिनियमातील कलमानुसार करावी, अशी त्यांनी आयोगास अंतिमत: विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी प्रथमत: दि. १२.९.२००७ रोजीच्या त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. मलंग इबादूल रहेमान मो.इस्माईल (अनुरेखक) या कर्मचाऱ्याची "जुल्हा जात संबंधी जर शुध्दीपत्रक काढण्यात आले असल्यास त्या शुध्दीपत्रकाची Attested copy (नक्कल), शुध्दीपत्रक काढण्याची कारणे व शुध्दीपत्रक काढण्याचे अधिकार कोणत्या अधिकाऱ्यास आहे" ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला गेला नसल्याचे दिसून येते. यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २९.११.२००७ रोजी सुनावणी घेऊन या संदर्भातील आपले आदेश दि. ११.१२.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे

त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थीचा दि. १२.९.२००७ रोजीचा कथित मूळ अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जावर त्यांच्याकडून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबतच्या त्यांच्या प्रथम अर्जाच्या प्रतीची पाहणी करता, अपिलार्थीने देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी अर्ज दाखल केल्याबाबतचा कोणताही पुरावा जोडला नसल्याचे दिसून येते, तसेच या अर्जावर अर्ज प्राप्त करणाऱ्या संबंधित लिपीकाची सही व कार्यालयाचा शिक्का आढळून येत नाही. अपिलार्थीने हीच माहिती त्यांच्या वकीलामार्फत दि. २.११.२००७ रोजी मागितली होती व या संदर्भातील माहिती त्यांना दि. २६.११.२००७ रोजी त्यांच्या वकीलामार्फत अपिलार्थीस देण्यात आली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या अर्जामधील संदर्भित केलेल्या श्री. मलंग इबादूल रहेमान मो.इस्माईल यांच्यासंबंधी कार्यालयातर्फे कोणतेही शुध्दीपत्रक काढले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अथवा त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर शपथपत्राद्वारे सादर केले आहे. तसेच अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये नमूद केल्याप्रमाणे दिली आहे.अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याची बाब जन अपिलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आली होती, असे त्यांनी आज सुनावणीमध्ये आयोगास सांगितले, तथापि या विषयावर माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे न पाहता त्यांनी

अपिलार्थीचा मूळ प्रश्न सोडविण्याकडे जास्त भर दिला आहे. जन अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांनी येथून पुढे माहिती अधिकार अधिनियमातील प्राप्त प्रथम अपिलांच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस बाधा न आणता, कशाप्रकारे प्राप्त होऊ शकेल, याचा विचार करणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही, या जन माहिती अधिकारी यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाच्या प्रतीची पाहणी करता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांनी अर्ज दाखल केल्याबाबतचा कोणताही पुरावा जोडला नसल्याचे दिसून येते, कारण या अर्जावर अर्ज प्राप्त करणाऱ्या लिपीकाची सही व कार्यालयाचा शिक्का आढळून येत नाही, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांचे, त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नाही, हे विधान ग्राहय धरण्यात येत आहे व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात अर्ज प्राप्त न झाल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नसावी, असा निष्कर्ष काढण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना माहिती नको आहे, मात्र त्यांच्या अर्जास विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिलेल्या अधिकाऱ्यावर जास्तीत जास्त कठोर शिक्षा व्हावी, असे म्हटले आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, राज्य माहिती आयोगाची स्थापना मूलतः जनसामान्याना माहिती देण्यासाठी व त्याद्वारे सार्वजनिक प्राधिकरणाकडील व्यवहार अधिकाधिक पारदर्शक कसे होतील, हे पाहण्यासाठी असून केवळ संबंधित अधिकाऱ्यांना शास्ती लावणे अथवा त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाईची शिफारस करणे याकरिता नाही. किंबहुना आयोगाचा तसा मूळ उद्देशही नाही. अधिनियमातील कलम २० मधील तरतुदी लक्षात घेता, असे दिसून येते की, अपिलार्थीस आयोगाकडून अपेक्षित असलेली

कार्यवाही, ही फक्त जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही वाजवी कारणाशिवाय माहिती मिळण्याबाबतचा अर्ज स्वीकारण्याबाबत नकार दिला आहे, कलम ७(१) मधील तरतुदीअन्वये विदिर्निष्ट केलेल्या मुदतीत सादर केली नाही किंवा माहिती मिळण्यासाठी केलेली विनंती दुष्ट हेतूने नाकारली किंवा जाणूनबुजून चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली किंवा माहिती नष्ट केली आहे किंवा कोणत्याही प्रकारे माहिती देण्याचे टाळले जात आहे, असे आयोगाचे मत झाले असेल तर - केवळ अशाच प्रकरणी करणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. या प्रकरणी मूळात अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी शपथपत्राद्वारे आयोगास सादर केले असल्यामुळे व अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जातील विनंती स्पष्ट करण्यासाठी व जन माहिती अधिकारी यांनी युक्तिवादाद्वारे केलेल्या त्यांच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नसल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन द्वितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १४-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मलंग अब्दुल रहेमान मो.इस्माईल, रा. दबीरपुरा, उदगीर, घर क्र.१-३-५८, ता. उदगीर, जि.लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, उर्ध्वपेनगंगा प्रकल्प विभाग क्र.१ नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले

**क्रमांक २२२०/०७, २२२१/०७, २२२२/०७, २२२३/०७ व २२२४/०७**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२२०, २२२१, २२२२, २२२३ व २२२४

निर्णय दिनांक १५-०१-२००९

१ श्री. अब्दुल रऊफ म. युसूफ, अपिलार्थी

व्दारा - डॉ. बी. एस. पगारे कॉम्प्लेक्स,

बसस्टॅण्ड समोर, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा

जालना

**विरुध्द**

१ अपील क्रमांक २२२०/०७

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड,

तालुका अंबड, जिल्हा जालना

२ अपील क्रमांक २२२१/०७

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर,

तालुका परतूर, जिल्हा जालना

३ अपील क्रमांक २२२२/०७

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा,

तालुका मंठा, जिल्हा जालना

४ अपील क्रमांक २२२३/०७

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी,

तालुका घनसावंगी, जिल्हा जालना

५ अपील क्रमांक २२२४/०७

जन माहिती अधिकारी

तथा तालुका कृषि अधिकारी, जालना,

जिल्हा जालना

६ अपील क्रमांक २२२०/०७, २२२१/०७, २२२२/०७ व प्रतिवादी

२२२३/०७

जन अपिलीय अधिकारी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर,

तालुका परतूर, जिल्हा जालना

७ अपील क्रमांक २२२४/०७

जन अपिलीय अधिकारी

तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना,

जिल्हा जालना

**निर्णय**

वरील पाच प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १५-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी अंबड, परतूर, मंठा, घनसावंगी, जालना, जन अपिलीय अधिकारी परतूर, जन अपिलीय अधिकारी जालना यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-१०-२००७ रोजी नोंदविलेली व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. या पाचही प्रकरणांमध्ये अपिलार्थीने एकाच दिवशी, एकाच माहितीकरिता संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज केल्याने अपिलार्थीच्या या पाचही अपील अर्जांची एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांच्या दिनांक २२-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपिलांवर त्यांना कोणतीही माहिती न मिळाल्याने त्यांनी आयोगाकडे ही व्दितीय अपिले केलेली आहेत. याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने उपरोक्त पाचही जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या स्वतंत्र अर्जान्वये संबंधीत तालुका कृषि अधिकारी यांनी रोजगार हमी योजना, जलसंधारण योजनेंतर्गत किती कामे केली व एकूण किती खर्च केला, किती कामांची तपासणी केली व पगारवाटपाच्या वेळी किती भेटी दिल्या याची दिनांक ०१-०४-२००५ ते ३१-०३-२००७ या कालावधीशी संबंधीत माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००७ रोजी स्वतंत्ररित्या प्रथम अपीले केली. या अपिलांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, तथापि जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी परतूर यांनी त्यांच्याशी संबंधीत प्रथम अपिलासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पाच दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००७ व १४-०९-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन, दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना सूचना केल्याचे दिसून येते तर दिनांक १४-०९-२००७ रोजीच्या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी कार्यालयात समक्ष येऊन पाहण्याचे कळवून अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे ही व्दितीय अपिले केली आहेत.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी पाचही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहितीच्या मागणीसाठी अर्ज दाखल करतेवेळी त्यांच्या कार्यालयात कोणीही उपस्थित नव्हते, त्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्यालयातील उपस्थित कर्मचा-याकडे आपला मूळ अर्ज देऊन सदर मूळ अर्ज प्राप्त झाल्याबद्दल पोच, मूळ अर्जाच्या प्रतीवर घेतली आहे. त्यांनी या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अद्यापपर्यंत प्राप्त झाली नाही. माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०८-२००७ रोजी पाच स्वतंत्र प्रथम अपिले

सादर केली. या अपिलांवर देखील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही निर्णय प्राप्त झाला नाही. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे आयोगास असे स्पष्ट केले की, संबंधीत अधिकारी हे, माहिती अधिकार अधिनियमाच्या सर्व तरतुदींची पायमल्ली करत असून प्रदीर्घ कालावधी व्यपगत झाल्या-नंतरही ते जनसामान्यांना कोणतीही माहिती पुरवित नसल्याने त्यांच्यावर आयोगाने कठोर कारवाई करावी. त्यांच्या या युक्तिवादाबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या अर्जास दिनांक २०-०७-२००७ रोजीच्या पत्राने प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पोस्टाने पाठविली. यासंदर्भातील पुरावा, आयोगाने त्यांच्या नोटीशीमध्ये तशी पूर्वसूचना देऊनही संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगाने मागितला असता ते आयोगासमोर आज आवश्यक तो पुरावा सादर करु शकत नाहीत, त्यामुळे तालुका कृषि अधिकारी, अंबड यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी दिलेला कथित प्रतिसाद आयोग ग्राह्य धरत नाही.

तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००७ रोजी अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगासमोर मान्य केले व ते या पदावर दिनांक २९-०७-२००८ पासून कार्यरत असल्याचे सांगितले. अपिलार्थीच्या अर्जासंदभातील पत्रव्यवहार त्यांनी अद्यापपावेतो पाहिला नसल्याने अपिलार्थीस माहिती पुरविली नाही, असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००७ रोजी अर्जास त्यांनी दिनांक २३-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४३२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांनी सूचित केले. तथापि सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न केल्यामुळे ते अपिलार्थीस, त्यांनी मागणी केलेली माहिती पुरवू शकले नाहीत. अपिलार्थीस दिनांक २३-०७-२००७ रोजीचे पत्र पाठविल्याचा पुरावा - अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगची पावती त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी योग्य तो प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आज आयोगास अवगत केले. अपिलार्थीने असेही स्पष्ट केले की, त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या अर्जासंदर्भात तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये संबोधलेले पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. मात्र त्यांच्या अर्जासंदर्भात तालुका कृषि अधिकारी,

मंठा यांच्याकडून त्यांना दिनांक १३-०८-२००७ रोजी पत्र प्राप्त झाले असून, या पत्रात तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी असे म्हटले आहे की, अपिलार्थीने माहितीसाठी केलेला अर्ज, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सादर न केल्याने निकाली काढण्यात येत आहे. तसेच या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस विहित नमुन्यात अर्ज सादर करण्यास सूचित केले. सदर पत्र तालुका कृषि अधिकारी, मंठा यांना दाखविले असता त्यांनी हे पत्र त्यांच्या कार्यालयामार्फत पाठविले असल्याचे मान्य केले. आयोगाने देखील ही बाब तालुका कृषि अधिकारी, मंठा यांच्या कार्यालयाच्या जावक नोंदवहीची पाहणी करुन दृढ करुन घेतली आहे.

तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-०७-२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक १४-०८-२००७ रोजी पोस्टाने पाठविली आहे. त्यांनी अपिलार्थीस पोस्टाने माहिती पाठविल्याप्रीत्यर्थ आयोगास पुरावा सादर केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. तालुका कृषि अधिकारी यांनी तपासणी केलेल्या कामांची संख्या, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस टक्केवारी कळविली असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांची ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी विसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे सदरचे पत्र त्यांना प्राप्त झ ााले नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०७-२००७ रोजी अर्जास त्यांनी दिनांक २४-०७-२००७ रोजीच्या पत्राने प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे कार्यालयीन वेळेत येऊन उपलब्ध दस्तऐवज तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली असल्याचे कळविले. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी आपल्या कार्यालयाची जावक नोंदवही सादर केली, मात्र यासंदर्भातील पोस्टाची पावती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती. सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीने आयोगास सुनावणीच्या वेळेस सांगितले.

सर्व जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी (जन माहिती अधिकारी घनसावंगी वगळता) अपिलार्थीस १० दिवसाच्या आत माहिती देण्याचे कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती अस्पष्ट असल्याने, अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत ही माहिती स्पष्ट स्वरुपात देण्याचे आयोगासमोर कबूल केल आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने उपरोक्त सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप हे मर्यादित होते, त्यामुळे ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारची त्यांच्या कार्यालयाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागण्याची शक्यता असल्याची कोणतीही बाब या प्रकरणी संभवत नाही. अपिलार्थीने सर्व जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकाच माहितीची मागणी केली असता उपरोक्त सर्व जन माहिती अधिकारी यांनी काही प्रकरणी प्रतिसाद दिला नाही, काही प्रकरणी चुकीचा प्रतिसाद दिला तर जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी आयोगास विसंगत अहवाल सादर केला व अपिलार्थीस दिनांक १३-०८-२००७ रोजी विसंगत पत्र दिले. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी अपिलार्थीस पाठविलेली कथित माहिती अत्यंत अस्पष्ट स्वरुपात आहे. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा व घनसावंगी यांनी अपिलार्थीस अनुक्रमे सकारात्मक प्रतिसाद व माहिती दिल्यासंदर्भात योग्य तो पुरावा सादर केला आहे. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड यांनी अपिलार्थीस दिनांक २०-०७-२००७ रोजी माहिती दिल्याचे अवगत केले, तथापि यासंदर्भातील पुरावा, आयोगाने पूर्वसूचना देऊन देखिल तालुका कृषि अधिकारी, अंबड हे आयोगास सादर करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीस माहिती, लिखित स्वरुपात देण्याऐवजी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहण्याचे सुचविले जे पूर्णतः अपिलार्थीच्या माहितीच्या मागणीशी विसंगत आहे. या एकूण प्रकारावरुन अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, संबंधीत जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमाच्या तरतुदींची पायमल्ली करत असल्याची आयोगाच्या मनात शंका निर्माण होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड यांनी आयोगासमोर अपिलार्थीस माहिती दिल्याचा पुरावा सादर न करुन, आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीनुसार शिस्तभंगाविषयक कारवाईसाठी पात्र ठरत आहेत. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०७-२००७ रोजी माहिती देण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे आयोगास अवगत केले, यासंदर्भातील पुरावा आयोगास सादर केला, तथापि त्यांनी प्रत्यक्षात अपिलार्थीस माहिती न पाठविता दिनांक १३-०८-२००७ रोजी अपिलार्थीस एक पत्र पाठविले. यामध्ये अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सादर केली नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. राज्य माहिती आयोगाकडे सादर

केलेला पुरावा व अपिलार्थीच्या याच अर्जासंदर्भात तालुका कृषि अधिकारी यांच्याकडील दिनांक १३-०८-२००७ रोजी दिलेला प्रतिसाद पाहता, तालुका कृषि अधिकारी, मंठा यांनी आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा हे देखील शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरत आहेत. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी आयोगाकडे सादर केलेली माहिती अत्यंत अस्पष्ट स्वरुपात असल्याने, त्यांनी अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती दिली याचा बोध आयोगास होत नाही, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००७ रोजी माहिती दिल्याचा पुरावा दाखविला असल्याने त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००७ रोजी माहिती दिली असे आयोग अनुमान काढत आहे. तथापि सदर माहिती अस्पष्ट असल्याने तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांना, अपिलार्थीस दिलेली माहिती ७ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना यांनी अपिलार्थीस पूर्णतः चुकीचा प्रतिसाद देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केल्याने ते देखील उपरोक्त प्रकरणी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे शिस्तभंगविषयक कारवाईस पात्र ठरत आहेत. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे मूळात प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २४-०८-२००७ रोजीच्या पत्रातील त्यांना दिलेल्या सूचनेप्रमाणे देखील त्यांनी अपिलार्थीस माहिती न देऊन जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर यांच्या सुचनेची अवज्ञा केली आहे. त्याच्या अशा प्रकारच्या वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट होऊन त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० (१) च्या तरतुदीस पात्र ठरविले असल्याचे सिध्द होत आहे. उपस्थित जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्याकडे ज्यावेळी माहितीच्या मागणीसाठी अर्ज दाखल केला होता त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते, (त्यावेळी श्री. एम. आर. धोंगडे नावाचे अधिकारी या पदावर कार्यरत होते, सध्या ते तालुका कृषि अधिकारी, सेलू जिल्हा परभणी या पदावर कार्यरत आहेत) त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांना आयोगातर्फे असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न देऊन व अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर एकूण रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा

खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही म्हणावयाचे नाही व त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विलंब लावल्याचे ग्राह्य धरण्यात येऊन हे आदेश अंतीम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

उपरोक्त सर्व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती ७ ते १५ दिवसाच्या आत देण्याचे कबूल केले आहे. अपिलार्थीस ही माहिती सशुल्क देण्याचा कालावधी आता व्यपगत झाला असल्याने, सर्व जन माहिती अधिकारी यांना आता अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य द्यावी लागेल.

उपरोक्त घटनाक्रमाचे पृथःकरण केल्यास जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर व जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर जर अधिनियमातील विहित मुदतीत सुनावणी घेऊन कारवाई केली असती तर कदाचित अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करावे लागले नसते. उपविभागीय कृषि अधिकारी परतूर व जालना यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेतली नाही, फक्त त्यांना एका ठराविक साचाचे पत्र पाठवून या प्रकरणी स्वतःची जबाबदारी टाळण्याचा त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. या प्रकरणी उपविभागीय कृषि अधिकारी परतूर व जालना यांनी आपल्या कार्यशैलीतील बेपर्वाईचे व निष्क्रीयतेचे दर्शन घडविले आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. सबब सचिव (कृषि) यांनी, उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर व जालना यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाची यथायोग्यरित्या नोंद घ्यावी, असे आयोगातर्फे त्यांना सूचित करण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२२०/०७, २२२१/०७ व २२२४/०७ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्रमांक २२२२/०७ व २२२३/०७ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, परतूर, मंठा व जालना यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

४. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत स्पष्ट स्वरुपात विनामूल्य पुरवावी.

५. सचिव (कृषि) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, मंठा व जालना यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

६. संबंधीत जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर यांनी, अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याबद्दल रुपये २५००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा. त्यांचा खुलासा विहित मुदतीत प्राप्त न झाल्यास हेच आदेश अंतीम करण्यात येतील.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल रऊफ युसूफ, व्दारा - डॉ. बी. एस. पगारे कॉम्प्लेक्स, बसस्टॅण्ड समोर, भोकरदन, तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मंठा, तालुका मंठा, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, घनसावंगी, तालुका घनसावंगी, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, जालना, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, जालना जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

९ सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

१० निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२२५

निर्णय दिनांक १५-०१-२००९

१ श्री. बाबुराव भिमराव गगणे, अपिलार्थी
रा. ढोबळेवाडी पो. उजडे, तालुका निलंगा
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, निलंगा, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, निलंगा, जिल्हा लातूर

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी : ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ढोबळेवाडी, तालुका निलंगा जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष
१ श्री. नवनाथ शेषेराव गणणे
२ श्री. पांडुरंग रघुनाथ टोपे
३ श्री. रोहिदास हानमंते
४ श्री. दत्तू दगडू कांबळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे म्हटले आहे की, त्यांनी दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे नंतर प्रथम अपील केले असता त्यांनी कोणतीही माहिती दिली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. आपल्या या अभिप्रायाबरोबर त्यांनी आपल्या अर्जातील मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १६-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सर्व्हे नंबर १० ब ढोबळेवाडी या शेतात ग्रामपंचायत ढोबळेवाडीने अनधिकृत जागेची नोंद करुन वाटप केलेल्या घरकुलासंदर्भात संबंधीत ग्रामपंचायतीने त्यांच्याकडील ८ अ च्या उता-यामध्ये श्री. नवनाथ गणणे, श्री. पांडुरंग टोपे, श्री. रोहिदास हानमंते व दत्तू कांबळे यांच्या घरकुलाची नोंद व यशवंत ग्रामसमृध्दी योजनेंतर्गत सिमेंटचा रस्ता या कागदपत्रांचे उतारे, याची मागणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस काही माहिती दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०९-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२-०९-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. या सुनावणीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०९-२००७ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविण्याचे जन माहिती अधिकारी यांना या निर्णयाव्दारे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०९-२००७ रोजी, त्यांनी दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे पाठविलेली माहिती परत अपिलार्थीस पाठविली, ही माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थी हे आज सुनावणीमध्ये कबूल करत आहेत. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून फारच विलंबाने प्राप्त झाली.

आज रोजी सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०६-२००७ रोजी पाठविलेली माहिती त्यांना दिनांक १८-०३-२००८ रोजी प्राप्त झाली. परंतु ही माहिती त्यांना अपेक्षित असलेली माहिती नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी अर्ज केल्यानंतर एकदाही उपस्थित राहिले नाहीत. अपिलार्थी हे, त्यांनी मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्यावर राहात नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या नोंदी, त्यांनी संबंधीत शेतमालकाच्या खरेदीपत्राच्या आधारे केल्या असून, यशवंत ग्राम समृध्दी योजनेंतर्गत सुरु करण्यात आलेल्या रस्त्याचे काम अपिलार्थीने हरकत घेतल्यानंतर बंद करण्यात आले. सदर काम ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत पारित केलेल्या ठरावाप्रमाणे केले जाणार होते.

त्रयस्थ पक्षाने अपिलार्थीस माहिती देण्यास त्यांची कोणतीही हरकत नसल्याचा आयोगासमोर युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेली माहिती चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिलेली माहिती ही अपिलार्थीच्या मालकीच्या शेताच्या संदर्भाने दिलेली आहे. परंतु अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मालकीच्या संदर्भाने कोणतीही माहिती विचारलेली नव्हती. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सर्व्हे नंबर १० ब या भुखंडाच्या संदर्भात माहिती विचारली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०६-२००७ रोजीच्या व तदनंतर दिनांक १६-०९-२००७ रोजीच्या पत्राने पुरविलेली माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्या चुकीच्या धारणेवर आधारित असल्याचे दिसून येते. आज रोजी युक्तिवादाच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीचा खुलासा केला असून, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेल्या त्रयस्थ पक्षांच्या घरकुलांचे बांधकाम हे त्यांनी खरेदी केलेल्या भुखंडावर झाले आहे, त्या घरकुलाची नोंद ग्रामपंचायतीच्या ८ अ च्या उता-यावर संबंधितांनी ग्रामपंचायतीकडे सादर केलेल्या खरेदीखताच्या आधारे केलेली आहे, त्यामुळे या प्रकरणी त्रयस्थ पक्षांच्या खरेदीखताच्या सर्व प्रती अपिलार्थीस दिल्यास, अपिलार्थीस या मुद्दयांवर आवश्यक असलेली माहिती मिळू शकेल. अपिलार्थीने यशवंत ग्रामसमृध्दी योजनेंर्तगत सिमेंटचा रस्ता कोणत्या आधारे केला जात होता, यासंदर्भातील कागदपत्रे जन माहिती अधिकारी

यांच्याकडे मागितली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आज युक्तिवादामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय, ढोबळेवाडी यांनी त्यांच्या मासिक बैठकीत पारित केलेल्या ठरावाप्रमाणे हे काम घेतले गेले असल्याचे सांगितले. आज रोजी जन माहिती अधिकारी यांना, या ठरावाची प्रत आयोगास दाखविता आली नाही. अपिलार्थीस या मुद्दयावर माहिती देतांना ग्रामपंचायतीच्या ज्या ठरावाच्या आधारे यशवंत ग्राम समृध्दी योजनेंतर्गत रस्त्याच्या कामाला सुरुवात केली होती त्या ठरावाची प्रत, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे योग्य राहील. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या मुद्दयांशी संबंधीत कागदपत्राच्या प्रती आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याची विहित मुदत व्यपगत झाल्याने, अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हे, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०६-२००७ रोजीचे पत्र पाठविल्याचा पुरावा आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. यावरुन त्यांनी अपिलार्थीस खरोखरच दिनांक ३०-०६-२००७ रोजी प्रथम माहिती पाठविली आहे किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०९-२००७ रोजी पुरविलेली माहितीही वर विवेचन केल्याप्रमाणे चुकीची असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थी यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही उपस्थित न झाल्याचे सिध्द होत आहे. सबब, जन माहिती अधिकारी यांना, असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस स्वतःच्या चुकीच्या धारणेवर जन माहिती अधिकारी यांनी चुकीची माहिती पुरविल्याने, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या अर्जांवर त्यांनी सर्तकतेने कारवाई करावी अशा त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक १५-०१-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबुराव भिमराव गगणे, रा. ढोबळेवाडी पो. उजडे, तालुका निलंगा जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, ढोबळेवाडी, तालुका निलंगा जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा, जिल्हा लातूर यां-ना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२२६

निर्णय दिनांक १५-०१-२००९

१ शेख तबस्सुमबी इस्माईल, अपिलार्थी

शामनगर, कृष्णा हॉस्टिलमागे, रियाज कॉलनी, महेबुबी

मंजिल, लातूर,

तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, लातूर, तालुका

जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी

जिल्हा शल्यचिकित्सक,

जिल्हा रुग्णालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत तर जन माहिती अधिकारी व अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १२-०१-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने विचाराधीन प्रकरणाशी संबंधीत माहिती त्यांना आता प्राप्त झाली असल्याने ते हे अपील चालवू इच्छित नाही, त्यामुळे हे अपील निकाली काढावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडील त्यांनी दाखल केलेले व्दितीय अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक २२२६/२००७, दिनांक ०५-११-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ शेख तबस्सुमबी इस्माईल, शामनगर, कृष्णा हॉस्टिलमागे, रियाज कॉलनी, महेबुबी मंजिल, लातूर, तालुका जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, लातूर, तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३१०

निर्णय दिनांक १५-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गुंडप्पा कंठेप्पा भालके,<br>रा. नेकनाळ (बदनाळ), पो. तळेगाव (भो.),<br>तालुका देवणी, जिल्हा लातूर | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप आयुक्त (विकास अस्थापना),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्ष | जन माहिती अधिकारी | : | गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-११-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपिलाची कारणे या मुद्दयासमोर, विभागीय आयुक्त स्तरावरील लोकशाही दिन टोकन नंबर ११७/०३ निकालाप्रमाणे फेर होऊन ८ अ उतारा बांधकाम परवाना वीज घेण्यास नाहरकत मिळणेबाबत, या अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असणा-या माहितीपोटीचे अशा प्रकारचे अभिप्राय दिले आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २१-०६-२००७ रोजीच्या प्रथम अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे विभागीय स्तरावर लोकशाहीदिन तक्रार टोकन क्रमांक ११७/०३, दिनांक २०-०५-२००४ रोजी घोषित केलेल्या निकालाप्रमाणे कारवाई झालेली माहिती व याचबरोबर एकूण ३ वेगळया मुद्दयांव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नार्थक स्वरुपात त्यांच्या कृतीबाबत काही कारणे विचारली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे फॅक्सव्दारे पाठवून दिला होता, तसेच अपिलार्थीने हा अर्ज उप आयुक्त (विकास आस्थापना) औरंगाबाद यांच्याकडे जन माहिती अधिकारी असे उद्देशून केला होता. अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त न झाल्याने, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर, त्यांना सादर केलेल्या टिपणीवर अपिलार्थीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्यावर प्रकरण सादर करण्याची सूचना त्यांच्या कार्यालयास दिली. तद्नंतर अपिलार्थीचा मूळ अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आज आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जासोबत त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या मूळ अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांना सादर केल्याचे म्हटले. तथापि अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाबरोबर त्यांचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाला नसल्याचे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अपिलाच्या झेरॉक्स प्रतीवरुन अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २१-०८-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते, तथापि हा अर्ज प्रत्यक्षात ज्या अधिका-याने या प्रक्रियेमध्ये निर्णय घेणे अपेक्षित आहे त्या अधिका-याकडे प्राप्त झाला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज न पोहोचल्यामुळे अपिलार्थीच्या या अपिलावर जन अपिलीय अधिकारी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेऊ शकले नाहीत. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी सुनावणी घेणे इष्ट राहिल, अशी आयोगाची खात्री झाली आहे. सबब जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना) विकास शाखा, विभागीय

आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना, असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने विभागीय आयुक्त कार्यालयात सादर केलेल्या त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय मान्य नसल्यास ते अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे या निर्णयानंतर ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने विभागीय आयुक्त कार्यालयात सादर केलेल्या त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक १५-०१-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुंडप्पा कंठेप्पा भालके, रा. नेकनाळ (बदनाळ), पो. तळेगाव (भो.), तालुका देवणी, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी, तथा गट विकास अधिकारी (प्रशासन), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (आस्थापना), विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८६

निर्णय दिनांक १५-०१-२००९

१ श्री. धीरज बाबुराव कन्नावार, अपिलार्थी
आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा
हिंगोली

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५-०१-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांच्या हस्ताक्षरातील दिनांक १५-०१-२००९ रोजीचा अर्ज सादर केला असून या अर्जामध्ये त्यांनी आयोगाकडे दाखल केलेले अपील क्रमांक २३८६/०७ हे, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त झाली असल्याने, स्वखुषीने मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीनेच राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २१८६/२००७, दिनांक २८-१०-२००७ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १५-०१-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धीरज बाबुराव कन्नावार, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, आखाडा बाळापूर, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१४
निर्णय दिनांक १६-०१-२००९

१ श्री. सैय्यद शकील सैय्यद लाल अत्तार, : अपिलार्थी
रा.गंगापूर जि.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
पुरवठा अधिकारी, ता.गंगापूर,
जि.औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपजिल्हाधिकारी, वैजापूर,
जि. औरंगाबाद

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारीः नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,गंगापूर
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारीः उपविभागीय अधिकारी, वैजापूर,
जि. औरंगाबाद
त्रयस्थ पक्षः श्री. अनिल घोडके

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे नमूद करुन त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रथमतः त्यांच्या दि. १७.०७.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे "श्री. ए.आर.घोडके, स्वस्त धान्य दुकानदार यांना दि. २८.६.२००७ रोजी दिलेल्या नोटीस व चौकशी अहवालाची छायांकित प्रत" ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २३.८.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन या संदर्भात दि. १८.९.२००७ रोजी आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसांचे आत विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही, अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना आज रोजी पर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून अप्राप्त आहे. ही माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात वारंवार जात होते, तथापि संबंधित स्वस्त धान्य दुकानदाराकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त न झाल्याने, ही माहिती अपिलार्थीस देणे शक्य नसल्याचे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सांगितले. त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना परिपूर्णरित्या आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी त्यांना माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही भेटले नाहीत. विहित मुदतीत माहिती न देण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जात नमूद केलेली दि. २८.६.२००७ रोजीची नोटीस संबंधित स्वस्त धान्य दुकानदारास दिली होती, तथापि संबंधित दुकानदाराकडून त्यांना खुलासा प्राप्त न झाल्याने, ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. या व्यतिरिक्त त्यांना काहीही सांगावयाचे नाही, असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये अंतिमतः आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण २ मुद्यांवर माहिती मागितली होती, त्यापैकी पहिल्या मुद्याद्वारे त्यांनी स्वस्त धान्य दुकारनदार श्री. घोडके यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दि. २८.६.२००७ रोजीच्या नोटीसची छायाप्रत व दुसऱ्या मुद्याद्वारे या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल, यांची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने सदर माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमानुसार देय ठरत आहे. या मुद्यांपैकी जन माहिती अधिकारी यांनी श्री. घोडके, स्वस्त धान्य दुकानदार यांना दिलेल्या नोटीसची प्रत त्यांच्या कार्यालयातर्फे निर्गमित झाली असल्यामुळे, ती त्यांच्याकडेच उपलब्ध असणे अपेक्षित आहे, त्या नोटीसची छायाप्रत अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना क्रमप्राप्त आहे. तथापि एवढी साधी माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीने त्यांना व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्याकडे माहिती घेण्यासाठी कधीही उपस्थित झाले नाहीत, हा युक्तिवाद जरी वादाच्या प्रयोजनार्थ ग्राहय धरला तरी, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा दि. १८.९.२००७ रोजीचा, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील

निर्णय प्राप्त झाला आहे व तसे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. एकदा जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जी माहिती तयार होती, ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यासाठी त्यांनी तयारी देखील दाखवल्याचे आयोगास आढळले नाही.

आज सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे स्पष्ट केले की, अर्जदाराने संदर्भित केलेल्या दुकानदाराची त्यांनी अद्यापपावेतो चौकशी केलेली नाही. स्वस्त धान्य दुकानदारास कार्यालयातर्फे नोटीस दिल्यानंतरही या नोटीसप्रमाणे पुढे संबंधित दुकानदाराचा खुलासा प्राप्त करुन घेण्यासंदर्भात अथवा संबंधित दुकानदाराची चौकशी करण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही स्वारस्य दाखविले नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. १८.९.२००७ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता, त्यामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या अंमलबजावणीसंदर्भात अत्यंत उदासीन असल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अभिप्राय नमूद केले आहेत व या संदर्भात त्यांनी या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी यांचा खुलासा देखील अपेक्षिला आहे, असे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे सहजरित्या उपलब्ध होती, (त्रयस्थ पक्षाला दिलेल्या दि.२८.६.२००७ रोजीच्या नोटीसची प्रत) ती माहिती अपिलार्थीस देण्याकरिता त्यांनी या संपूर्ण घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर, एवढेच नव्हेतर द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या तारखेपर्यंत देखील कोणताही प्रतिसाद दिल्याचे आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील अक्षम्य बेपर्वाई व कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, याची आयोगास खात्री झाली आहे. सबब सचिव (महसूल) यांना, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (महसूल) यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री.सैय्यद शकील सैय्यद लाल अत्तार,मु.पो.पोस्ट ऑफीसजवळ,रा.गंगापूर,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गंगापूर जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर जि. औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (महसूल),मंत्रालय,मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१५
निर्णय दिनांक १६-०१-२००९

१ श्री. ज्ञानेश्वर लहानुजी खैरे, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रशासक,
महानगरपालिका, औरंगाबाद.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,महानगरपालिका, औरंगाबाद.

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: वॉर्ड अधिकारी, वॉर्ड-'फ',
महानगरपालिका, औरंगाबाद.
जन अपिलीय अधिकारी १. शहर अभियंता,
महानगरपालिका, औरंगाबाद
२. कर निर्धारक व संकलक,
महानगरपालिका, औरंगाबाद
त्रयस्थ पक्ष: श्री. गोरख यादव देवकर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, दोनही जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १७.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांच्या प्रथम अपील अर्जावरील जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय, बेकायदेशीर असल्याचा आपला अभिप्राय दिला आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. २९.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे श्री. गोरख यादव देवकर यांनी केलेल्या बांधकामासंदर्भात सन २००१ ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. गोरख यादव देवकर, शिवशंकर कॉलनी,तानाजी चौकाचे दक्षिणेस, औरंगाबाद यांनी सन २००१ च्या बांधकामास गुंठेवारी लागू नसताना महानगरपालिकेने घर टॅक्स लागू केल्याची संपूर्ण कागदपत्रांची माहिती, श्री. गोरख देवकर यांचे रस्त्यावर केलेले अतिक्रमण अनधिकृत बांधकाम पाडण्याविषयी दिलेल्या अर्जावर कोणती कार्यवाही केली, अतिक्रमण हटविण्याविषयी महापालिकेने दिरंगाई का केली, सदरील शिवशंकर कॉलनी तानाजी चौकाच्या दक्षिणेकडील गोरख देवकर यांचे अनधिकृत बांधकाम महानगरपालिका हटविणार आहे किंवा नाही, श्री. गोरख देवकर यांना नळ कनेक्शन कोणत्या नियमाने दिले, नळ कनेक्शन करिता त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे, श्री. गोरख देवकर यांच्या अतिक्रमणाबाबत महानगरपालिकेने केलेला पंचनामा व अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही, श्री. गोरख यादव यांनी दाखल केलेली कागदपत्रे - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ६ नुसार ४८ तासांच्या आत उपलब्ध करुन देण्याची विनंती केली. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. २७.११.२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिली व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींपोटी आवश्यक ते शुल्क रु. १२/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिसाद येण्याची विहित मुदत संपण्याची वाट न पाहता, अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी

यांच्याकडे दि. ५.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी कायद्याचा भंग केला, हेतूपुरस्सर व जाणीवपूर्वक अपिलार्थीस माहिती न देता ती लपविली व दडवून ठेवली, हा गुन्हा केल्यामुळे व वारंवार विनंती केली असता माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने माहिती अधिकाऱ्यास दंड व शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची विनंती केली होती. अपिलार्थीचे प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.११.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसांच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि सदर निर्णय अपिलार्थीस बेकायदेशीर असल्याचे वाटल्यावरुन व्यथित होऊन त्यांनी, राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न दिल्याने त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करणे भाग पडले आहे. जन अपिलीय अधिकारी यांना दिलेला निर्णय अपिलार्थीस बेकायदेशीर का वाटतो, याचे स्पष्टीकरण आयोगाने अपिलार्थीस विचारले असता अपिलार्थीने असे सांगितले की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी करताना अधिनियमातील कलम ६ नुसार त्यांना ४८ तासांच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. तथापि त्यांनी अर्ज करुन ८ दिवसांचा कालावधी व्यपगत होऊनही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असूनही, ती न दिल्याने,त्यांना जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बेकायदेशीर असल्याचे वाटले. त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. २७.११.२००७ रोजी पुरविली आहे. याचबरोबर अपिलार्थीस श्री. गोरख यादव देवकर यांच्या खरेदीखताची झेरॉक्स प्रत त्यांनी दि. १३.१२.२००७ रोजी पुरविली आहे.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या संदर्भात मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देण्याबद्दल त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम,दोन्ही बाजूंनी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. या ४ मुद्यांपैकी मुद्दा क्र. १ मध्ये अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा विषय स्पष्ट केला आहे, त्यामुळे या मुद्यावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय होत नाही. मुद्दा क्र.२ मधील त्रयस्थ पक्षाचे अतिक्रमण हटविण्यासाठी कोणती कार्यवाही केली, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिली नसल्याचे दिसून येते. याच मुद्यामधील, "श्री. गोरख देवकर यांचे रस्त्यावर केलेले अतिक्रमण अनधिकृत बांधकाम हटविणार आहे किंवा नाही" या भागाची माहिती अपिलार्थीस देय नाही, कारण ही माहिती अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. अधिनियमातील कलम २(च) मध्ये 'माहिती' या शब्दाच्या दिलेल्या व्याख्येचे अवलोकन करता, माहिती अधिकार अधिनियमाअंतर्गत जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे, ती त्यांनी अपिलार्थीस देण्यासंदर्भात विहित मुदतीत निर्णय घेणे व निर्णय झाल्यानंतर ती अपिलार्थीस सशुल्क अथवा विनामूल्य देणे एवढीच मर्यादित प्रक्रिया अभिप्रेत आहे. अपिलार्थीने या मुद्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दल कारणे व खुलासा अपेक्षित करणारी माहिती विचारली आहे. अशाप्रकारची माहिती अपिलार्थीस वर स्पष्ट केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार देय असणार नाही. अपिलार्थीच्या मुद्दा क्र.३ मध्ये- "श्री.गोरख देवकर यांना नळ कनेक्शन कोणत्या नियमाने दिले व नळ कनेक्शन करिता दाखल केलेले कागदपत्र " असा जन माहिती अधिकारी यांना त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी याबाबतचा खुलासा अपिलार्थीस दि. २७.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे केला असून श्री.गोरख देवकर, यांनी नळ कनेक्शन करिता दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दि. १३.१२.२००७ रोजी दिल्या आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ द्वारे अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी केलेल्या पंचनाम्याच्या प्रती व श्री.गोरख देवकर यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या, तथापि पंचनाम्याची प्रत त्यांनी अपिलार्थीस दि. ९.१.२००९ रोजी म्हणजे विलंबाने दिलेली आहे. या प्रकरणी श्री. गोरख देवकर यांनी नळ कनेक्शनकरिता दाखल केलेल्या कागदपत्रांच्या टॅक्सची पावती व एक शपथपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केले होते. सदर कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १३.१२.२००७ रोजी दिलेली आहेत. एकंदरीत या सर्व घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस दि. २७.११.२००७ रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पूर्णतः दिली नसल्याचे दिसून येते. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथमतः दि. २७.११.२००७ व तद्नंतर दि. १३.१२.२००७ व ४.१.२००९ रोजी अशा टप्प्यामध्ये माहिती दिली आहे, अपिलार्थीने माहितीसाठी केलेला अर्ज व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीसाठी घेतलेला कालावधी पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रथमतः अपूर्ण माहिती दिली व तद्नंतर जी माहिती दिली ती विलंबाने दिल्याचे सिध्द होत आहे. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र ठरविले आहे, याची आयोगास खात्री झाली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने मागणी केलेली उर्वरित माहिती -श्री. गोरख देवकर यांच्या अतिक्रमण हटविण्यासंदर्भात त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, अभय योजनेचे परिपत्रक, ही माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे वर नमूद करण्यात आले आहे. सबब अधिनियमातील कलम २०(२) च्या तरतुदीनुसार आयुक्त,महानगरपालिका,औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर

प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना ४८ तासांच्या आत माहिती देण्याची विनंती केली होती. अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, हा कालावधी उलटून गेल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असतांनाही विलंबाने माहिती दिली, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बेकायदेशीर वाटला व या माहितीसाठी त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे, या मुद्यावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे ४८ तासांच्या आत माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील कलम ७(१) मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद आहे, -"परंतु, जर मागितलेली माहिती, एखाद्या व्यक्तीचे जीवित वा स्वातंत्र्य यासंबंधांतील असेल तर, विनंतीचा अर्ज मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत ती देण्यात येईल."- विचाराधीन प्रकरणी अशाप्रकारची कोणतीही परिस्थिती उद्‌भवणार असल्याची शक्यता येथे संभवत नाही. त्यामुळे सुनावणीमध्ये स्पष्ट झाल्याप्रमाणे अधिनियमातील कलम ७(१) मधील या परंतुकाचा वापर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्याकरिता करता येणार नाही.यास्तव अपिलार्थीचा जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय बेकायदेशीर आहे, हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निर्णयामध्ये नमूद केलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच, आठ दिवसांच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. ज्ञानेश्वर लहानुजी खैरे,रा. शिवशंकर कॉलनी, तानाजी चौक,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड, 'फ',महानगरपालिका, औरंगाबाद.यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१६
निर्णय दिनांक १६-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. केशव सावळाराम एकमोडे,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस निरीक्षक,<br>त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन<br>नाशिक (ग्रामीण),नाशिक | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>पोलीस अधीक्षक,नाशिक | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी,जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो मिळाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. १३.०८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांना त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन येथे दि. २७.२.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रार अर्जासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - तक्रार

अर्जाची आजतागायत झालेली प्रगती, एफ.आय.आर.ची प्रत आजपर्यंत मिळाली नाही व एफ.आय.आर.ची प्रत केव्हा मिळणार - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.८.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीतील तीन पैकी दोन मुद्यांसंदर्भात माहिती दिली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपिलावर कोणताही निर्णय न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या दि. १३.८.२००७ रोजीच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना दि. १८.८.२००७ रोजी माहिती प्राप्त झाली, तथापि या माहितीने त्यांचे समाधान न झाल्याने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी बराच पत्रव्यवहार केला. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या तक्रार अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना अपेक्षित असल्याचे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यानंतरच्या कालावधीमध्ये केलेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते. या पत्रव्यवहाराद्वारे अपिलार्थी यांना प्राप्त झालेली माहिती चुकीची,अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांनी त्यांच्या जमीन वाटपासंदर्भात नाशिक येथील दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) यांच्याकडे दावा दाखल केला असून, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही दिवाणी स्वरुपाची बाब आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांना हस्ताक्षर तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे

असल्याने,त्यांनी अपिलार्थीची तक्रार हस्ताक्षर तज्ज्ञांकडे पाठविली असून त्याबाबतचा अहवाल अद्यापही अप्राप्त आहे. एवढे असूनही अपिलार्थीने केलेल्या अर्जावर दि. ८.१.२००९ रोजी त्यांच्यातर्फे गुन्हा दाखल करण्यात आला असून अपिलार्थीस एफ.आय.आर.ची प्रत पाठविण्यात आली आहे.मा. न्यायालयात आरोपपत्र दाखल करताना संबंधित कागदपत्रे अपिलार्थीस देण्याची तजवीज त्यांनी करुन ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांनी सुनावणी का घेतली नाही, याचे कारण ते सांगू शकत नसल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेले कागदपत्रे पाहता या प्रकरणी प्रथमतः अशी बाब नजरेस येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जावर शासनाकडील अधिसूचना क्र. क्र.आर.टी.आय.२००५/सी.आर.३१५/०५,५दि. ११.१०.२००५ नुसार आवश्यक असलेले रक्कम रु.२०/- इतक्या किमतीचे तिकीट लावलेले नाही, त्यामुळे विचाराधीन अपील अर्ज अवैध ठरत आहे. तथापि आज रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाचे सूचनेप्रमाणे सदर अपिलावर निर्णय प्राप्त होण्यासाठी अपिलार्थी यांनी आयोगाच्या कार्यालयात पावती क्र. ०४११०७९, दि. १६.१.२००९ अन्वये शुल्क रक्कम रु.२०/- रोख भरल्याने, सदर अपिलावरील सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.८.२००७ रोजी केलेल्या अर्जामध्ये एकूण ३ मुद्यांवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अपेक्षिली आहे. यातील मुद्दा क्र. १ ची माहिती अपिलार्थीस देय ठरते, तथापि मुद्दा क्र. २ द्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने "वारंवार मागणी करुनही एफ.आय.आर.ची कॉपी अद्याप मिळालेली नाही", अशी माहिती मागितली आहे. यावरुन अपिलार्थीस निश्चितपणे

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही, मात्र एफ.आय.आर.ची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंत प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे दिसून येते. मुद्दा क्र.३ द्वारे - जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थी यांनी- "एफ.आय.आर.ची नक्कल केव्हा मिळणार", अशी माहिती मागितली, जी, वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही.

आज रोजी झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने केलेल्या युक्तिवादावरुन, त्यांचा तक्रार अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना अपेक्षित असल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीस मूळ अर्जातील अपेक्षित माहिती, त्यांनी अधिनियमातील कलम ८(१) च्या तरतुदींना कोणताही छेद न देता, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत पुरवावी.

प्रसंगावशात्, या प्रकरणी असे दिसून आले आहे की, जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, नाशिक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना संबंधित जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, नाशिक यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद घेण्याचे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक : १६-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. केशव सावळाराम एकमोडे,'जानकी',प्लॉट नं.१८५,एन-३,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, त्र्यंबकेश्वर पोलीस स्टेशन, नाशिक (ग्रामीण) नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१७
निर्णय दिनांक १६-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. अनंत नकुल कांबळे,<br>रा.पाथरी, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, जिंतूर,<br>जि.परभणी.<br>२ जन अपिलीय अधिकारी तथा<br>कृषि उपसंचालक,<br>परभणी | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे सर्व अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १९.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, प्रथम अपिलावर योग्य कार्यवाही न झाल्याने ते हे द्वितीय अपील करीत असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रथमतः त्यांच्या दि. ०४.०८.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे- मंडळ कृषि अधिकारी चारठाणा व जिंतूर यांच्या कार्यक्षेत्रात दि. १.५.२००७

ते १५.७.२००७ या कालावधीत केलेल्या कामाची तपशीलवार माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये- "संबंधित मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी दि.१.५.२००७ ते दि.१५.७.२००७ या कालावधीत त्यांच्या कार्यक्षेत्रात कोणत्या गावी, कोणत्या शेतकऱ्याच्या शेतात, कोणते काम केले, त्या गावाचे नाव, शेतकऱ्याचे नाव, सर्वे नंबर, गट क्रमांक, त्या कामाचे नाव व त्या कामांवर झालेला एकूण खर्च, याच कालावधीत मंडळ कृषि अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात रो.ह.यो.चे किती काम झाले, त्या गावाचे नाव,कामाचे स्वरुप,कोणत्या गावच्या कोणत्या कामावर किती मजूरांनी काम केले, त्या मजूरांची यादी व त्या कामांवर झालेला एकूण खर्च - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २०.०९.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही, मात्र यासंदर्भात त्यांच्याकडील दि. २४.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये तालुका कृषि अधिकारी, जिंतूर यांना अपिलार्थीस तात्काळ माहिती देण्याचे सूचित केले तसेच या प्रकरणी ते अपिलीय अधिकारी असल्याने, अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडे पाठविला व त्या पत्राची एक प्रत अपिलार्थीस दिली. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी, आयोगाने त्यांना दि. १२.१२.२००८ रोजी लेखी सूचना देऊनही तसेच आयोगाच्या कार्यालयातून दि. ७.१.२००९ रोजी दुपारी १२.०० वा. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. राठोड, अनुरेखक यांच्यातर्फे निरोप देऊनही, सुनावणीसाठी कोणीही हजर नाहीत. उपलब्ध झालेल्या कागदपत्रांची छाननी करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ४.८.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार

त्यांना देय आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. २४.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करेपर्यंत कोणतीही माहिती दिल्याचे आढळून येत नाही. अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ अन्वये सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागण्याचा हक्क आहे व अधिनियमातील कलम ७ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देणे हे त्यांचे कर्तव्य आहे, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी. उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ४.८.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी वंचित ठेवल्याचे आढळून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कार्यशैलीमुळे, ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. आज रोजी संबंधित जन माहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीमधील विहित कालावधीपेक्षा त्यांनी जास्त कालावधीसाठी कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवल्याने,त्यांच्यावर एकूण रु.२५,०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत आयोगास सरळ सादर करावा. या कालावधीमध्ये त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांच्याकडून या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला हे जन माहिती अधिकारी यांना मान्य असल्याचा निष्कर्ष अंतिम करण्यात येऊन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी निर्णयात स्पष्ट केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतुदीनुसार एकूण रुपये २५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अनंत नकूल कांबळे,संपादक सा.हद्दपार, हनुमाननगर,पाथरी, जि.परभणी

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,जिंतूर, जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२१९
निर्णय दिनांक १६-०१-२००९

१ श्री. जगन्नाथ भिमन्ना वारद, : अपिलार्थी
रा.किनगाव जि.लातूर.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
अहमदपूर जि.लातूर.
२ जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक, भूमी अभिलेख, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी ,जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रथमतः त्यांच्या दि.११.०९.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १८.९.२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळवून त्यांचा अर्ज निकाली काढला. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम

१९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ५.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली अथवा या संदर्भात अपिलार्थीशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्याचे, अपिलार्थीने त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दि. ५.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांनी सुनावणी घेऊन, आपले निर्णय पारित करावेत.अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले सदर आदेश मान्य नसतील तर ते अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे हे आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्या या प्रकरणाशी संबंधित दि.०५.१०.२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १६-०१-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. जगन्नाथ भिमन्ना वारद, रा.किनगाव ता.अहमदपूर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, अहमदपूर जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक,भूमी अभिलेख, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४८
निर्णय दिनांक १६-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. देवराम बंडू पारधे,<br>रा. औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष भूसंपादन अधिकारी,<br>औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, "संयुक्त मोजणी पत्रामध्ये माझी नोंद असल्यामुळे विहिरीचा मावेजा मला का मिळत नाही, या विषयी माहिती मिळण्यासाठी" सदर अपील केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. ०१.१०.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

" संयुक्त मोजणीपत्राप्रमाणे विहीरीचा मावेजा का मिळत नाही?"

अपिलार्थीने, मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी म्हणून विशेष भूसंपादन अधिकारी, औरंगाबाद  यांच्या 'विभूसंअ/एलएक्यू/अेआर ०५१/९३, मु.कासोद ता.सिल्लोड' या पत्राचा संदर्भ दिला आहे.

अपिलार्थीने ही माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील (क्रमांक व दिनांक नसलेल्या) पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला असून या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या प्रश्नाची, माहितीच्या अधिकाराखाली उत्तरे देण्याची तरतुद नसल्याचे कळवून अपिलार्थीस त्यांच्या प्रकरणाशी संबंधित संचिका तपासणीसाठी उपलब्ध करण्याचे देऊ केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.१०.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश दि. २६.११.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या विनंती अर्जात नमूद केलेल्या विहिरीचा मोबदला कोणत्या कागदपत्रांच्या आधारे कोणास प्रदान केला, याची माहिती अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनामूल्य पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय  अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थी यांना प्राप्त झाला, तथापि या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, विशेषतः अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे 'माहिती' होऊ शकत नाही. अधिनियमातील कलम २ (च) मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

‘‘ ‘माहिती’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.’’

यावरुन असे दिसून येते की, माहिती अधिकार अधिनियमामध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केल्यास अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात त्यांनी ती अपिलार्थीस देण्यासंदर्भात प्रथमतः निर्णय घेणे व माहिती देण्याचा एकदा निर्णय झाल्यानंतर, ती देण्यासाठी अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे, एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. त्यामुळे उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मावेजाच्या संदर्भात त्यांच्या काही शंका असल्यास त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील याविषयावरील उपलब्ध नस्तीची तपासणी केल्यास, त्यांना या प्रश्नांची उत्तरे मिळू शकतील. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, हा माहितीचा विषय होऊ शकत नाही, हे मान्य केले आहे व अपिलार्थीने त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या विहिरीचे मूल्यांकन कोणत्या कागदपत्रांच्या आधारे, कोणास प्रदान केले आहे, याची माहिती देण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले आहे व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती माहिती, दि. ३.१२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे कळविली असून सदर माहिती अपिलार्थीस दि. ७.१२.२००७ रोजी प्राप्त झाली आहे. तथापि अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये, त्यांना निश्चितपणे कोणत्या सर्व्हेनंबरमध्ये, कोणत्या विहिरीचा मोबदला मिळाला नाही, याचे कोणतेही संदर्भ जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिले नसल्यामुळे, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे

स्वरुप हे मोघम ठरते. या सर्व पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपिलार्थीस त्यांच्या मावेजा संदर्भातील गाऱ्हाण्याची तड लावण्यासाठी त्यांना दिवाणी न्यायालय अथवा महसूल विभागातील सक्षम प्राधिकरणाकडे यासंदर्भात अपील करावे लागेल, असे या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता दिसून येते. सबब अपिलार्थीने त्यांच्या गाऱ्हाण्याची सक्षम प्राधिकरणाकडे अपील करुन, तड लावावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. देवराव बंडू पारधे, एन-७,बी-१,प्लॉट नं. ९३,सिडको, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४९
निर्णय दिनांक १६-०१-२००९

१ श्री. व्ही. के. बबिरवाल, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
सरव्यवस्थापक,
औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
(मुख्य कार्यालय),औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी,
औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
(मुख्य कार्यालय),औरंगाबाद

त्रयस्थ पक्षः श्रीमती शैला कांबळे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी,अपिलार्थी व त्रयस्थ पक्ष हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १८.१२.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी असे म्हटले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.६.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्रीमती शैला कांबळे यांच्यासंदर्भात - "आपल्या बँकेच्या सेवेत असलेले मयत उत्तम कांबळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र नक्कल किंवा तत्सम दस्तऐवज, शैला कांबळे यांना कोणत्या निकषावर सेवेत सामावून घेतले व (हंगामी व कायमस्वरुपी) कोणत्या तारखेला"अशी माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २.७.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात असा खुलासा केला की,अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज सादर करण्यापूर्वी त्रयस्थ पक्षाने त्यांच्या बँकेस स्वतःची वैयक्तिक माहिती मा. न्यायालयाशिवाय इतर कोणासही देऊ नये, असा अर्ज केला आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्रयस्थपक्षाच्या या अर्जाची झेरॉक्स प्रत जोडून अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात पत्र पाठविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १७.०८.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १९.०९.२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, अधिनियमातील कलम ८(छ) प्रमाणे माहिती देण्याचे नाकारले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी तसेच त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी श्री. उत्तम कांबळे यांच्या मृत्यूचा दाखला किंवा तत्सम कागदपत्रे तसेच श्रीमती शैला कांबळे यांना ज्या निकषावर बँकेच्या सेवेत सामावून घेतले या निकषाची प्रत व त्यांना कोणत्या तारखेस हंगामी व कायम स्वरुपात नेमणूक दिली याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितली होती, ही माहिती देण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस ज्या कलमान्वये नकार दिला आहे, ते कलम खालीलप्रमाणे आहे-

"या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही, - जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती."

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, ही माहिती प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल, असे आयोगास वाटत नाही. तसेच यामुळे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षाविषयक प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचे स्त्रोत अथवा सहाय्य ओळखता येईल, अशाप्रकारचे स्वरुप या माहितीमध्ये नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची (public information) आहे. कारण कै. उत्तम कांबळे यांच्या मृत्यूपत्राची नोंद महानगरपालिका अथवा संबंधित शासकीय प्राधिकरणाच्या अभिलेख्यांवर घेतली गेली असेल. सदर मृत्यूपत्र मयत व्यक्तीचे वारस वेळोवेळी व यथायोग्य प्रयोजनासाठी वापरत असतात, यामध्ये गोपनीय अशाप्रकारची अथवा कलम ८(१) च्या वेगवेगळया तरतुदीचा भंग होणे संभवेल,अशी ही माहिती असणे संभवत नाही. त्यामुळे अपिलार्थीने अपेक्षिलेल्या माहितीतील हा भाग सार्वजनिक स्वरुपाचा व त्याद्वारे अपिलार्थीस देय ठरतो. अपिलार्थीने नमूद केलेल्या अर्जातील मजकूरावरुन श्रीमती शैला कांबळे यांना बँकेने सेवेत सामावून घेतले असल्याचे दिसून येते. कोणत्याही कर्मचाऱ्याची नेमणूक बँकेसारख्या सार्वजनिक प्राधिकरणात होत असताना त्यामध्ये जास्तीत जास्त पारदर्शकता ठेवणे अगत्याचे आहे. या प्रकरणी अपिलार्थीने श्रीमती कांबळे यांची नेमणूक करताना वापरलेले निकष व नियुक्तीचा दिनांक, एवढीच मर्यादित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केली आहे. कोणत्याही कर्मचारी भरती प्रक्रियेमध्ये भरती करताना, संबंधित पदावर नेमणूकीसाठी पात्र होण्यास काही निकष निश्चित केलेले असतात व ते निकष संबंधित प्राधिकरण योग्य त्या प्रसिध्दीमाध्यमाद्वारे प्रसिध्दही करीत असतात, त्यामुळे या

माहितीमध्ये गोपनीय अशी कोणतीही बाब असू शकत नाही. ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(छ) प्रमाणे जन माहिती व अपिलीय अधिकारी हे ही माहिती नाकारु शकत नाहीत असे, येथे नमूद करण्यात येत असून, संबंधित जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. व्ही. के. बबिरवाल, चुनिलाल पटेलवाडा,ब्राम्हणगल्ली,बेगमपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (मुख्य कार्यालय), डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, पोस्ट बॉक्स नं.३२३,औरंगाबाद-४३१००५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (मुख्य कार्यालय), डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, पोस्ट बॉक्स नं.३२३,औरंगाबाद-४३१००५औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८४
निर्णय दिनांक १६-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. सोपान तातेराव राऊत,<br>रा.डोंगरकडा ता.कळमनुरी,<br>जि.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी,<br>प्रादेशिक वनविभाग कार्यालय,<br>हिंगोली. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपवनसंरक्षक, परभणी वन विभाग,<br>परभणी | | |

प्रत्यक्ष जन माहिती अधिकारी: सहायक वनसंरक्षक,
हिंगोली,जि.हिंगोली

त्रयस्थ पक्षः श्री. दि. रा.वाकचौरे

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी ,जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष हे उपस्थित आहेत तर अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१०.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. १६.७.२००७ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अद्यापही त्यांना कोणताही निर्णय दिला

नाही. संबंधितांकडून प्राप्त झालेल्या दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे फक्त एका पानाची माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली आहे.याचबरोबर त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांनी प्रथमतः त्यांच्या दि.२९.०५.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. दि.रा.वाकचौरे, वन परिक्षेत्र अधिकारी (रोहयो) कळमनुरी यांनी २००५-०७ सालामध्ये केलेल्या कामांची यादी, उपस्थित मजूर संख्या, मस्टर्सची झेरॉक्स प्रत, कामाचे नाव, योजनेचा खर्च व रोहयोच्या नियमाप्रमाणे काम झाले किंवा नाही,याची माहिती मागितली होती. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचा पुरावा त्यांनी या अर्जासोबत जोडल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या या मूळ माहितीसाठीच्या अर्जावर "तक्त्यामध्ये माहिती द्यावी",असे नमूद केलेले आहे. तथापि 'तक्ता' म्हणजे निश्चित कोणते प्रपत्र याचा उल्लेख अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळ अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने,अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १६.७.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे अथवा अपिलार्थी यांच्या अपिलावर निर्णय दिल्याचे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येत नाही. मात्र अपिलार्थीचा दि. २९.५.२००७ रोजीचा मूळ अर्ज व त्यावरील त्यांनी दि.१६.७.२००७ रोजी केलेले प्रथम अपील यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ६.८.२००७ रोजी एक पत्र लिहिले असून त्या पत्रामध्ये अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती पाठविण्यात येत असल्याचे म्हटले आहे. तसेच अपिलार्थीने मागणी केलेल्या कामाची अंदाजपत्रकीय तरतुद व प्रमाणकनिहाय खर्चाची माहिती मोठया प्रमाणावर असल्याने, अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या कालावधीची व कोणत्या

कामावरील खर्चाची माहिती पाहिजे आहे, याकरिता त्यांना विभागीय कार्यालय, परभणी या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे व कागदपत्रे निरीक्षण करण्याचे सूचित केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी यांचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही व त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून तो प्रथम प्राप्त झाला. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रत्यक्षतः त्यांच्या ताब्यात नव्हती. त्यांना ही माहिती उपवनसंरक्षक, परभणी यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावयाची होती. उपवनसंरक्षक,परभणी यांच्या कार्यालयातून ज्या स्वरुपात माहिती प्राप्त झाली ती त्यांनी प्राप्त स्वरुपात दि.६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पाठविली.

त्रयस्थ पक्षातर्फे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी त्यांची काहीही हरकत नसल्याचे आयोगास सांगण्यात आले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांची छाननी करता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांचा दि. २९.५.२००७ रोजीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केल्या संदर्भातील कोणताही पुरावा त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही.तसेच त्यांच्याकडे या संदर्भात काही पुरावा उपलब्ध असल्यास तो आयोगास दाखविण्यासाठी आज रोजी ते आयोगासमोर उपस्थित नाहीत व जन माहिती अधिकारी यांच्या, अपिलार्थीचा मूळ माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नाही, या विधानाचे खंडन करण्यासाठी ते आज उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने अर्ज करते वेळी परभणी व हिंगोली जिल्हयाकरिता वन विभागातर्फे स्वतंत्र जन माहिती अधिकारी नेमले गेले नव्हते, त्यामुळे अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज वन परिक्षेत्र अधिकारी, हिंगोली यांच्याकडे केला आहे. तथापि हे जन माहिती अधिकारी हे सहायक माहिती अधिकारी म्हणून नेमले गेले आहेत, असे आयोगास उपस्थित जन माहिती अधिकारी यांचेतर्फे स्पष्ट करुन देण्यात आले.

आज रोजी सुनावणीस संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी,हिंगोली (सध्याचे जन माहिती अधिकारी) हे आयोगासमोर उपस्थित आहेत. त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगास सांगितले आहे. त्यांच्या या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. हे पाहता, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे आयोगातर्फे अनुमान काढण्यात येत आहे. मात्र अपिलार्थीचे दि. १६.७.२००७ रोजीचे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले आहे. त्यामुळे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे ज्या दिवशी प्राप्त झाला, तोच दिनांक जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक म्हणून गृहीत धरण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्ज व अपील अर्ज यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता, त्यांनी या माहितीमध्ये अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील अनेक मुद्यांचा समावेश केला नसल्याचे दिसून येते. थोडक्यात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपूर्ण माहिती पाठविल्याचे याप्रकरणी नि:संशयपणे सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता, त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील तरतुदीनूसार देय ठरत आहे. अपिलार्थीने संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या मागणीचा त्यांचा हक्क बजावला आहे. परंतु अपिलार्थीस संपूर्ण माहिती

देण्याचे कर्तव्य संबंधित जन माहिती अधिकारी यांनी मात्र अपेक्षेप्रमाणे पार पाडले नसल्याचे या प्रकरणी दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील रो.ह.यो.कामावरील मजूरांच्या मस्टर्सच्या झेरॉक्स प्रती व कामावर झालेला खर्च, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नसल्याचे दिसून येते. मात्र ती मोठया प्रमाणावर असल्याने अपिलार्थीस त्यांनी, त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून पाहणी करण्याचे सूचविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा गैर आहे. जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या या माहितीसंदर्भात विचारले असता त्यांनी, २९७८ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस त्यांना द्यावी लागणार असल्याचे आयोगास अवगत केले. अपिलार्थी यांनी श्री. वाकचौरे यांनी प्रत्येक कामावर केलेल्या खर्चाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. वास्तविकतः रो.ह.योजनेचे संनियंत्रण महसूल विभागामार्फत जिल्हा व विभागीयस्तरावर नियमितपणे केले जाते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रत्येक योजनेवर झालेल्या खर्चाची कामनिहाय आकडेवारी नियमितपणे महसूल यंत्रणेला पाठविण्यासाठी संकलीत केलेली असते, त्यामुळे अपिलार्थीस श्री. वाकचौरे यांनी प्रत्येक योजनेवर केलेला खर्च कळविणे, ही बाब जन माहिती अधिकारी यांना फारशी दुरापास्त होती, असे आयोगास वाटत नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील उर्वरित माहिती अपिलार्थीस देण्यास १५ दिवसांचा कालावधी लागेल, असे उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर कबूल केले, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या मूळ माहितीतील उर्वरित माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील घटनाक्रमात असे दिसून येते की, मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हती. जन माहिती अधिकारी यांच्या दि. ६.८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस अपूर्ण माहिती प्राप्त होण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना या कामी सहाय्य करणारे परभणी येथील त्यांच्या कार्यालयातील संबंधित जन माहिती अधिकारी व

कर्मचारी हे नि:संशयपणे जबाबदार असल्याचे सिध्द होत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) अन्वये, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना जे अधिकारी/कर्मचारी सहाय्य करीत असतात, त्यांना जन माहिती अधिकारी असे समजावे, अशी तरतुद आहे, हे पाहता, या प्रकरणी मुख्य वन संरक्षक,औरंगाबाद यांना अपिलार्थीस अपूर्ण माहिती देण्यासाठी जे संबंधित जन माहिती अधिकारी व त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत, त्या सर्वांवर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील, उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.
३. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना, या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणाऱ्या सर्वांवर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. सोपान तातेराव राऊत, मु.पो.डोंगरकडा, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, हिंगोली, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक, परभणी वन विभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य वनसंरक्षक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३८६
निर्णय दिनांक १६-०१-२००९

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शंकरराव संतराम हाके,<br>रा. रेणापूर ता.रेणापूर जि.लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>लातूर. | : | प्रतिवादी |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.<br>लातूर. | | |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६.०१.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी त्यांच्या वकिलासह व अपिलार्थी हे उपस्थित आहेत.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थी यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ०९.०४.२००७ रोजी दाखल झालेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

सदर अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही व जी माहिती दिलेली आहे, ती अपूरी व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि.२२.५.२००६ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. रेणापूर येथील वीजग्राहक मिटर क्र.७७०७०९, २०६१५९७, १०६६४६४५ यासंबंधी - "कंपनीकडून किती तारखेला खरेदी केले आहेत, कोणत्या ग्राहकांकडे किती दिवसांसाठी बसविण्यात आले, त्याचा प्रत्येक ग्राहकाकडे किती वीज वापर झाला", अशी माहिती शीघ्र टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते, तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दि. ४.१२.२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार करुन ठेवली असून त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केल्याने, अपिलार्थीस सदर माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १५.७.२००६ रोजीच्या पत्राचा संदर्भ दिला आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३०.१२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दि. २४.१.२००७ व ५.२.२००७ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि ही सुनावणी काही कारणास्तव होऊ शकली नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. ३०.१२.२००६ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर,त्यांनी सुनावणी घेणे या टप्प्यावर आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दि. ३०.१२.२००६ रोजी केलेल्या प्रथम अपिलावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन या संदर्भात

आपले आदेश पारित करावेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) अन्वये सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.लातूर यांनी अपिलार्थी यांच्या दि.३०.१२.२००६ रोजीच्या प्रथम अपिलांवर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, पंचेचाळीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक : १६-०१-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. शंकरराव संतराम हाके, हाके गल्ली, रेणापूर ता.रेणापूर जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,लातूर. यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.